
# निर्धार

## वार्षिकांक

सत्र २०१७-२०१८

भिवापूर महाविद्यालय
जि. नागपूर




बॅकवर्ड क्लास युथ रिलीफ कमिटी नागपूर द्वारा संचालित

**भिवापूर महाविद्यालय, भिवापूर**

Accredited with Grade 'B' (CGPA-2.54) by NAAC, Bengaluru

## Our Inspiration



**Hon'ble**
**Late Shri Bhausaheb Mulak**
Ex. Minister, Maharashtra State
Ex. Mayor-NMC, Founder Chairman,
Backward Class Youth Relief Committee, &
Bhausaheb Mulak Charitable Trust, Nagpur



**Hon'ble**
**Smt. Sumanmala B. Mulak**
Chairperson,
Backward Class Youth Relief Committee, &
Bhausaheb Mulak Charitable Trust, Nagpur

### Founder's Message

This is an age of modern science and technology and we are in the 21st century. India is growing economically and technologically and will join the list of 'Developed Nations by year 2020'. This growth is not possible without sound support of technical human resource. We at our college aim at overall development of the personality of an individual by providing best education, technical know how, personality traits and leadership qualities to grow as a manager & a technocrat.

## The Leader



**Hon'ble**
**Shri Rajendra B. Mulak**
Ex. Minister of State (Govt. of Maharashtra)
Finance & Planning, Energy, Water Resourses,
Parliamentary, Affairs & Excise
Hon. Secretary, BCYRC and BMCT



**Hon'ble**
**Smt. Prerna R. Mulak**
Managing Director,
B.C.Y.R.C. & B.M.C.T.,
Nagpur

### An introduction to BCYRC

Backward Class Youth Relief Committee was founded in 1974 with the primary objective of upliftment of students belonging to Backward Class and Rural Areas. Founded by Late Shri Bhausaheb Mulak, Ex. Minister, Government of Maharashtra, Ex-Mayor of Nagpur Municipal Corporation and a man with vast experience and vision. This organization has grown by leaps and bounds. Shri Rajendra Mulak, Minister of State (Government of Maharashtra) and the Secretary of BCYRC, is an enterprising, dynamic and innovative personality. He is the catalytic force behind the progress of the organization and is a set example of leadership.



**Hon'ble Yashraj R. Mulak**
Treasurer, BCYRC & BMCT, Nagpur



**Shri D. K. Mahadik**
Member of
Local Management
Committee
Bhiwapur Mahavidyalaya,
Bhiwapur



**Mrs. Padmaja**
**Shyam Dandge Patil**
Member of
Local Management
Committee
Bhiwapur Mahavidyalaya,
Bhiwapur



**Shri Padmakar Agrawal**
Member of
Local Management
Committee
Bhiwapur Mahavidyalaya,
Bhiwapur



**Dr. Jobi George**
Principal
Bhiwapur
Mahavidyalaya,
Bhiwapur

## महाविद्यालयाविषयी थोडेसे..........

आमच्या सर्व संस्थेचे संस्थापक, प्रवर्तक व आधारस्तंभ शिक्षणमहर्षी माननीय स्व. श्री. भाऊसाहेब मुळक आहेत. मा. भाऊसाहेबांनी ग्रामीण भागातील जनतेचे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक शैक्षणिक व राजकीय जीवन जवळून तर बधितलेच पण त्या जीवनाचा त्यांनी स्वतः अनुभव घेतला. त्यांचे व्यक्तिमत्व म्हणजे ग्रामीण व नागरी जीवनाचे एक सुसंगत एकजिनसी आणि रसाळ मिश्रण होय. मा. भाऊसाहेबांनी मागासवर्गीय व आर्थिकदृष्टया दुर्बल विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व सर्वांगीण उत्थानाकरिता सन १९७४ मध्ये 'बॅकवर्ड क्लास युथ रिलीफ कमेटी' ह्या संस्थेची नागपूर येथे स्थापना केली. महाराष्ट्राचे दिवंगत नेते व मुख्यमंत्री श्री. मा. सा. उर्फ दादासाहेब कन्नमवार हे गरीब घराण्यात जन्मलेले पण राजकारणात उत्तुंग शिखर गाठलेले वैदर्भीय नेते हे मा. भाऊसाहेबांचे प्रेरणास्थान व राजकीय गुरु होते.

माननीय स्व. श्री. भाऊसाहेब मुळक यांनी स्वतःला शैक्षणिक चळवळीसाठी वाहून घेतले आहे. व्यावसायिक शिक्षणाची गरज लक्षात घेऊन कर्मवीर दादासाहेब कन्नमवार अभियांत्रिकी महाविद्यालय, १९८३ साली नागपूर पॉलीटेक्निक व १९८९ मध्ये आयुर्वेद महाविद्यालय ह्या संस्थांची नागपूर येथे स्थापना केली. ह्या नामवंत संस्थेत तांत्रिक व वैद्यकीय महाविद्यालयीन उच्च शिक्षणाचा लाभ विदर्भातीलच नव्हे तर पूर्ण देशातील विद्यार्थी घेत आहेत. बॅकवर्ड क्लास युथ रिलीफ कमिटीच्या माध्यमातून चालविल्या जाणाऱ्या नागपूर येथील ह्या संस्था माननीय श्री. भाऊसाहेब मुळक यांच्या तडफदार व्यक्तिमत्व आणि उत्कृष्ट कार्यशैलीमुळे थोड्याच काळात भरभराटीस आलेल्या आहेत. त्यांनी कोट्यावधी रुपये खर्च करुन हया संस्थांच्या भव्य वास्तू, प्रांगणे, मुलामुलींची वसतीगृहे, ग्रंथालये, क्रीडांगणे, व अद्यावत उपकरणांनी सज्ज प्रयोगशाळा उभारलेल्या आहेत. ही सर्व महाविद्यालये उच्च शिक्षाविभुषीत प्राध्यापकांनी युक्त आहेत. संस्थेच्या आयुर्वेद महाविद्यालयात रुग्णांकरिता आंतरविभाग व बाह्य विभाग असून गरीब मागासवर्गीय जनता ह्या दवाखान्यात विनामूल्य लाभ घेत आहेत.

वरील महाविद्यालयीन संस्थांचे कार्य लक्षात घेऊन बॅकवर्ड क्लास युथ रिलिफ कमिटी, नागपूर ह्या शैक्षणिक संस्थेला महाराष्ट्र शासनाने ग्रामीण भागात उच्च शिक्षणाचा प्रसार व प्रचार करण्याकरिता प्रोत्साहित केलेले आहे. आपल्या उमरेड ह्या जुन्या निर्वाचन क्षेत्रातील जनतेचे ऋण फेडण्याच्या दृष्टीने व विशेषतः ह्या विभागातील मान्यवरांच्या विनंतीनुसार संस्थेचे संस्थापक – अध्यक्ष माननीय भाऊसाहेब मुळक यांनी भिवापूर ह्या ग्रामीण भागात सन १९९० साली भिवापूर महाविद्यालय भिवापूर स्थापन केले. भिवापूर क्षेत्रातील कमकुवत मागासवर्गीय व होतकरु विद्यार्थी कला, वाणिज्य व विज्ञान शाखांमध्ये महाविद्यालयीन उच्च शिक्षणाचा लाभ घेत आहेत. विद्यार्थ्यांना सर्व शैक्षणिक सवलती उपलब्ध असून विशेषतः पूर्ण वर्गाकरिता विद्यार्थ्यांना पुस्तके देण्याची व्यवस्था केलेली आहे. सन १९९५–९६ सत्रापासून महाविद्यालयाचे वर्ग संस्थेच्या नवीन इमारतीत भरत आहेत. महाविद्यालयाची शैक्षणिक सोईंनी उपयुक्त अशा भव्य वास्तूची निर्मिती प्रगती पथावर आहे. महाविद्यालयाच्या भव्य प्रांगणात मुलामुलींची वसतीगृहे, कर्मचाऱ्यांकरिता निवासस्थाने, अद्ययावत प्रयोगशाळा, क्रीडांगणे व भव्य ग्रंथालयांची बांधणी करण्याचा संस्थेचा संकल्प आहे.

मा. स्व. श्री. भाऊसाहेब मुळक यांनी उमरेड निर्वाचन क्षेत्रातील जनतेचे महाराष्ट्र विधानसभेवर प्रतिनिधीत्व करुन शासनात मंत्रीपद भुषविले हे सर्वांना माहीतच आहे. बॅकवर्ड क्लास युथ रिलीफ कमेटीच्या माध्यमातून ह्या ग्रामीण भागातील जनतेचे ऋण फेडण्याच्या दृष्टीने खालील योजना आखलेल्या आहेत. भाऊसाहेबांनी योजलेल्या प्रकल्पांना पूर्णत्वास नेण्यास व संस्थेच्या विकासासाठी त्यांचे चिरंजीव मा. राजेंद्रजी मुळक उर्फ बाबासाहेब (माजी राज्यमंत्री) सातत्याने प्रयत्नरत असतात. त्यांच्या तडफदार व कार्यप्रवण शैलीमुळेच संस्थांची दिवसेंदिवस भरभराट होत आहे हे लक्षात घ्यावेच लागते. संस्थेचे माननीय सचिव माजी मंत्री श्री. राजेंद्र मुळक साहेब यांनी संस्थेच्या

शिक्षण वृक्षाला एक नवीन पालवी दिली. खेड्यातील तरुण हा स्वबळावर खंबीरपणे उभा असला पाहिजे यासाठी माननीय माजी राज्य मंत्री राजेंद्र मुळक साहेब यांनी अथक परिश्रमातून महाविद्यालयाच्या शैक्षणिक बाबींकडे लक्ष पुरविले व वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य केले. त्यांच्या मार्गदर्शनातूनच भिवापूर महाविद्यालयाचा 'निर्धार' पक्का झाला. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या अंगी असलेले साहित्यिक व कलागुण स्पष्ट व्हावे व विद्यार्थ्यांमध्ये लेखनाच्या संदर्भात नवा जोश निर्माण व्हावा म्हणून 'निर्धार' ची संकल्पना पुढे आली. वाचकांना हा महाविद्यालयीन 'निर्धार' प्रचंड आवडेल अशी अपेक्षा आहे.

* नॅक चे 'ब' श्रेणीत मुल्यांकन.
* ग्रामीण भागातील सुशिक्षित महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी यथायोग्य सहकार्य.
* ग्रामीण भागात महिला गृहद्योग व शिवणकला शिकण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्याची योजना.
* राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत विविध कार्यक्रम राबविल्या जात आहेत. या योजनेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ परीक्षेसाठी प्रोत्साहन गुण दिले जातात तसेच आंतर महाविद्यालयीन खेळ/क्रीडा स्पर्धात भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन गुण दिले जातात.
* महाविद्यालय परिसरात सामान्य जनतेच्या उपयोगासाठी भव्य सभागृह बांधण्याचा मानस आहे.
* भिवापूर महाविद्यालयात अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र इ. विषयांचे पदव्युत्तर अभ्यासक्रम (एम.ए.) सुरु आहेत.
* भिवापूर महाविद्यालयात बी.लिब., एम. कॉम., एम.बी.ए., एम.एस.सी व विविध व्यावसायिक अभ्यासक्रम सुरु करण्याचा विचार आहे. शहरी विद्यार्थ्यांप्रमाणेच ग्रामीण विद्यार्थ्यांना सर्वांगिण विकासाचे शिक्षण उपलब्ध व्हावे म्हणून संस्था प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहे.
* आंतरराष्ट्रीय स्तराचा तरंग तलावाचे – काम पूर्ण झाले असून आंतर महाविद्यालयीन स्पर्धेचे आयोजन करण्याचा संस्थेचा मानस आहे.
* भव्य जिम्नॅस्टिकची सोय उपलब्ध आहे.
* इनडोअर स्टेडीयम व भव्य क्रीडांगण उपलब्ध आहे.
* मुलींसाठी स्वतंत्र वसतीगृहाची सोय.
* महिला अध्ययन व सेवा केंद उपलब्ध आहे.
* एन.सी.सी पथक कार्यरत आहे.
* मुलींकरीता निःशुल्क ज्युडो कराटे प्रशिक्षण सुरु आहे.
* मुलींकरीता निःशुल्क फॅशन डिझाइनिंग अभ्यासक्रम उपलब्ध आहे.
* स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र स्थापन करण्यात आलेले आहे.
* रोजगाराच्या संधीसाठी महाविद्यालयात परिसर मुलाखतीचे आयोजन केले जाते.
* संगणक व इंटरनेट प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध आहे.
* संस्थेतर्फे के.डी.के. इंटरनॅशनल स्कूल ची सुरुवात.
* **Bachelor of Vocational (B. Voc.)** या व्यावसायिक अभ्यासक्रमाची सुरुवात.

**डॉ. जोबी जॉर्ज**
**प्राचार्य**
**भिवापूर महाविद्यालय, भिवापूर.**

# संपादकीय

भिवापूर महाविद्यालय भिवापूर या ग्रामीण भागातील **'निर्धार'** हा वार्षिकांक वाचकांच्या हातात देतांना अतिशय आनंद होत आहे. या आधीच्या वार्षिकांकची प्रशंसा झाल्यामुळे हा वार्षिकांक फुलेल, बहरेल व फळास येईल यात शंका नाही. भिवापूर सारख्या ग्रामीण भागात असणारे महाविद्यालय व महाविद्यालयात शिक्षण घेणारे विद्यार्थी यांच्याच कल्पना, स्फूर्ती, प्रेरणा व प्रतिभेचे सहज सूंदर रुप या वार्षिकांकात सादर झाले आहे.

यशस्वीतेसाठी आमचे महाविद्यालयीन विश्वच प्रेरक ठरते. त्या दृष्टीने विद्यार्थ्यांमधील लेखन शैलीचा विकास होऊन समाजाप्रती असलेल्या ऋणानुबंधाची जाणीव या निमित्ताने करुन देण्याच्या दृष्टीकोणातून निर्धार या वार्षिकांकाची संधी आम्हाला मिळाली.

संस्थाचालक स्व. श्री. मा. भाऊसाहेब मुळक यांचे प्रोत्साहन, संस्थेचे सचिव माजी मंत्री ना. राजेंद्रबाबु मुळक व महाविद्यालयाचे कर्तबगार प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांच्या प्रयत्नांनी वरिष्ठ विभागात झाली. (बी.एस.सी.) विज्ञान शाखेची सोय तालुका स्तरावर या महाविद्यालयात झाली आहे. त्यामुळे कनिष्ठ शाखेपासून पदव्युत्तर कला शाखा व पदवीपर्यंत वाणिज्य, विज्ञान शाखेची सोय विद्यार्थ्यांना मिळाली आहे. संस्थेचे सचिव, माजी मंत्री मा. राजेंद्रबाबु मुळक यांनी ग्रामीण भागाशी जवळीक साधून समाजाची सेवा करण्याचा मार्ग पत्करला आहे. संस्थेचे ऋण कधीच विसरता येत नाही.

महाविद्यालयाने या भागात अन्यत्र कोठेही नसलेला पदव्युत्तर अभ्यासक्रम (समाजशास्त्र, अर्थशास्त्र व राज्यशास्त्र) उपलब्ध करुन दिले आहेत. सोबतच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी विज्ञान शाखेची सुरुवात कनिष्ठ व वरिष्ठ विभागात झाल्यामुळे या परिसरातील विद्यार्थ्यांना 'जो जे वांछिल तो ते लाहो' या सत ज्ञानेश्वरांच्या पसायदानातील उक्तीप्रमाणे वर्ग ११ वी ते पदवी कला, वाणिज्य व विज्ञान शाखेची संधी प्राप्त झाली आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणाचा हवा तो मार्ग पत्करावा या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा हे एक आव्हानच.

साहित्यिक व रसिकांच्या मधला दुवा साधून आम्ही 'निर्धार' रसिकार्पण करीत आहोत. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची साहित्य सृजन निर्धारच्या माध्यमातून साकार होतांना अंकातील सर्वच लेखनाशी आम्ही सहमत आहोत असे नाही. तसेच या वार्षिकांकात समाविष्ठ झालेले साहित्य ही विद्यार्थ्यांची स्वतःची व संकलित केलेली लेखनकृती आहे असे गृहीत धरुन त्यांच्या साहित्याला स्थान दिले आहे. मागील अंकाप्रमाणे हा ही अंक सर्वांना आवडावा अशी अपेक्षा.

वार्षिकांकातर्फे सर्वांना शुभकामना!

| संपादक | मुखपृष्ठकार | मार्गदर्शक |
| --- | --- | --- |
| कु. रचना नंदेश्वर (मराठी) | प्रणीत ठाकरे | डॉ. मधुकर नंदनवार |
| कु. पुनम गोंडीमेश्राम (इंग्रजी) | | डॉ. विनिता विरगंधम |

(या अंकातील सर्वच लेखांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.)

## बॅकवर्ड क्लास युथ रिलिफ कमिटी, नागपूर

र.नं. महा. १५२/७४ नागपूर.

## कार्यकारी मंडळ

| | | |
|---|---|---|
| १. सौ. सुमनमाला भाऊसाहेब मुळक | – | अध्यक्षा |
| २. श्री. वामनराव गोविंदराव मुळक | – | उपाध्यक्ष |
| ३. श्री. राजेंद्र भाऊसाहेब मुळक | – | सचिव |
| ४. श्रीमती श्रीलेखा राजन लांजेकर | – | सहसचिव |
| ५. श्री. यशराज राजेंद्र मुळक | – | कोषाध्यक्ष |
| ६. श्री. दिलीप कृष्णराव महाडीक | – | सदस्य |
| ७. श्रीमती पद्मजाताई श्याम दांडगे पाटील | – | सदस्या |

निर्धार

## भिवापूर महाविद्यालय भिवापूर, जि. नागपूर

दूरध्वनी क्र. २३२३४९ (एस.टी.डी. ०७१०६)

## महाविद्यालय विकास समिती - २०१७-१८

| | | |
|---|---|---|
| १. श्रीमती सुमनमाला भाऊसाहेब मुळक | – | अध्यक्षा |
| २. श्री. राजेंद्र भाऊसाहेब मुळक | – | सचिव |
| ३. डॉ. सुनिल कृष्णराव शिंदे | – | विभागप्रमुख |
| ४. डॉ. मोतीराज रामदास चव्हाण | – | प्राध्यापक प्रतिनिधी |
| ५. डॉ. अनिता विवेक महावादीवार | – | प्राध्यापक प्रतिनिधी |
| ६. प्रा. राजश्री ओ. पी. | – | प्राध्यापक प्रतिनिधी |
| ७. श्री. सुधाकर गणपत उईके | – | अध्यापकेत्तर कर्मचारी |
| ८. श्री. पद्माकर कुंजिलालजी अग्रवाल | – | स्थानिक सदस्य |
| ९. श्री. प्रभाकरराव चव्हाण | – | स्थानिक सदस्य |
| १०. श्री. दिलीप मोतीलालजी गुप्ता | – | स्थानिक सदस्य |
| ११. कु. स्नेहल राठोड (माजी विद्यार्थिनी) | – | स्थानिक सदस्य |
| १२. डॉ. मंगेश वसंतराव कडू | – | समन्वयक (नॅक) |
| १३. कु. निधी संजय साबळे | – | विद्यार्थी परिषद सचिव |
| १४. प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज | – | सदस्य सचिव |

# भिवापूर महाविद्यालय, भिवापूर

## महाविद्यालय प्रतिनिधी मंडळ

| | | |
|---|---|---|
| १. | प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज | अध्यक्ष |
| २. | डॉ. सुनिल कृ. शिंदे | प्रभारी प्राध्यापक |
| ३. | प्रा. अनिता महावादिवार | विद्यार्थी परिषद प्रभारी |
| ४. | डॉ. विजय दिघोरे | रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी |
| ५. | डॉ. नितीशा पाटणकर | सांस्कृतिक विभाग प्रमुख |
| ६. | प्रा. आदित्य सारवे | क्रीडा विभाग प्रमुख |
| ७. | गोलू जेठामल | विद्यार्थी क्रीडा प्रमुख |
| ८. | कु. नितू वाघ | सांस्कृतिक विभाग प्रतिनिधी |
| ९. | पंकज तिडके | रा.से.यो विद्यार्थी प्रतिनिधी |

## विद्यार्थी साहित्य मंडळ

कु. निर्मला निमजे

कु. अश्विनी लोखंडे

कु. अश्विनी दिघोरे

कु अपर्णा दुधे

आदेश मेश्राम

कु. प्रियंका ढबाले

## मार्गदर्शक

डॉ. मधुकर नंदनवार

डॉ. सुनिल शिंदे

डॉ. मोतीराज चव्हाण

डॉ. विनिता विरगंधम

डॉ. विजय दिघोरे

डॉ. अनिता महावादिवार

# भिवापूर महाविद्यालय, भिवापूर

## प्राध्यापक वृंद (वरिष्ठ विभाग) कला

| | | |
|---|---|---|
| १. | डॉ. जोबी जॉर्ज | प्राचार्य (इंग्रजी) |
| २. | डॉ. सुनिल कृ. शिंदे | प्राध्यापक (अर्थशास्त्र) |
| ३. | डॉ. मंगेश व. कडू | प्राध्यापक (राज्यशास्त्र) |
| ४. | डॉ. मोतीराज रा. चव्हाण | प्राध्यापक (इतिहास) |
| ५. | डॉ. मधुकर वि. नंदनवार | प्राध्यापक (मराठी) |
| ६. | डॉ. विजय शं दिघोरे | प्राध्यापक (समाजशास्त्र) |
| ७. | डॉ. राहील कुरैशी | प्राध्यापक (इंग्रजी) |
| ८. | प्रा. सोमेश्वर वासेकर | प्राध्यापक (इंग्रजी) |
| ९. | प्रा. आदित्य सारवे | प्राध्यापक (शारीरिक शिक्षण) |
| १०. | प्रा. राजश्री ओ. पी. | प्राध्यापिका (ग्रंथपाल) |
| ११. | डॉ. विनिता विरगंधम | प्राध्यापिका (इंग्रजी) |

## वाणिज्य विभाग वरिष्ठ व कनिष्ठ

| | | |
|---|---|---|
| १. | डॉ. अनिता महावादीवार | प्राध्यापिका वाणिज्य |
| २. | डॉ. राजेश बहुरुपी | प्राध्यापक वाणिज्य |
| ३. | प्रा. कु. वर्षा मेश्राम | प्राध्यापिका (वाणिज्य) घडयाळी तासिका |
| ४ | प्रा. चेतन हेडावू | प्राध्यापक (वाणिज्य) घडयाळी तासिका |

## कनिष्ठ विभाग

| | | | |
|---|---|---|---|
| १. | डॉ. किशोर घ. शेंडे | – | (राज्यशास्त्र, इतिहास) |
| २. | प्रा. उषा ना. चु–हे | – | (मराठी, समाजशास्त्र) |
| ३. | डॉ. वैशाली प्र. रहाटे | – | (इंग्रजी, अर्थशास्त्र) |
| ४. | प्रा. सागर यादव | – | विज्ञान |
| ५. | प्रा. स्वप्निल डाखोळे | – | विज्ञान |
| ६ | प्रा. ज्योती बान्ते | – | मराठी |
| ७ | प्रा. चेतना ठाकरे | – | वाणिज्य |

## वरिष्ठ विभाग - विज्ञान शाखा

| | | | |
|---|---|---|---|
| १. | डॉ. नितीशा पाटणकर | – | प्राध्यापिका (प्राणीशास्त्र) |
| २. | डॉ. सारंग धोटे | – | प्राध्यापक (रसायनशास्त्र) |
| .3. | प्रा. अमित काळबांडे | – | प्राध्यापक (रसायनशास्त्र) |

## शिक्षकेतर कर्मचारी वृंद

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. सुधाकर ग. उईके | – | वरिष्ठ लिपीक |
| २. | श्री. संजय मेश्राम | – | कनिष्ठ लिपीक |
| ३. | श्री. अमोल वि. भगत | – | कनिष्ठ लिपीक |
| ४. | श्री. शंकर को. फेंडर | – | शिपाई |
| ५. | श्री. रत्नाकर रा. कन्नाके | – | शिपाई |
| ६. | श्री. अ. जफार अ. गफ्फार | – | शिपाई |
| ७. | श्री. गुलाब र. गेडेकर | – | ग्रंथालय परिचर |
| ८. | श्रीमती सविता म. झोडापे | – | शिपाई |
| ९. | श्री. गणेश शहाणे | – | प्रयोगशाळा परिचर |
| १०. | कु. हर्षलता बोडे | – | प्रयोगशाळा सहाय्यक |
| ११. | कु. जीजा पराते | – | प्रयोगशाळा परिचर |
| १२. | श्री. खुशवंत दमके | – | प्रयोगशाळा परिचर |

# क्षणचित्रे



आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग प्रशिक्षण देतांना
योग गुरु मा. राजेन्द्र शेंदरे



स्वातंत्र्यदिना निमित्त महाविद्यालयात पथनाट्य
सादर करतांना महाविद्यालयीन विद्यार्थी



अर्थशास्त्र विभागा अंतर्गत कार्यक्रमात अध्यक्षीय
भाषण करतांना प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज



राष्ट्रीय सेवा योजना युवावेध सप्ताहा अंतर्गत
आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन




२ ऑक्टोबर गांधी जयंती निमित्त रॅलीची सुरुवात
करतांना प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज



राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीर अड्याळ येथे
उद्घाटन प्रसंगी भाषण देतांना उद्घाटक
डॉ. विनय उपाध्याय नुतन आदर्श महाविद्यालय उमरेड

# क्षणचित्रे




महाविद्यालयाच्या एन.सी.सी. पथकासोबत
प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज व एन. सी.सी. प्रमुख
डॉ. विनीता विरगंध्म



वार्षिकोत्सवाच्या उद्‌घाटन प्रसंगी मार्गदर्शन करतांना
फार्मसी कॉलेज उमरेडचे प्राचार्य डॉ. पुरोहित



वार्षिकोत्सव प्रसंगी आयोजित रांगोळी स्पर्धेचे
निरीक्षण करतांना फार्मसी कॉलेज उमरेडचे प्राचार्य
डॉ. पुरोहित, मा. अग्रवाल व मान्यवर



राष्ट्रीय सेवा योजना शिबीर प्रसंगी श्रमदान करतांना
राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक



जागतिक एड्स दिनानिमित्त पथनाट्याच्या माध्यमातून
समाज जागृती करतांना महाविद्यालयीन विद्यार्थी



राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीर प्रसंगी रक्तगट
तपासणी करतांना ग्रामीण रुग्णालय भिवापूर व
सोमनाळा येथील डॉक्टरांची चमू

# 'निर्धार' वार्षिकांक
# मराठी विभाग २०१७ - १८

## विद्यार्थी संपादक



**कु. रचना नंदेश्वर**

## मार्गदर्शक
**प्रा. डॉ. मधुकर नंदनवार**




## ' कधी '


गुलाब कागदावर कोरु नकोस कधी
नजरेत काजळीच्या मला शोधू नकोस कधी
मी असेन काटा बनुन जीवनात एकटा
जीवनात फूल शोधू नकोस कधी.
फुलणारे आढाळ डोळ्यात ठेव तु
होतात अपयश शोधू नकोस कधी
येतील अनेक, दुष्काळी दुःखांचे पाऊस
पावसात अश्रू शोधु नकोस कधी
तु होशील आभाळात पतंग उडान पक्षी
भरारीत उंची शोधू नकोस कधी
मातीसी ठेव नाते यशात तुच तुझ्या
नजरेत काजळीच्या मला शोधू नकोस कधी
गुलाब कागदावर कोरु नकोस कधी.

कु. रचना नंदेश्वर
बी.ए. द्वितीय

## ' माय '

आई तुझ्यासाठी मी, सांग काय बोलावे
वाटते सदा तुझी मी पायधूळ व्हावे ।
तु सर्वस्व आहे आई, तु विश्वाची निर्माती
पाखरेही आनंदात, गाणे तुझे गाती ।
पाठीवर तुझा हात, देतो जगाया आधार
आई तू गं विठूच्या मंदिराचा पार ।
तुझ्या सोज्वळ मनात सारे माफ गुन्हे
माय तुजवीण राहते, अंगण सुने सुने ।
आई तु गं दुर्गा, आई तु भवानी
माझ्या आयुष्याची सुंदर कहाणी ।
कधी पाठवणार नाही, वृध्दाश्रमात आई
हा तुझा लेकरु गं, देतो तुज ग्वाही ।
तु माझी माय, तुच गं विठाई
ह्रदयात बसलीस, तुच ठायी ठायी ।।

कु. प्रिया मांढरे
बी.ए. प्रथम



## सुविचार

* जगातील प्रत्येक वस्तू सुंदर असते, फक्त पहाण्याचा दृष्टीकोन चांगला असावा.
* या जगात वाट दाखवणारे अनेक जण असतात पण चालणारे आपण मात्र एकटेच असतो.
* कोणतेही कार्य अडथळ्यावाचून पार पडत नाही. शेवटपर्यंत जे प्रयत्न करीत राहतात त्यांनाच यश प्राप्त होते.
* तुमच्या जवळ जितके आहे तेवढेच सांगा ...... त्यापेक्षा जास्त वाढवून काही सांगू नका. जो कुणी दुसऱ्यांची सदैव इच्छा करतो त्याचे मन नेहमीच अशांत असते.
* जे व्यक्ती दुसऱ्याचे स्वातंत्र्य हिरावून घेतात त्यांना स्वतःच्या स्वातंत्र्यात राहण्याचा हक्क नाही.

कु शिल्पा शेगांवकर
बी.ए. द्वितीय

## मला जन्म घेऊ द्या

मातेच्या गर्भात असलेली कळी, जी लेक आहे
जन्म घेऊनी आई–बाबास बघण्यास उत्सुक आहे.
परी जगातील क्रुर वास्तव तिला माहित नसे
हे तिला कसे सांगावे मला कळत नसे.
आधुनिक तपासणी यंत्राने आईस तपासल्यानंतर कळले
होणारे मूल लेक आहे – लेक आहे
हे ऐकताच आई स्तब्ध राहते
पण बाबा म्हणतो तिला पोटातच
नाहिसे करावयाचे आहे
मी घाबरले व आईस गर्भातूनच म्हटले
नको माझी हत्या करु आई तुझी लेक वाचव
बाहेरच्या जगातील लोकांचे
लेकीविषयी विचार ऐकून मी घाबरले आहे
म्हणून आइ मी विनवित आहे
ए आई .................. ए आई ..................
मला तुला बघावयाचे आहे.
मला जन्म दे – तुझी लेक वाचव
जगास मी विनवित आहे, अहो हे थांबवा .....
लेकींना पोटातच मारु नका
आई बाबा ! ऐका माझी प्रार्थना
मी जन्मतःच शांत पडून राहीन
न मागेल दूध, न मागेल काही भूक लागली तरीही
अशा रितीने माझा लवकरच अंत होईल
पण आई तुला बघुनच मी शेवटचा श्वास घेईल
म्हणून माझे हे मागणे एकच
लेकिची तिच्या जन्माआधीच हत्या करु नका.
लोकांनाही मी विनविते
लेक वाचवा ......... लेक वाचवा .........

कु. प्रिया बोरकर
बी.एस.सी. प्रथम



## ' मुलगी वाचवा '

काय आहे रे माझा गुन्हा
सांग ना तुच रे देवा
तुझ्याकडे माझे दुःख मांडते
मुलगाच कां रे वंशाचा दिवा ?

कोवळी आहे रे कळी मी
अजुन जग नाही रे पाहिले
उमलण्यापुर्वीच तुम्ही मला
निराधार का रे करुन टाकले ?

जगामध्ये येताच तुम्ही मला
उघड्यावर टाकले,
असा अत्याचार करतांना
तुमचे मन नाही का रे दाटले ?



मुला–मुलींकरीता
लिंग चाचणी तुम्ही रे करता
मुलगी आहे हे कळताच
तुम्ही मला का रे मारुन टाकता ?

मुलगी आहे रे मी
मला सुदधा जगू द्या
हात जोडूनी सांगते रे
मुलगी वाचवा ........ मुलगी वाचवा ।।

कु. प्रणिता सावरकर
बी.एस.सी. तृतीय

## एक मैत्रीण असावी



एक मैत्रीण असावी
नेहमी हसणारी आणि हसवणारी
कंटाळा येईपर्यंत बडबडणारी
नाकावर ढिगभर राग असणारी
आपण नसलो की हिरमुसणारी आणि
दिसली की गालावर छान खळी पाडून हसणारी
कधी चुकुन न बघता पुढे गेलो तर
मागून आवाज देणारी
वेळप्रसंगी आपल्या मित्रांची समजूत काढणारी
वाकडं पाऊल पडतांना मात्र मुस्काटात लावणारी
प्रत्येक गोष्टीवर पार्टी मागणारी
जास्त नाही पण चॉकलेट वर निभावून घेणारी
सगळ्यांच्या घोळक्यात आपल्याला
सैरभैर शोधणारी
यशाच्या शिखरावर आपली पाठ थोपटणारी
सुखात मिसळून जाणारी
दुःखात साथ देणारी
कायम पाठीशी खंबीर उभी राहणारी ....
खरचं
अशी एक तरी जिवाभावाची 'मैत्रीण' असावी ... ।

कु. सुषमा मालोदे
बी.ए. द्वितीय



## शब्दांची शिकवण

शब्दांनीच शिकवलय
पडता पडता सावरायला,
शब्दांनीच शिकवलय
रडता रडता हसायला
शब्दांमुळेच होतो एखाद्याचा घात आणि
शब्दांमुळेच मिळतो एखादयाची आयुष्यभर साथ
शब्दांमुळेच जुळतात मनामनाच्या तारा आणि
शब्दांमुळेच चढतो एखादयाचा पारा.
शब्दच जपून ठेवतात त्या गोड आठवणी आणि
शब्दांमुळेच तरळते कधीतरी डोळ्यात पाणी
"म्हणूनच जो जीभ जिंकेल तो मन जिंकेल
आणि जो मन जिंकेल तो जग जिंकेल".

कु. सुषमा मालोदे
बी.ए. द्वितीय




## शब्द


शब्दांनीच शिकवलय माणसाला सावरायला
शब्दांनीच शिकवलय माणसाला हसायला
शब्दच रडवतात माणसाला
शब्दांमुळेच होतो माणसावर आघात
शब्दांमुळेच मिळते एखाद्याची आयुष्यभर साथ
शब्दांमुळेच जुळतात एकमेकांचे मन
शब्दच जपून ठेवतात त्या गोड आठवणी आणि
शब्दांमुळेच तरळते कधीतरी डोळ्यात पाणी
म्हणूनच जो शब्दांवर प्रभुत्व मिळवेल,
तोच मन जिंकेल आणि जो मन जिंकेल तोच
जग जिंकेल.

कु. निर्मला निमजे
बी.ए. द्वितीय

## कॉलेजमधील जीवन

असं नेहमी आपल्याबरोबर का होतं
पहिल्यांदा सर्वांप्रमाणेच कॉलेज बोर वाटतं।
अचानक एक दिवस तो गोड चेहरा वर्गात येतो
आणि अख्खी कॉलेज लाईफ बदलवून टाकतो।
मग पकाऊ लेक्चर असले तरी वर्गात बसावेसे वाटते
रिझल्ट येत नसला तरी प्रॅक्टीकल करावेसे वाटते।
लायब्ररीमध्ये तासन तास भुर्रकन उडून जातात
पुस्तकातली नाही तरी मनातली चार पाने वाचून होतात।
एक्स्ट्रा लेक्चर ठेवले तरी आपली त्याला ना नसते
आता तर रविवारी पण कॉलेज मध्ये यायची तयारी असते.
असे करता करता ......
कॉलेजची वर्षे निघुन जातात
जाता–जाता डोळ्यामध्ये मात्र
विरहाची आसवे देऊन जातात।।


पुनम गोंडीमेश्राम
बी.ए. द्वितीय



## कुणीतरी असावं आपलं

पुन्हा पुन्हा त्या क्षणात
गुंतत असतं कुणीतरी
पुन्हा पुन्हा ओली पापणी
पुसत असतं कुणीतरी
आयुष्य पुढे जातांना ...... वळून
मागे पहात असतं कुणीतरी
हरवले ते सारे सारे
वेचत असतं कुणीतरी
वेडे होऊन प्रश्नांची उत्तरं
शोधत असतं कुणीतरी
उत्तर सारी ठाऊक तरी
वाट पहात असतं कुणीतरी
नको नको त्या आठवणींनी
घायाळ होत असतं कुणीतरी
जग सारं शांत झाल्यावरही
जागत असतं आपल्यासाठी कुणीतरी
कुणीतरी असावं आपल्याला
आठवणारा कुणीतरी असावं
मन जिंकणारा खरच कुणीतरी
असावा आपल्याला आपलं म्हणणारा ।।

प्रियंका राघोर्ते
बी.ए. द्वितीय



## " शेतकऱ्याचा जीव गेला "

कांद्याला काडी लावली, तंबारे वावरात सडली
सोयाबीनमध्ये गुरं घातली
एवढी सर्व बरबादी सरकारी धोरणामुळे आली .....
मार्केट यार्डात लिलाव ऐकून
मेथीची जुडी ढसा ढसा रडली
ते पाहून शेपू म्हणाली
जाऊ दे ताई, आपले तर केवळ भाव पडले
वांगे आणि बटाटे तर उकिरड्यात गाडले.
कोथिंबीर आणि पालकला कोणी पालक उरला नाही
मका तर दरवर्षी पडतो म्हणून यंदा पेरला नाही
वाल आणि वटाणा खुडायलाही महाग आहे
व्यापारी आणि अडते म्हणजे
आयत्या बिळात नाग आहे.
भेंडी म्हणते, साऱ्या जगण्याचीच कोंडी झाली
भांडवलदारांनी तर संसदेचीच मंडी केली
कारले म्हणाले, मी मुळातच कडू आहे
पण एफआरपीसाठी उसाच्याही डोळ्यात रडू आहे
फ्लॉवर आणि कोबीकडे सर्वांनीच फिरवली पाठ
ढोबळी मिरचीने लावली उरली सुरली वाट
मिर्ची म्हणाली, मी बोलले तर
सरकारला मिरच्या झोंबतील
आता शेतकरी स्वतःला टांगुन घेताय
उद्या तुम्हाला टांगतील
अच्छे दिनाच्या गाजराला
भलताच भाव आला
त्यांचा शपथविधी चालू असतांना
एका शेतकऱ्याचा जीव गेला
एका शेतकऱ्याचा जीव गेला ।।

कु. रचना नंदेश्वर
बी.ए. द्वितीय





इतनी सी बात हवाओं को बताए रखना,
रोशनी होगी चिरागों को जलाए रखना,
लहु देकर की जिसकी हिफाजत हमने,
ऐसे तिरंगे को सदा
अपनी आँखों मे बसाए रखना..

# वंदे मातरम्

## ' देश भक्ती गीत '

कोण पुढारी देशरक्षणा – 2
अमर, शहीद झाले ते .......
तयांना, मी श्रध्दांजली वाहिते ।।धृ।।
कोण बरे हे शिलवंत वीर
झाले बलवान आणि शूरविर
कोण पुढारी हसत मुखाने,
फासावर गेले ते .... ।।1।।
पवित्र मातेची शपथ घेऊनी
तिरंगा फुलांचे हार गुंफुनी
कोण आझाद हिंदुत्वाचा,
तिरंगा फडकविले ते ..... ।।2।।
कोण हे मंगल मंत्र बोलले
जय जवान–जय किसान वदत चालले
कोण गुणवान अमंचे पुढारी
नारा हा लाविले ते ।।3।।
जागे करुनी या जग वृंदा
कवयित्री मी सांगते बंदा
कोण पुढारी या देशाची
धुरा सांभाळील ते ...... ।।4।।


अश्विनी मेश्राम
बी.एस.सी. द्वितीय


## उपकार


विसरु नको रे त्या आई – वडिलांना
ज्यांनी घडविले रे तुला
त्यांनी सहन केल्या असह्य वेदना
तेव्हाच पाहायला मिळाले रे हे जग तुला ।।
आपल्या मुखातील घास भरवून
ज्यांनी केले रे मोठे तुला
ज्यांनी पाजिले अमृत
त्यांनीच दिले रे संजीवन तुला ।।
ज्यांनी कष्ट करुनी दिले सुख
का दिले रे त्यांच्याच वाट्याला तु दुःख
ज्यांनी पसरली तुझ्या मार्गावर प्रेमाची फुले
कां टाकले रे त्यांच्याच मार्गावर तु काँटे ।।
गमावूनी तु आई वडिलांना
जरी कमाविले तु लाख
तुझे हे लाख म्हणजे
ठरतील रे राख ।।
पैसे खर्च करुनी मिळेल रे सर्व काही तुला
पण ठेव रे दृष्ट माणसा हे तु ध्यानात
नाही मिळणार रे विकत तुला
आई–वडील बाजारात ।।
विसरावे तु सर्व काही
न विसरावे तु त्यांना
ज्यांचे आहेत तुझ्यावर
अगणित उपकार त्यांना ।।
ठेव सदा तु आठवण
अशा या पुज्य आईवडिलांच्या चरणाची
ना द्यावे त्यांना कधी अंतर
जरी श्वास देईल रे तुला विराम ।।
ते आठव रे मानवा
त्यांचे तु उपकार
त्यांचे रे उपकार ......


कु. तत्वप्रणाली तिरपुडे
बी.एस.सी. प्रथम











## गोडवा

मिठाच्या बरणीला कधीच
मुंग्या लागत नाही पण
साखरेचा एक कण जरी
असल्या तरी मुंग्या लागतात
माणसाचं ही तसच आहे
गोडवा जिभेवर असेल तर
सारेच धावून येतील, पण
मिठासारखा खारटपणा असेल तर
कोणीच येणार नाही ।
ज्याची वाणी गोड त्यांचे
आयुष्य गोड असते ।

कु. अस्मिता वावरे
बी.ए. तृतीय

## " यश "

तलवार तळपाविशी
जिंकावयास नेण्याशी
धरीला जो निश्चयी
तो सार्थकी लावण्याशी ।।

अगाध शक्ती एकटवी,
होई ती महाशक्ती
उघडून येई बाहुतुनी
संकटाला लढण्याशी ।।

करीया तव प्रयत्न
होई ते परीपूर्ण
धरीला जो ध्यास
नेई यश ओलांडण्यास ।।

कु. निधी साबळे
बी.ए. तृतीय

## भिमा तुझ्या कर्जाचे ऋण मी फेडू लागलो ।




तुमच्यामुळे आज हातात हात घेऊन फिरु लागलो
म्हणून भिमा तुझ्या कर्जाचे ऋण मी फेडू लागलो।
एवढे केले आम्हा बहुजनांना महान
आपल्या नजरेने सारे जग पाहू लागलो
म्हणून भिमा तुझ्या कर्जाचे ऋण मी फेडू लागलो।
शिक्षण घेण्याचा पण अधिकार नव्हता आम्हा
तुझ्या या घटनेने उच्च शिक्षण घेऊ लागलो
म्हणून भिमा तुझ्या कर्जाचे ऋण मी फेडू लागलो।
झोपडीत पण राहण्याचा अधिकार नव्हता आम्हा
तुमच्यामुळे आज पक्क्या घरात राहू लागलो
म्हणून भिमा तुझ्या कर्जाचे ऋण मी फेडू लागलो।
चातुवर्णाच्या गुलामगिरीतून काढले आम्हाला बाहेर
दिलं असं संविधान, माणूस म्हणून
माणसासारखं जगू लागलो
म्हणून भिमा तुझ्या कर्जाचे ऋण मी फेडू लागलो।
सूर्यासारखा स्वतः जळलास आणि आमच्या
अंधारी जीवनात आणला प्रकाश
म्हणून भिमा तुझ्या कर्जाचे ऋण मी फेडू लागलो।
"शिका, संघटित व्हा, संघर्ष करा"या शिकवणीवर
चालू लागलो आम्ही
म्हणून भिमा तुझ्या कर्जाचे ऋण मी फेडू लागलो।
तुझ्या या पायवाटेने चालून आज संपूर्ण भारत देश
घडवू लागलो
म्हणून भिमा तुझ्या कर्जाचे ऋण मी फेडू लागलो।
तुझ्या या उपकाराचे ऋण मी आयुष्यभर फेडू
शकणार नाही,
पण हळु–हळु का होईना तुझ्या या कर्जाची
परतफेड करु लागलो
म्हणून भिमा तुझ्या कर्जाचे ऋण मी फेडू लागलो।
म्हणून भिमा तुझ्या कर्जाचें ऋण मी फेडू लागलो।

मिथुन दुपारे
बी.ए. प्रथम

## बाबा



शेतात राबतोय माझा बाप
प्रेम करण्यात त्याला नाहीच माप।
माझ्यासाठी केली त्याने आयुष्याची माती
काढल्यात त्याने कित्येक उपाशीच राती।
आईसंग भांडतांना जर झाला आवाज फार,
माझ्या कानाखाली पडायच्या दोन–चार
प्रेमापोटी त्याने परत कुशीत घ्यायचं
आणि समझवतांना मला उगी उगी रडायचं।
बघत होता स्वप्न फार मोठा माझा बाप
होणार माझा लेक मोठा साहेब
शाळेमध्ये असतांना आला तालुक्यात नंबर
हे पाहून माझा बाप झाला अनावर।
हिंमतीने दिले त्याने मला उभरुन
स्वतःच जीवन काढले गरीबीत राहून
बघितलं नव्हतं कधी बापास रडतांनी
सासुरास गेली ताई तो रडला जोरानी।

कु. अश्विनी घरत
बी.एस.सी. प्रथम



## आई

असे म्हणतात की हृदय हे जगातील सर्वात मोठे मंदिर आहे. हसणाऱ्या चेहऱ्यावर विश्वास ठेवण्यापेक्षा हसणाऱ्या हृदयावर विश्वास ठेवावा कारण असे हृदय फारच कमी लोकांजवळ असते. आत्मा आणि ईश्वर यांचा संगम म्हणजे आई.

शिल्पा शेगावंकर
बी.ए. द्वितीय


## काळजात माझ्या



अजुनी रुततात, काळजात माझ्या
आठवणी माझ्या मनातल्या
न कळले तुला, न कळले मला
डोळ्यात माझ्या स्वप्न सुखाचे रंगले
घायाळ मन तुला पाहूनी
गातो प्रेमाची गाणी,
आतुरलेले मन माझे
वाट तुझ्या येण्याची पाही
सहवासात तुझ्या मन कधिकचं गुंतून जाई
न कळले तुला, न कळले मला ।।1।।

रंग आपल्या मैत्रीचा प्रेमात जाहला
दिवसामागून दिवस गेलेत
नाते आपले घट्ट झालेत
पण का ? कुणास ठाऊक
तुझे नि माझे बोलणे सहज
नजरानजर व्हायची
पण त्यात पुर्वीची गोडी नसायची
न कळले तुला, न कळले मला ।।2।।

ठाऊक नव्हतं काय केलं ?
मी प्रेमासाठी मैत्रीचा बळी दिलाय
मी काय करावे ? मज कळेना
वाटते मृत्युलोकातही
भोगतोय नरकयातना
अजूनी रुततात काळजात माझ्या
आठवणी माझ्या मनातल्या ।।3।।



भाग्यश्री सोनटक्के
बी. कॉम. प्रथम

## मन

मन असावे प्रेमळ
मन असावे निर्मळ
मनातून करावे स्वतःवर प्रेम
मनातून करावे दुसऱ्यावर प्रेम
तेव्हा होते मनाची खरी ओळख
मन हे असावे शीतल, शांत
तेव्हा होते मनाची खरी ओळख
मनाने मनाच्या भावना ओळखाव्या
तेव्हा मन दुसऱ्याला ओळखते
मनाच्या भावना खोलवर असतात
त्या ओळखण्याची क्षमता मनात असावी
मन कोमल असते
मनाला दुःखाची सुखाची जाणीव असते.
मन कसं अस्वस्थ होते
मनाला सुख मिळालं
मनाला आनंद मिळाला तर
मन कसं नाचायला लागतं
मन हे सौंदर्याने सुंदर नसते
त्यात प्रेम असणे गरजेचे असते
मन संस्कारी असते पण
चांगले संस्कार मनावर व्हावे
मन हे चांगल्या संस्काराने घडते
ते घडवण आपल्या हातात असते
ते घडवावे लागते.
मन हे कल्पवृक्षासारखे विशाल असते
त्याची ज़ाणीव व्हायला हवी
मनात खूप काही दडलेले असते
ते फक्त मनालाच कळते
मन किती चंचल असते
मनाने मनावर मनातून प्रेम करावे.

कु. शिल्पा शेगांवकर
बी. ए. द्वितीय

## सुविचार संकलन

जो व्यक्ती समाजासाठी जगतो तो स्वतःचा आणि समाजाचाही लाभ करतो. पण जो व्यक्ती स्वतःसाठी जगतो तो समाजाची आणि स्वतःचीही अधोगती करुन घेतो.

संगतीने मनुष्य घडतो म्हणून संगत ही जीवनात महत्वाची असते आणि योग्य संस्कार या दोन गोष्टी मनुष्याने साधल्या तर खऱ्या अर्थाने आपले जीवन सार्थक होईल.

एखाद्या जवळ ज्ञान असुनही माणुसकी, संस्कार नसेल तर त्याच्या ज्ञानाला किंमत नाही याउलट जर एखाद्याकडे ज्ञान कमी असेल परंतु तो शीलवान, संस्कारी असेल तर तो खरा ज्ञानी.

धर्म, इमानदारीचा मार्ग हा भलेही खडतर असला तरी शेवट मात्र त्याची चव गोड असते. जसे कष्ट कडून मिळवलेली भाकर केव्हाही गोडच लागते.

मनामध्ये समाधान असेल तर आपण दुःखात सुद्धा सुख शोधू शकतो.

जन्म हा खूप जबाबदाऱ्या देत असतो आणि मृत्यु सगळ्या कर्तव्यातून मुक्त करीत असतो.

दगडावर घाव करुन जशी एक सुंदर मुर्ती बनते तसेच या जीवनाच्या दगडावर घाव, वेदना सहन करुनच या जीवनाची सुंदर मुर्ती बनवावी लागते.

दैनंदिन जीवनाच्या चित्रपटात प्रत्येक व्यक्ती कृत्य करीत असतो, परिस्थिती त्या व्यक्तीला कधी हिरो तर कधी दरोडेखोर बनवितो.

जेव्हा आपल्यामध्ये कोणत्याही वस्तुची जिद्द निर्माण होते ते जिद्द आपल्याला रात्री पण झोपू देत नाही. तेव्हाच एका साधारण व्यक्तीमधुन एक सफल व्यक्ती निर्माण होत असतो.

जितना हम आसमान में उडने के बारे में सोचते है उतना ही हमें धरती पर उतरने के बारे में सोचना चाहिए।

जिन्दगी के गहरे तालाब में तैरने को बडा मजा आता है फर्क सिर्फ इतना है जो इन्सान डर–डर के तैरता है वो डूब जाता है और जो इन्सान शांती से तैरता है वो बाहर निकलता है।

आजच्या युगातील मित्र पाण्याच्या लाटाप्रमाणे असतात, जिकडे पैशाचा जोर असतो तिकडे ते वाहत असतात.

मिथुन दुपारे
बी.ए. प्रथम

## "झाडे घेऊनच पुढे जाऊ या ....."


आई जसे जीवन जगतांना आवश्यक असते त्या सारखेच वृक्ष हे दैनंदिन जीवनात फार आवश्यक असते. आई आणि वृक्ष यात एक मोठे साम्य आहे आणि ते म्हणजे हे दोघेही निःस्वार्थ असतात. जन्म झाल्यापासून आई संस्कार करते, ती चालायला, बोलायला शिकवते. पण यावरच आपले जीवन व्यतीत होते का ? खरं तर आपण जगतो ऑक्सिजनवरच आता ऑक्सिजन हा शब्द वापरणे म्हणजे सर्वात महत्वाची भूमिका ती झाडांची आणि ती दिर्घकाळ म्हणजे मरेपर्यंत आपल्या सोबत असते. आपले जीवनच त्यावर आहे.


निसर्गाची जोपासना करायची म्हणजे काय करायचे तर झाडे लावायची, हा विचार सर्वात महत्वाचा आहे. वृक्षसंपदेविषयी जागृती लोकांमध्ये होणे आवश्यक आहे. वृक्ष लावणे हे अतिशय आवश्यक आहे. आणि ती काळाची गरज आहे. ही गरज पूर्ण करण्यासाठी सर्वांनी यात सहाय्य करायला हवं. झाडे घेऊन आपण पुढे जाऊ या. झाडांची मुळे पाणी व माती धरुन ठेवतात. नदीच्या पाण्यावरही त्याचा योग्य तो परिणाम होतच असतो. सर्वांना झाडाबद्दलचा विचार करायला पाहिजे आणि त्याविषयी कळकळ असली पाहिजे. आपण लावलेली झाडे वाढली, ती मोठी झाली, त्याला फळं–फुलं आली की आपल्याला किती आनंद होतो. आपल्याकडे घर, टिव्ही, गाडी एकदाची नसली तरी चालेल पण ऑक्सिजन दोन मिनिटे जरी मिळाले नाही तर आपण जगणार कां ? हेच ऑक्सिजन झाडे आपल्याला मिळवून देतात. एक झाड पुढच्या अनेक पिढयांना ऑक्सिजन, फुले आणि फळे देतच असतात, हे आपण कधीच विसरायला नको.

'झाडे लावा, झाडे जगवा.
झाडे आपले सोबती समजावे.
त्यांच्यावर आपले जीवन आहे.
"वातावरण शुद्ध होण्यासाठी झाडे वाचवावे".

कु. शिल्पा शेगांवकर
बी.ए. द्वितीय





## आठवणीतल्या पक्ष्यांचे अस्तित्व

निसर्ग, पर्यावरण ह्या गोष्टी आपण शाळेतच जाणल्या आणि त्यांचे अस्तित्व ही पाठ्यपुस्तकांपुरतेच मर्यादित राहिले. आपल्या प्रत्येकाचे बालपण हे चिऊ–काऊच्या गोष्टींनी अगदी निसर्गाशी संबंधित होते. पण जसजसे आपण मोठे होत गेलो, तसा हा चिवचिवाटही लुप्त होऊ लागला. खंत ही की योकडे आपण दुर्लक्ष केलं. या स्पर्धेच्या जगात स्वतःचं स्थान निर्माण करण्यात गुंतून गेलो. अगदी स्वार्थी बनुन गेलो. आपल्याला वाटते की माणसाने खूप प्रगती केली पण विचार केला का, या आभासी दुनियेच्या मागे पळण्यात आपण काय गमावलय ?

निसर्गातील प्रत्येक जीव खूप महत्वाचा आहे. प्रत्येकाच्या अस्तित्वानेच निसर्गाचा समतोल राखला जाईल आणि ही जैवविविधतेची साखळीही अखंड राहील. चिमणी, कावळे, साळुंखी, बगळे, पोपट, कोळसा, सातभाई, बुलबुल हे पक्षी नेहमी आपल्याला आजुबाजुला, शेतात दिसून यायचे. पण अलिकडे तितकेसे दिसत नाहीत. वाढतं कॉक्रिटीकरण आणि बेसुमार होणारी वृक्षतोड, नष्ट होत चाललेला अधिवास, असुरक्षित निवारा, अपुरे खाद्य, पाण्याची समस्या आणि मानवनिर्मित नॉयलॉन मांज्याचा वापर, फटाके त्यामुळे होणारी जखम व उपचार न झाल्यास होणारे मृत्यु आणि यातुन पुढे येणारे आकडे, पक्ष्यांच्या संख्येत होणारी प्रचंड घट दर्शवितात. या सर्व गोष्टींना फक्त आपणच जबाबदार आहोत. पक्ष्यांचं अस्तित्व टिकवून ठेवायचं असल्यास प्रथम त्यांचा अधिवास जपला पाहिजे. या अधिवासावर होणारे अतिक्रमण रोखले पाहिजे. चिमणी काही वर्षापुर्वी अगदी आपल्या सहवासात असायची, रोज दिसायची, सुरुवात ही तिच्या चिवचिवाटाने व्हायची, दिवस अगदी उत्साहात जायचा. आपल्या घरात ती घर करत असायची. आपली घरेही दगड पातीची, पाट्याची असायची आणि साहजिकच या दगड, पाट्यांच्या वळचणीत अनेक घरटी केली जायची. चिमणी त्यात अंडी द्यायची. तिला पिल्ले व्हायचे. आणि ती दिवसभर ती त्यांच्यासाठी दाणे आणण्यात व्यस्त असायची. या पिल्लांचा एकच कल्ला असायचा. आता कधी बधितलं का तुम्ही हे दृश्य. बघितलं असेल तर यापेक्षा दुसरं सुख नाही. घर तिथे चिमणी हे चित्र बदललयं. आपल्या घराच्या आंगणात, घरातही चिमणी अगदी सलगीने राहायची. हेच आपलं जीवन होतं. धान्य आणि तण हे चिमणीचं मुख्य खाद्य. त्याचबरोबर किटक आणि ईतर अनेक पदार्थ मादी आणि तरुण पक्षी फिकट गुलाबी, तपकिरी आणि राखडी रंगात असतात. तर नर काळा पांढरा आणि तपकिरी रंगाचा असतो. मांजरे, शिकारी पक्षी आणि अनेक सस्तन प्राणी त्यांचे भक्षक असतात. चिमण्यांच्या संख्येत झालेली घट हे खूप मोठं पर्यावरणीय नुकसान आहे. चिमणी नरापेक्षा मादी किंचित लहान असते. चिमणी एक सामाजिक पक्षी असून त्यांची घरटी समुहाने असतात. धुळीत व पाण्यात खेळतांना ते समुहाने दिसून येतात. मानवी वस्तीशी लवकर जुळवून घेणारा, अडचणीत झाडावर दिव्यांच्या मागे असे कुठेही घरटे करणारा हा पक्षी आहे. विणीचा हंगाम वर्षभर असणारा हा पक्षी गवत, कापूस, काड्या अशा वस्तूंपासून घरटी बनवतो. २० मार्च हा दिवस जागतिक चिमणी दिन म्हणून पाळला जातो.

असाच आपल्या अगदी जवळचा पक्षी म्हणजे कावळा. हा अगदी सहजपणे आजुबाजुला दिसतो. हा जरी सामान्य असला तरी त्याची बुद्धी असामान्य आहे. याच्या मेंदूची रचना ही माणसाच्या मेंदूशी मिळती जुळती असून तो माणसाचे चेहरे ही लक्षात ठेवतो. कावळा अत्यंत धूर्त असतो. आपण कधी निरीक्षण केले आहे का ? तो एका सरळ रेषेत उडतो. प्रामुख्याने फळे, मांस, पक्ष्यांची अंडी, उंदीर व जे कुजलेले म्हणून आपण फेकून देतो ते खाण्यात त्याला जास्त आनंद मिळतो. आपला परिसर स्वच्छ ठेवण्यात तो मदत करतो. म्हणून तो निसर्ग क्लिनर म्हणून ओळखला जातो. तो त्यांच्या



मजबुत चोचीने किडे, छोटे मांसे व बेडूक शिताफिने पकडतो. कावळ्याचा आवाज खूप कर्कश वाटतो. या बद्दल बऱ्याच अंधश्रद्धा ही लोकांच्या मनात आहेत. कावळा हा मृत्युदेवता यमाचा दूत मानला जातो. हिंदू धर्मात मनुष्याच्या मृत्युपश्चात विधीमध्येही त्यांला अनन्य साधारण महत्व आहे.

आज सहजपणे दिसणाऱ्या व आपल्या आजुबाजुला असणाऱ्या पक्ष्यांची माहिती पुस्तकातून करुन घ्यावी लागणं हेच खरं तर धोक्याची घंटा आहे. सन २०१२ मध्ये दिल्ली सरकारने चिमणी पक्ष्याला राज्यपक्षी घोषित करुन या लहान पक्ष्याचे महत्व अधोरेखित केलं. आपणही पुढाकार घेऊ या. शाळा, महाविद्यालये, आणि घर येथेच मुलांवर हे पर्यावरणीय संस्कार झाले तर प्रत्येकजण या चळवळीचा एक भाग बनेल. आणि या लहान सामान्य पक्ष्यांच्या असामान्य महत्वाची जाणीव होऊन खऱ्या अर्थाने त्याचे संवर्धन होईल.


१. आपल्या घराच्या आजुबाजुला, शेतात व माळरानावर पक्ष्यांसाठी खाद्य व पाण्याची सोय करा.

२. कृत्रिम घरटी बनवुन घराच्या परिसरात लावा. ते नक्कीच त्याचा स्विकार करतील.

३. वृक्षरोपण व संगोपन, जिथे झाड असेल तिथे नक्कीच पक्षी येतील.झाड लावतांना भारतीय जातीचे लावा.

४. रसायने व किटकनाशकांचा वापर टाळा.

कु. रचना नंदेश्वर
बी.ए. द्वितीय



## स्त्री भ्रूणहत्या




आजच्या या प्रगत समाजात स्त्री भ्रूणहत्या ही एक ज्वलंत समस्या बनली आहे. स्त्री भ्रूणहत्या ही ज्वलंत समस्या आजच्या समाजाला लागलेली एक प्रकारची महाकाय कीड आहे. ही दिवसें दिवस मोठ्या प्रमाणात वाढत चाललेली आहे. या समस्येने महाकाय स्वरुप धारण केलेले आहे. आजच्या या पिढीमध्ये आईच्या गर्भातच बाळाची हत्या केली जाते. आधुनिक काळापासूनच मुलगा हाच वंशाचा दिवा मानला जातो. ही समजुत आजच्या काळात प्रचंड प्रमाणात सुरु असलेली दिसून येते. आपल्या भारतात पितृसत्ताक कुटुंबव्यवस्था मोठ्या प्रमाणात आढळून येते. पितृसत्ताक कुटुंब व्यवस्थेमध्ये पिता हा कुटुंबाचा प्रमुख असून वारसा हक्क हा मुलालाच प्रदान केल्या जातो. आणि ही वंशपरंपरागत पद्धती पुढे सुरु असते. काही आदिवासी समाजात मातृसत्ताक कुटुंब व्यवस्था आढळून येते. आणि या व्यवस्थेत कुटुंबाची प्रमुख ही घरातील जेष्ठ महिला असून वारसा हक्क हा मुलालाच प्रदान केल्या जातो. आपल्या भारतात मातृसत्ताक पद्धती कमी असून पितृसत्ताक पद्धती मोठ्या प्रमाणात आढळून येते. समाजात मला मुलगाच हवा हा आग्रह या भारत देशामध्ये हजारो वर्षापासून आहे. समाजात मुलाला श्रेष्ठ दर्जाचे स्थान असते. तर मुलीला कनिष्ठ दर्जाचे स्थान प्राप्त होत असते. कालानुरुप याची साधने बदलली. आजही अनेक धर्मग्रंथामध्ये पुत्रकामेष्टी यज्ञ केल्याने मुलगा होतो असा समज आपल्या समाजात आधुनिक काळापासून आहे. काही काळानंतर तर मुलगा होत नसेल तर दुसरी बायको करावी असा प्रघात दिसतो. सोळा संस्कारांमध्ये मुलगा व्हावा म्हणून पुंसवन हा संस्कार केला जातो, असे चित्र आपल्या समाजात दिसून येत आहे. आजच्या काळामध्ये सोनोग्राफीचा वापर मुलगा होण्यासाठी होतो. म्हणजे मानसिकता जर कायम राहिली तर काळानुसार साधन बदलत जातील. व येणाऱ्या काळातील हे आव्हान खूप अवघड होत

जातील. व त्यामुळे मोठ्या प्रमाणात स्त्री भ्रूण हत्येचं प्रमाण वाढत जाईल. त्यासाठी स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासांठी प्रयत्न आणि उपाय करणे आवश्यक आहे. शासनाने लोकांची मानसिकता जाणून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ज्यांना एक किंवा दोन मुली आहेत असे लोक गर्भलिंग निदानाचा प्रयत्न करणे शक्यता अधिक असते.

प्राचीन काळापासून भारतीय समाजातल्या स्त्रियांना यांचे कुटुंब आणि समाजासाठी शाप मानले जाते. या कारणामुळे तांत्रिक प्रगतीच्या काळात भारतात अनेक वर्षापासून स्त्री भ्रूण हत्या होत आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार स्त्री पुरुष प्रमाण ९२६ ते १००० असे आहे. अल्ट्रासाऊंड तंत्राचा विकास १९ व्या दशकाच्या सुरुवातीला सेक्स डेरेक्टिनेशन चाचण्यांचा जन्म झाला होता. भारतीय समाजातील लोक मुलाला जन्म देईपर्यंत सतत प्रयत्नात असतात. लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि स्त्री भ्रूण हत्या रोखण्यासाठी भारत सरकारने स्त्री भ्रूण हत्या विषयी विविध नियम व नियमावली तयार केली. गर्भपाताद्वारे बाळाची हत्या करणे हा संपूर्ण देशभरात एक गुन्हा आहे. लिंग निर्धारण, चाचणी आणि गर्भपात करतांना विशेषतः मुलीची हत्या करणाऱ्या डॉक्टरांना दोषी ठरवले जाते. त्यामुळे समाजात मुलीच्या महत्वाबद्दल जागरुकता स्त्री भ्रूण हत्या रोखण्यासाठी प्रयत्न केले जाते. महाराष्ट्र सरकारने १९८८ ला 'गर्भलिंग निदान प्रतिबंध कायदा' तयार केला व महाराष्ट्र हे असा कायदा करणारे जगातले पहिले राज्य ठरले. पण या कायद्यांतर्गत गर्भवती महिलेस प्रथम आरोपी करण्यात आले. यामुळे स्त्रीवादी संघटनांनी यावर आक्षेप घेतला. अमेरिकेमध्ये गर्भलिंग निदान करणे गुन्हा नाही. असे असून सुद्धा तिथे स्त्री भ्रूण हत्या होत नाही. मग आमच्या या सुसंस्कृत देशात ही स्त्री भ्रुणहत्या का होते ? धार्मिक देशात ही स्त्री भ्रूणहत्या कां होते ? मुलीचे वाढते महत्व समाजाला का कळत नाही ? त्यांचे मुलीबद्दल मत परिवर्तन का होत नाही ? कोणत्याही दाम्पत्याला मुलगी नकोशी का वाटते ? हे वातावरण बदलण्यासाठी कोणी प्रयत्न का करत नाही ? या 'गर्भलिंग निदान प्रतिबंध कायदा' नुसार आता गर्भामध्ये मुली मारल्या जात नाही. तर गर्भाच्या बाहेर आल्यावर त्यांचा जीव घेतला जातो. ऐकण्याची वेळ बदलली पण मानसिकता का बदलत नाही ? हा प्रश्न अतिशय महत्वाचा आहे. आणि जो कोणी गर्भ लिंग निदान करुन स्त्री भ्रूणहत्या करतो त्याला ३ वर्षाची नव्हे तर फाशीचीच शिक्षा व्हायला हवी. तरच या भारतात स्त्री भ्रूणहत्येचे प्रमाण कमी होईल.

कु. अश्विनी दिघोरे
बी.ए. प्रथम



## मराठी भाषेचे संवर्धन

मराठी भाषा ही महाराष्ट्रातील सर्वात मोठी श्रीमंत ठेव. तिचे संवर्धन हेच ध्येय सर्वांनी बाळगावे. जर असेच चालत राहिले तर तो दिवस दूर नाही की मराठी भाषेचा लवलेशही उरणार नाही. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आपण प्रत्येकाने अगदी मनापासून अविरत प्रयत्न करायला पाहीजे. नविन येणाऱ्या व असणाऱ्या पिढीला मराठी भाषेच्या इतिहासा विषयीची आवड निर्माण करायला हवी. तिचे महत्व पटवून सांगायला हवे. त्यांच्या मनामध्ये साहित्यांविषयी व कवितांविषयी आवड निर्माण करायला हवी. मराठीमुळे अधोगती हा न्युनगंड त्यांच्या मनामधून दूर करायला हवा. प्रत्येक इंग्रजी शाळेमध्ये मराठीला दिलेले तिसरे स्थान नाहीसे करुन तिला प्रथम स्थान मिळवून द्यावे. यासाठी मराठी माणसाने मातृभाषेसाठी हा लढा देणे गरजेचे आहे. तरच तिचे खरे संवर्धन होईल असे मला वाटते. तसेच आजच्या पिढीला मराठी भाषेमुळेच आपली प्रगती होऊ शकते हे पटवून दयायला हवे. हे तितकेच अगत्याचे ठरेल.

नदी वाहतांना वेगवेगळी वळणे घेत असते. तशी मराठी भाषा वेगवेगळ्या भागात नवी लय धारण करते. मराठी भाषा म्हणजे मराठी माणसाच्या मर्मावर बोट ठेवणारी अशी ही मराठी भाषा.

खरं सांगू कां मैत्रिणींनो, मराठी भाषेच्या संवर्धनाकरीता प्रत्येक मराठी शाळा असो किंवा इंग्रजी शाळा. यामधुन आपल्या महाराष्ट्रातील संस्कृतीचा ठेवा जपणारे संत, कवी, लेख, साहित्यिक, वक्ते यांच्या लेखनीतून जागृती व्हावी यासाठी या सर्वांच्या महती सांगणे महत्वाचे ठरेल. तरच खरे संवर्धन घडून येईल.

मराठी ही व्यवहार भाषा व ज्ञानभाषा करण्यासाठी सर्वांनी झटावे. तिच्या वापराचे क्षेत्र विस्तृत केले पाहिजे. उत्तम साहित्य या भाषेत निर्माण झाले पाहिजे.


मराठी भाषा सुधारलेल्या वा वाढलेल्या भाषांच्या बरोबरीत बसत नाही कारण मराठी भाषा इंग्रजी भाषेसारखी विकसित झालेली नाही. काव्याने अथवा फक्त विचाराने भाषेचे संवर्धन होणार नाही तर भाषेचे संवर्धन व्हावे असे जर वाटत असेल तर ती प्रत्यक्षात उतरविणे गरजेचे आहे.

अहो, आपण जर विचार केला तर मी असे म्हणेल की , आपण सर्व मराठी माणसेच या मराठीचा नाश करण्यास कारणीभूत आहोत. याचे कारणही तसेच की आज प्रत्येकाच्या मानगुटीवर इंग्रजीचे भूत सवार झाले आहे ना ! जो तो आज आपल्या मुलाला मराठी शाळेत न टाकता इंग्रजी शाळेत प्रवेश देतांना दिसून येतो. याचे दुष्परिणाम असे झाले आहे की, त्या मुलाला इंग्रजी लिहिता–बोलता येते, पण मराठीची साधी बाराखडीही त्याला येत नाही. येणाऱ्या नविन पिढीला आपल्या या मातृभाषे पासून दूर राहावे लागत आहे. वास्तविक पाहता ही नवीन पिढीच मराठीचे संवर्धन घडविणारी असायला हवी पण आज आपणच या येणाऱ्या नविन पिढीच्या हातून या मराठी भाषेचा गळाच घोटायला लागलो आहोत.

या आपल्या भाषेविषयी आपल्या मनामध्ये कुणी न्युनगंड तयार केला की मराठी भाषेमुळे आपला विकास होणार नाही. आपण जे काही आहोत ते मराठी मुळेच. मराठी भाषेतून शिक्षण घेऊन आपण डॉक्टर, इंजिनिअर, कलेक्टर, कमिश्नर, अशा अनेक उच्च पदावर विराजमान झाले तरी सुध्दा आपला विश्वास या भाषेवर का बरं नाही हो.

नाही ........ नाही हे कुठे तरी थांबायला हवं.

कु. निर्मला निमजे
बी.ए. द्वितीय



## नात्यातील पर्यावरण

नातेसंबंधी ही संकल्पना प्रत्येक व्यक्तीच्या मानसिक जडणघडणीवर अवलंबून असते. काही नाती जोडून जपावी लागतात तर काही आपोआप जन्मापासून जोडलेली असल्याने ती जपली जातात. आपल्याबरोबर जन्माला आलेल्या नातेसंबंधांची ओळख आपली जन्मदात्री आई आपल्याला करुन देते. कोणतीही नाती मानसिक परिपक्वतेच्या निकषांवर तसेच आपल्या चांगल्या–वाईट अनुभवावर आधारीत असतात. नात्यातील सखोलता व त्यातुन जाणवणारी आपलेपणाची जाणीव यावरच नात्यातील पर्यावरण अवलंबून असते असे म्हटले तरी योग्य ठरेल.

आपल्याबरोबरच जन्माला आलेले नातेसंबंध सोडले तर बाकीचे नातेसंबंध आपल्या डोळ्यासमोर तसेच सकारात्मक किंवा नकारात्मक अशा दोन्ही बाजूने विचार करुन जोडलेले व जोपासलेले असतात. निखळ व निरिच्छ नातेसंबंध हे दोघांच्या उत्कट विचारसरणीवर आधारीत असतात. विचाराची प्रगल्भता तसेच संस्कृतपणा असेल तर या नातेसंबंधाची दृढता अधिक सखोल असते. निःष्कपट आणि निगर्वी बोलणे व वागणे यामुळे नातेसंबंध अधिक घट्ट होऊ शकतात. नात्यातील पर्यावरणाचा म्हणजेच शुध्दतेचा समतोल राखण्यासाठी त्यातील दृढता जाणून घेणे महत्वाचे आहे.

विश्वास व आपुलकी या दोन भक्कम पायावर नाती ठामपणे उभी असतात.. एकमेकांबद्दल आदराची व आपुलकीची भावना तसेच निखळ आनंद देण्याची व घेण्याची भावना हा यातील महत्वाचा दुवा आहे. या भावनाच आपल्याला हे नाते वृध्दिंगत करण्यास मदत करीत असतात. नात्यात परस्परांना त्यांच्या गुण–दोषांसकट स्विकारणे तसेच निरपेक्षतेची भावना, त्याचबरोबर परस्परांना सुखदुःखात साथ या गोष्टी नात्याची सखोलता दर्शवितात. आपल्या मनाचा एक कोनाडा आपल्या नकळत या नात्याने व्यापलेला असतो.

प्रत्येक व्यक्तीला त्याने मिळविलेल्या यशाबद्दल कौतुकाचे दोन शब्द ऐकले की, खूप आनंद होतो हा प्रत्येकाचा स्थायीभाव असतो. ते कौतुकाचे दोन शब्द व ते ही आपल्या जवळच्या नातलगाकडून ऐकले तर तो आनंद नातलगांनी जर आपल्या पडत्या काळात आपल्यामागे खंबीरपणे उभे राहून समस्या निवारण्यास मदत केली तर हे नाते जास्त घट्ट होते.

नाते शुध्दं, पवित्र व निखळ असेल तर स्त्री–पुरुष हा भेद गौण असतो. भिन्न वयाचे नातलग परस्परांचे चांगले मित्र – मैत्रिण असण्याची अनेक उदाहरणे आहेत. त्यांच्यात नात्याबरोबरच मैत्रीचेही धागे जास्त घट्ट असतात. स्वतःच्या तसेच नात्यातील मुलगा–मुलगी यांच्याशी संवाद साधला गेला तर त्या नात्यातील मैत्रीयुक्त मोकळेपणाची जाणीव झाल्यामुळे तो संवाद जास्त प्रभावी व परिणामकारक ठरु शकतो. वयात आलेला मुलगा–मुलगी हे आई वडिलांचे मित्र–मैत्रीण तर असतातच ; पण त्यांच्याशी संवाद साधतांना थोडेसे त्यांच्या कल्पकतेने घेण्याबरोबरच थोडासा त्यांच्यासारखा विचार केल्यास कितीतरी कौटुंबिक समस्या सुटू शकतात किंवा निर्माणच होऊ शकत नाही. पालक व पाल्य यांनी एकमेकांशी काही मर्यादा सांभाळून मैत्रीचे नाते जोडले व जोपासले तर दोन पिढयातील विचारांची दरी कमी होण्यास नक्कीच मदत होईल. त्याचबरोबर नात्यातील गोडवा अधिकच मधुर होईल. तसेच पाल्याने हे ही लक्षात ठेवले पाहिजे की पालक नुसते माता–पिता नसून आपले मार्गदर्शक, शिक्षक तसेच आपल्या सर्वांगीण प्रगतीचा ध्यास बाळगणारे इत्यादी विश्वासाद्वारे वागणूक ठेवली तर त्यांच्यात कधीच मतभिन्नता येऊ शकणार नाही.

आई–वडिलांनी देखील कोणताही पूर्वग्रह मनात न ठेवता आपल्या पाल्याच्या मित्र–मैत्रीण यांच्यासोबतही आपलेपणाने व मनमोकळेपणाने आनंद किंवा संवाद साधला तर मुलांच्या मनात आई–वडिलांच्या प्रती प्रेम तर वाढतेच, पण विश्वासही वाढीस लागतो. याचबरोबर आपल्या मुलाच्या मित्रपरिवाराची विचार करण्याची कुवत, आवाका, पध्दत, आकलनशक्ती, त्यांच्यावरील संस्कार याची ओळख होऊन त्यांच्या संगतीबद्दल आपल्या पाल्याला सल्ला देता येईल. यामुळे घराचे नंदनवन होण्यास वेळ लागणार नाही.

कु. प्रिया मांढरे
बी.ए. प्रथम

## संत विचाराची आवश्यकता

आज आपण सगळे बघतो की, आजचा मानव हा किती धकाधकीचे जीवन जगत आहे. आजचे युग हे तंत्रज्ञानाचे युग आहे. आज मानव हा स्वतःची कामे यंत्रमानवाकडून करुन घेतो. त्याचा दिवसच सकाळी उठल्यापासून ते संध्याकाळी घरी येईपर्यंत असा कामात जातो की घरच्यांना द्यायला त्याच्याकडे वेळच राहात नाही. आणि म्हणून मग कौटुंबिक वाद, ताणतणाव, स्त्रियांवरील अत्याचार, गुन्हेगारी इ. प्रकारात वाढ होत चालली आहे. आजच्या वातावरणात बदल झालेला नाही तर मानवाच्या वृत्तीतच बदल झाला आहे. आपण बघतो की पुत्रच पित्याचा वैरी होतो. म्हणून शांतीब्रम्ह एकनाथ महाराजांनी या कलियुगाचे वर्णन करतांना एका ओळीत म्हटले आहे,

**कलियुगाची दादा ऐकावी थोरी।**
**पुत्र तो होईल पित्याचा वैरी।। नाथ म.**

नाथ महाराजांनी म्हटल्याप्रमाणे आपण असे उदाहरण बघतो म्हणूनच मानवाला जर जगात शांतीपूर्ण, सौख्यपूर्ण, प्रेमाने जगायचे असेल तर त्याला संत विचारांची आवश्यकता आहे.

संत हे कृपाळू आहेत. ते स्वतः कष्ट सहन करतात. त्रास सहन करतात पण आपल्या उद्धारासाठी झटत असतात. त्यांची किर्ती आपण काय वर्णन करणार ?

**तुम्ही संत मायबाप कृपावंत ।**
**काय मी पतित किर्ती वाणु ।**

कारण संत या शब्दाचा अर्थ किंवा संत कोणास म्हणतात तर, शांतता व महानता ज्यांच्यात वास करते, लोक हिताकरीता विचरण करतात, जिकडे जातील तिकडे वसंत ऋतुसारखे वातावरण निर्मितात, त्यांचा स्वतःचा भवसागर संपलेला आहे व बाकी सर्वांना कोणताही हेतू न ठेवता भवसागरातून पार करतात. त्यांना संत म्हणावे.

**शांता महान्तो निवसन्ति सन्तो,**
**वसन्तवल्लोक हिंत चरतः।**
**तीर्णा स्वयं भीमभवार्णव जनान**
**अहेतुनान्यानपि तारयन्त। शंकराचार्य**

संत हे दयानिधी असतात. कोणालाही क्षमा करण्याची ताकद त्यांच्याकडे असते.

**संत तोचि जाना जगी ।**
**दया, क्षमा ज्यांचे अंगी ।। संत मुक्ताबाई**

संत मुक्ताबाई संतांची लक्षणे सांगतांना म्हणतात, संतांकडे दया, क्षमा हे गुण असावे. भेदभाव वृत्ती नसावी. ज्याप्रमाणे गाईची तहान भागवायची व वाघ हा हिंस्त्र पशु असल्यामुळे त्याला विष होऊन मारायचे असा भेद पाण्याकडे नसतो. उत्तमाचा भार वहायचा व अधर्माचा अव्हेर करायचा हा भेद पृथ्वीकडे नसतो.

**गाईची तृषा हरु । का व्याघ्रा विष होऊनी मारु।**
**ऐसे नेणची गा करु। तोय जैसे।**
**उत्तमाजे धरिजे। अधर्माते अव्हेरिचे।**
**हे काहिची नेणिजे। वसुधा घेवी । ज्ञानेश्वरी**

संतांकडून हा गुण जर घेतला तर संसारातील ही विषमता नष्ट झाली असती, भेदच राहिला नसता. कारण संतांसाठी लहान, थोर, नारी, नर असा कुठलाही भेद राहात नाही.

**यारे यारे लहान थोर ।**
**याति भलति नारी नर ।।**

संत हे फक्त सांगत नाही तर क्रियाही करुन दाखवतात. तुकाराम महाराज म्हणतात

**तैसे संत जगी । क्रिया करुनि दाविती अंगी ।।**

माऊली ज्ञानोबारायांचा तेव्हाच्या ब्राम्हण वृंदानी छळ केला, तुकाराम महाराजांना गाथा बुडवायला सांगितला, एकनाथ महाराजांच्या अंगावर एक यवन 108 वेळा थुंकला, तरीही त्या सर्व संतमंडळींनी त्यांना क्षमाच केली.

**संत जेणे व्हावे। जग बोलणे साहावे ।। संत मुक्ताबाई**

दैनंदिन जीवन जगत असतांना आपण या गुणांच्या, या विचारांच्या आधारे चाललो तर काहीच कठीण जाणार नाही. स्त्रियांवर मोठ्या प्रमाणात अत्याचार होत आहे परंतु संतांनी परस्त्री माते समान मानली. तुकाराम महाराज तर स्त्री ची विक्री करणाऱ्याला चांडाळ म्हणतात.

**कन्या गौ करि कथेचा विकरा ।**
**चांडाळ तो तया खरा नावे ।।**

म्हणून संत मोठे आहेत, करुणामय आहेत. आईप्रमाणे आपली काळजी वाहणारे आहे.

लेकुराचे हित वाहे । माऊलीचे चित्त।।

आपली वृत्ती जर परावर्तित करायची असेल तर संतांची आवश्यकता आहे. त्यांचे हे गुण घेऊन आपण चाललो पाहिजे. एखाद्याचे गुण स्विकारायचे असेल तर त्याची योग्यता माहित असणे आवश्यक आहे आणि संतांची योग्यता आपण बघितली कारण माणूस हा सामाजिक प्राणी आहे. म्हणून जशी संगती लाभेल तसे फळ त्याला मिळते.

**सत्संगती दुर्लभ संसारा।**
**निमिष दंडभरी एकऊ बारा ।। तुलसी**

सतसंगती दुर्लभ आहे. पण ती एकदा जरी घडली तरी जिवाचे कल्याण होते. उदा. नारदांची वाल्या कोळ्याशी थोडा वेळच भेट झाली. परिणामी वाल्या कोळी आद्य कवी वाल्मिक ऋषी झाले. ही ताकद त्यांच्याकडे आहे. त्यांच्या विचारात आहे. नारदांना वाल्याचा वाल्मिक बनवायला कुठल्याही अस्त्रशास्त्राची गरज भासली नाही तर त्यांच्या वृत्तीत बदल केला. मन परिवर्तन केलं. हे कोण करु शकतात ? तर फक्त संतच करु शकतात. आणि हाच खरा आपला विषय आहे की, आजच्या मानवांची वृत्ती अतिप्रगती, हव्यास इ. दुर्गुणांनी युक्त झाली आहे. सारासार विचार करण्याची बुद्धी त्याला होत नाही. आणि म्हणून जग एका वेगळ्या वळणावर येऊन ठेपले आहे. म्हणून मानवाचं रक्षण करायची ताकद संतांकडे आहे. आणि आपल्या महाराष्ट्राला तर पूर्वीपासूनच संतांचा वारसा लाभला आहे. कैवल्यसम्राट संत ज्ञानेश्वर महाराज, तुकाराम महाराज, एकनाथ महाराज, स्त्रीसंत – संत मुक्ताबाई, जनाबाई, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगे बाबा यांनी तर ग्रामगीतेची रचना करुन गहन ज्ञान सोप्या भाषेत लोकांपर्यंत पोहचवला व त्यांचे मन परिवर्तन केले. त्यांना सन्मार्गावर आणले व राष्ट्र सुखी करण्याचा प्रयत्न केला. अशा संतांचा वारसा आपण जपला पाहिजे. ते आपले आद्य कर्तव्य आहे. संत विचारांना धरुन चालणाऱ्या व्यक्तींच्या विचारांना मागासले म्हणू नये कारण तेच खरे उच्च विचार आहेत. म्हणून तो वारसा जपण्याचा प्रयत्न आपण सर्वांनी केला पाहिजे.

कु. नेहा सावरकर
बी.ए. प्रथम

## शेतकरी हा "जगाचा पोशिंदा"

"शेतकरी" हा शब्द ऐकल्याबरोबरच आपल्यासमोर आत्महत्या, कर्जबाजारीपणा हे दृश्य आपल्या समोर येते. शेतकरी पिकाचं उत्पन्न भरपूर घेता यावं म्हणून दिवस रात्र कष्ट करतो. पिकांचे संरक्षण करण्याकरीता तो रात्रभर जागा राहून नुकसान करणाऱ्या प्राण्यांवर नियंत्रण ठेवतो. एखाद्या प्राण्याने शेतकऱ्यावर हल्ला करुन ठार केले तर त्या शेतकऱ्याला मोबदला म्हणून आमचे सरकार पैसे देतात. आणि त्या प्राण्यांना शिक्षा होत नसते. पण एखादया प्राण्याने शेतकऱ्यावर हल्ला केल्यास त्या शेतकऱ्याने आपल्या बचावासाठी प्राण्याला ठार केले तर शेतकऱ्याला शिक्षा देण्यात येते. आमच्या सरकारने शेतकऱ्यांसाठी एक कायदा बनवून प्राण्यांपासून संरक्षण करण्यात यावे.

**शेतीसाठी पाण्याचा साठा उपलब्ध करुन देणे.**

शेतीमधून पिकाचे उत्पन्न चांगले येण्यासाठी वेळोवेळी पाण्याची गरज असते. खतांची गरज असते. अशावेळी सरकारने तलावे बांधुन, कालवे बांधुन शेतीला पाण्याचा पुरवठा करावा. विहिरी बांधुन दयाव्यात. शेतकरी हा निसर्गावर अवलंबून असतो. कधीकधी निसर्गाचा समतोल बिघडतो आणि त्याच्यामुळे शेतकऱ्याला नुकसानीचा त्रास होत असतो. पिकांचे भरपूर प्रमाणात नुकसान झाल्यामुळे शेतकऱ्याच्या आर्थिक समस्या खूप वाढतात. अशावेळी सरकारने नुकसान भरपाई योग्य दराने दयावी. शेतकरी निसर्गावर अवलंबून असल्यामुळे प्रत्येकवेळी चांगलेच उत्पन्न मिळेल याची शक्यता नसते. शेतकरी हा खूप कठीण समस्यांशी भांडत असतो. दिवसभर उन्हामध्ये कष्ट करुन रात्री पिकाला पाणी दयायला पिकांचं संरक्षण करण्यासाठी कशाचीही भिती न बाळगता ते जात असतात. मग ते थंडीचे दिवस असो की प्राण्यांची भीती असो. ते न घाबरता रात्री पण कष्ट करीत असतात. अशावेळी सरकारने पिकाच्या संरक्षणाकरीता मदत करावी. तसेच वीज वितरण ही रात्रीचा वेळापत्रक बदलवून दिवसाचे वेळापत्रक बनवून वीज वितरण करावी.

सतत नापीकी झाल्यामुळे, पिकाला योग्य दराने भाव न मिळाल्याने शेतकरी हा कर्जबाजारी होत आहे आणि

कर्जापासून मुक्त होण्यासाठी शेतकरी गळफास लावत असतात. म्हणजेच आत्महत्या करीत असतात. अशावेळी सरकारने आर्थिक मदत म्हणून कर्जमाफ करावे. शेतकऱ्यासाठी विविध योजना राबविण्यात याव्या. पाणी, वीज, खत, किटकनाशके अशा विविध वस्तुंचा साठा सरकारने सब्सिडी वर द्यावेत. सरकार प्रत्येक वर्षी नविन योजना शेतकऱ्यांसाठी आखत असतो. पण अशा योजना प्रत्येक शेतकऱ्यांपर्यंत पोहचत नसतात. त्या योजना ग्रामपंचायत मधील कर्मचाऱ्यांना तसेच ग्रामपंचायत मधील सदस्यांना माहित असतात. म्हणून प्रत्येक योजनेची माहिती प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत पोहोचावी म्हणून ग्रामपंचायत शेतकऱ्यांची सभा घेऊन पुरेपूर माहिती द्यावी व लाभाचे फायदे सांगावे. जेणेकरुन शेतकरी अशा योजनेचा लाभ घेऊन कर्जमुक्त व स्वतःचा विकास करुन घेतील.

शेतकरी हा "जगाचा पोशिंदा" आहे असे म्हटले जाते. म्हणजेच शेतकऱ्यांचं योगदान हे देशासाठी खूप महत्वाचे आहे. मग सरकारने सुद्धा शेतकऱ्यांच्या विकासासाठी त्यांना विविध योजनेचा लाभ करुन द्यावा. शेतकऱ्याच्या पिकाला योग्य दरात भाव मिळवून द्यावा. शेतकऱ्यांच्या मुलांना आधुनिक पद्धतीने शेती कशी करावी हे शिकवावे. तसेच शेतकऱ्यांना सुद्धा आधुनिक पद्धतीने शेती करण्याचा फायदा कसा होईल याबद्दल माहिती द्यावी. शेतकऱ्यांमध्ये स्पर्धा ठेवाव्यात. अशा विविध योजना व त्याचा लाभ कसा होईल, त्यांचा फायदा कसा होईल याबद्दल माहिती द्यावी. तसेच ग्रामपंचायत तर्फे प्रत्येक रविवार ला बैठक घेऊन शेतकऱ्यांसोबत चर्चा करावी.

तसेच कोणत्या पण शेतकऱ्याने जर इतरांपेक्षा जास्त उत्पादन घेतले असेल तर त्या शेतकऱ्याला ग्रामपंचायत मध्ये उपस्थित करुन त्याचा सत्कार करावा व इतर शेतकऱ्यांना जास्त उत्पादन घेण्याचे महत्व पटवून द्यावे. शेतकऱ्यांमध्ये स्पर्धा ठेवून शेतकऱ्यांचं मनोबल वाढवावं. जेणेकरुन शेतकरी कर्जमुक्त व गरीबीच्या दारिद्र्यातून निघेल अशाप्रकारे शेतकऱ्याला सरकारतर्फे वेळोवेळी मदत देण्यात यावी.

आजच्या काळात शेतकऱ्यांचे नेते हे शांत झाले आहेत. शेतकऱ्यांच्या पिकाला भाव नसला तरी येथील नेत्यांना काही फरक पडत नाही. सुरुवातीला अनेक नेत्यांनी मिळून शेतकऱ्यांवर माया दाखविली. त्यांचे प्रश्न सोडविले. अनेक संस्था स्थापन करण्यात आल्या. पण आताच्या काळात अशा कोणत्याही संस्था, असे कोणतेही नेते रस्त्यावर येऊन शेतकऱ्यांसाठी लढत नाही. स्वतःच शेतकरी वर्ग हा एकत्र येऊन कुठल्याही नेत्याचे वा संस्थेचे सहाय्य न घेता आपला हक्क बजावण्यास विशाल मोर्चे काढून सरकार विरुदध बंड करत आहेत.

अशाप्रकारे प्रत्येक शेतकरी हा एकत्र येऊन शेतकरी संघटना तयार करायला पाहिजे. तेव्हाच इथले सरकार शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण करेल. हीच वेळ आहे सरकारला एकीचं बळ दाखविण्याची.

मिथुन दुपारे
बी.ए. प्रथम



## पर्यावरण संतुलन व आजचा युवक

" श्रावण मासी हर्ष मानसी
हिरवळ दाटे चोहिकडे
क्षणात येती सरसर शिरवे
क्षणात येऊन ऊन पडे. "
वरती बघता इंद्रधनुचा गोफ दुहेरी विणलासे
मंगल तोरण काय बांधले नभो मंडपी कुणी भासे।।

"श्रावणमास" या बालकवीच्या कवितेमधून त्यांनी या श्रावण मासाबद्दल म्हणजेच एक प्रकारे निसर्ग या विषयावर त्यांचे अतिशय सुंदर मत मांडले. निसर्ग हा आपल्या जवळचा विषय आहे. दैनंदिन जीवन जगत असतांना आपण वेगवेगळ्या वातावरणात राहत असतो. आतापेक्षा पूर्वीचा काळ हा निसर्ग समृद्ध असा होता. म्हणून बालकवींची ही कविता ऐकून फार बरं वाटते. लयबद्धता, तालबद्धता निर्माण होते. तसं तर ही महत्वाची बाब असूनही आज पर्यावरण, प्रकृतीचे संतुलन का गेले हा विचार करण्याचा प्रश्न आहे. प्रकृती ही काही मानव निर्मित नाही आणि आपणही नाही भगवान श्रीकृष्ण गीतेत अर्जुनाला सांगतात की, ही सर्व प्रकृती मी निर्माण करतो व अंती हीच प्रकृती मी निर्माण करतो व अंती हीच प्रकृती माझ्यामध्ये लय पावते.

सर्व भूतानी कौंतेय प्रकृतीम यान्ती मामिकाम्।
कल्पक्षये पुनस्तानी कल्पादौ विसृम्यहम् ।।

म्हणजे प्रकृती ही आपल्या रचनेत नाही. पण तीचे संतुलन राखणे आपल्या हातात आहे. आणि हाच खरा मुद्दा मानवा समोर आहे. इतक्या झपाट्याने पर्यावरण संतुलन का बिघडले ? निसर्ग आपली माता आहे. आपण जिवंत आहोत ते फक्त त्यांच्यामुळे. आणि म्हणूनच संत तुकाराम महाराजांनी म्हटले आहे,

वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे।
पक्षी ही सुस्वरे आडविती।।
येणे सुखे रचे एकांताचा वास।
नाही गुण दोष अंगा येत।।

तुकाराम महाराज म्हणतात की ही वृक्षवल्ली, झाडे, येथील पशुपक्षी हे सर्व आमचे सोयरे आहेत. कारण ते कधीही इतरांना इजा करत नाही तर नेहमीच परोपकार करतात आणि म्हणूनच सुभाषितकार वर्णन करतात,

परोपकाराय फलन्ती वृक्ष।
परोपकाराय वहन्ती नद्य।
परोपकाराय दृहन्ते गाव।
परोपकारार्थ इदं शरिरम्।।

वृक्ष परोपकार करण्यासाठीच फळ धारण करतात, नदी ही परोपकारासाठीच वाहते, गाय ही परोपकार. करण्यासाठीच दुध देते. आणि आपण सुद्धा त्यांच्याकडून परोपकार हा गुण घेतला पाहिजे कारण आपले शरीर सुद्धा परोपकार करण्यासाठीच आहे. पण अशा या सोयऱ्या असणाऱ्या पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. त्याचे संतुलन बिघडत आहे याचे कारण कोण असू शकते तर फक्त मानवच.

आजच्या मानवाने अति प्रगतीच्या स्वार्थापोटी आपले वर्तन बिघडवले तर ते कसे ? तर मानव हा जागा मिळावी म्हणून वृक्षतोड करतो आणि त्या जागी आपलं बिऱ्हाड थाटतो. पण यात पर्यावरणाचा ऱ्हास होतो ही भावना सुद्धा त्यांच्या मनात येत नाही. आजचे युग हे अतिशय वेगवान युग आहे. आज मानव हा जास्त टेक्नॉलॉजीला महत्व देतो.

**Technology is most important than any other thing.** ही मानवाची अवस्था आहे. आणि म्हणूनच वेग वाढावा व गरज भागावी या दृष्टीने **use and throw** ही मेथड मानव वापरतो. परंतु ही वापरत असतांना पर्यावरणात आजु बाजुला किती प्लॉस्टिक साचते याची कल्पना आजचा युवक करत नाही. म्हणून आज मानवापेक्षा प्लॉस्टिकचाच कचरा जास्त दिसतो. हे प्लॉस्टिक मातीत कुजत नाही किंवा त्याचे खतही तयार होत नाही. पाण्यात टाकल्यास पाणी खराब होते. आणि पाणी हे जीवन आहे. दुषित पाणी पिल्यामुळे प्रकृती बिघडते. परिणामी सर्व खराब होत जाते. म्हणून या प्लॉस्टिकचे काय करावे हा एक मोठा प्रश्न आहे. म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात,

आपण तेवढे स्वच्छ राहावे, भोवती गलिच्छ वातावरणची पहावे ।
याने सुमंगलता कधी न पावे, तनमन होत दुषित।।

आजुबाजुला गलिच्छ वातावरण जर असेल तर मन व विचार दोन्हीही स्वच्छ राहू शकत नाही. म्हणून विचार महत्वाचे आहे.

## करु विचाराची शुद्धता
## तरच होईल देशाची भव्यता

विचारांची भव्यता महत्वाची आहे. आजची तरुण पिढी ही स्वैराचाराने वागत आहे. त्यामुळे पर्यावरण संतुलन बिघडते आहे. म्हणून आजच्या तरुण पिढीने सावध झाले पाहिजे नाही तर हा प्लॉस्टिकचा प्रदुषणाचा भस्मासुर आपल्याला गिळंकृत करुन टाकेन. निसर्गाचे सौम्य रुप, सौंदर्य जितके चांगले तेवढेच रौद्र रुप ही विनाशकारी आहे हे आपण जाणतो म्हणून ही परिस्थिती जाणून आपण पर्यावरण संतुलन राखण्यासाठी एकत्र आले पाहिजे. पूर्वी लोक किंवा ऋषीमुनी हे संन्यासाश्रम स्विकारत वनात राहत असत कारण वातावरण हे अतिशय अनुकुल होते. आज जंगले मानवाने नष्ट केली. त्यामुळे अनेक प्राण्यांच्या, पक्ष्यांच्या जाती नष्ट झाल्या. त्यामुळे पर्यावरणाचा विकास होऊ शकला नाही. म्हणून आता तरी जागे होणे आवश्यक आहे. पर्यावरण संतुलन राखायचे असेल तर झाडांची लागवड करणे आवश्यक आहे. **"झाडे, लावा झाडे जगवा"** या घोषवाक्या प्रमाणेच आपण ही गोष्ट आपल्या आचरणात आणली पाहिजे. रोज एकातरी वृक्षाची लागवड केली पाहिजे. जितके वृक्ष तोडले तितकेच लावले पाहिजे तरच पर्यावरण संतुलन राखले जाईल. पाण्याची स्वच्छता राखली पाहिजे. यासाठी तरुण पिढीने सजग व्हायला पाहिजे. प्लॉस्टिकची योग्य ती विल्हेवाट आपण लावली पाहिजे.

हे फक्त एका दिवसापुरतेच मर्यादित न ठेवता चिरकाल, शाश्वत ठेवायचे असेल तर आधी विचारातच हे बी पेरणे आवश्यक आहे. आणि यासाठी माऊली ज्ञानोबारायांनी म्हटल्याप्रमाणे आपण कृती केली पाहिजे.

**हे विश्वची माझे घर, ऐसी मती जयाची स्थिर।**
**किंबहुना परात्पर आपण जाहला ।।**

हे विश्वच माझे घर आहे. ही प्रकृती माझी माता आहे. यावर आपण आपले लक्ष, बुद्धी स्थिर केली तर आपल्या आचरणातून अस्वच्छता, पर्यावरणाला हानी होईल असे कृत्य बाहेर निघणारच नाही. आणि कुठेतरी पर्यावरणाच्या ऱ्हासाला आणि तरुण युवकांच्या स्वैराचाराला आळा बसेल आणि पर्यावरण संतुलन राखले जाईल, असे मला वाटते. विचारांची उंची वाढली की आचरण सुधारते. म्हणून आजपासून या वृक्षवल्ली विषयी आपण आपले पणाची भावना ठेवावी. म्हणजे नक्कीच पर्यावरणाचा विकास होईल.

कु. नेहा सावरकर
बी.ए. प्रथम





## राष्ट्रीय सेवा योजनेत विद्यार्थ्यांची भूमिका

प्रस्तावना :

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मनात सामाजिक जाणीव निर्माण करणे व त्यांचा सर्वांगिण व्यक्तिमत्व विकास घडवून आणणे या उद्देशाने राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना करण्यात आली.

स्वावलंबन, चारित्र्यवर्धन व सामाजिक बांधिलकी या मुल्यांचा समन्वय नवीन शिक्षण पद्धतीत घडवून आणण्यासाठी महात्मा गांधींच्या जन्मशताब्दी वर्षापासून म्हणजे २४ सप्टेंबर १९६९ साली महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय सेवायोजना भारत सरकारच्या युवा कल्याण व क्रिडा मंत्रालयाअंतर्गत राबविण्यात येत आहे.

राष्ट्रीय सेवा योजना संबंधित विद्यार्थ्यांचे योगदान :

राष्ट्रीय सेवा योजनेत विद्यार्थी हा स्वबळावर उभा राहू शकतो. विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये रा. से. योजने अंतर्गत चांगल्या गोष्टी अंगीकृत करुन घेतात, चांगले काम करतात. विद्यार्थ्यांमध्ये कामाची गोडी लागणे व विद्यार्थी हा कोणत्या वृत्तीचा आहे ते सहज लोकांना दिसून येते. एक विद्यार्थी हा संपूर्ण गावाला स्वच्छतेचे धोरण पटवून सांगतो.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणत होते "गाव हा विश्वाचा नकाशा" गावावरुन देशाची परीक्षा गाव भंगता येईल अवदशा । देशामाजी ।। म्हणून राष्ट्राचा उध्दार व्हावा असे वाटत असेल तर आधी ग्रामोध्दार झाला पाहिजे. महाविद्यालयीन अभ्यास क्रमाला जोड देऊन राष्ट्रोध्दार कसा साधता येईल या दृष्टीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी सांगितले आहे.

राष्ट्रीय सेवायेजनेचे सिध्दांत वाक्य "माझ्यासाठी नाही तर तुमच्यासाठी" (Not me but you) निःस्वार्थ सेवाभाव त्यामध्ये आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या मार्गदर्शक तत्वावर नियमित कार्यक्रम व विशेष शिबीर कार्यक्रम असे वर्गीकरण केले आहे. एका विद्यार्थ्याने जवळचे खेडे दत्तक घेऊन त्याचा विकास साधण्याकरीता आवश्यकते नुसार नियमित प्रकल्प प्रतिकात्मक स्वरुपात विद्यार्थ्यांनी कार्यान्वित करावे म्हणजे त्याचे संघटन कौशल्य विकसित होईल.

राष्ट्रीय सेवा योजना हे राष्ट्रीय एकात्मतेचे सशक्त साधन मानले जाते. राष्ट्रीय एकात्मता म्हणजे विविध सामाजिक गटांना एका राष्ट्रीय घटकात आणि प्रवाहात एकरुप होण्याची प्रक्रिया होय. दत्तक गावात कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थी हे राष्ट्रीय एकात्मतेचे महत्व पटवून सांगतात. व क्रियात्मक रुप देतात. व्यक्तिमत्व विकास योजनेचे ध्येय आहे. शिक्षित जनशक्तीच्या गुणवत्तेमध्ये सुधारणा करुन उत्तम राष्ट्रभक्त नागरिक घडवण्याची प्रक्रिया म्हणजे रासेयो होय.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागात काम करतांना विद्यार्थी चांगले सामाजिक संबंध प्रस्थापित करु शकतात. चांगले सामाजिक संबंध ठेवण्यासाठी सामाजिक कौशल्य अवगत करावे लागते. संवाद कौशल्यामुळे ते शक्य होऊ शकते. दुसऱ्या व्यक्तीच्या मनात आपले म्हणणे प्रस्थापित करण्याची पावती व्यक्तीकडून प्राप्त झाले असे म्हणता येणार नाही. म्हणून संवाद कुशलतेने करण्याची गरज असते. रासेयो विद्यार्थीला दत्तक गावामध्ये विविध प्रकारचे संरक्षण करावे लागते. नवीन–नवीन योजनेची माहिती घ्यावी लागते. त्यामुळे लोकांशी संवाद साधावा लागतो. यामुळे विद्यार्थी संवादकौशल्य अवगत करु शकतो. वाचनाच्या सवयीवर, भाषेवर प्रभुत्व मिळवता येते. रासेयो कार्यक्रमात विद्यार्थ्यांना सभासंचालन, प्रास्ताविक भाषेत मनोगत, आभार प्रदर्शन करावयाचे असते. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सभाधीट पणा येतो. मैदानी वक्तृत्वाचा लाभ होतो. भाषा प्रभुत्वामुळे मोठमोठ्या सभा जिंकण्यास ते समर्थ ठरतात. उपस्थित निरक्षरांपासुन तर उच्च विद्या विभूषितांमध्ये राष्ट्रीय विचार रुजवू शकतात. त्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्वामुळे ओघानेच त्यांच्याकडून नेतृत्व चालू होते, असे अनुभवाने सिद्ध होते. अशाप्रकारे राष्ट्रीय सेवा योजना ही महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी वरदान ठरली आहे.

**राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्दिष्ट्ये**

महाविद्यालयीन शिक्षण घेत असतांना समाजसेवा करणे आपल्या जवळपासच्या परिसरातील लोकांमध्ये मिसळून त्यांना समजावून घेऊन रचनात्मक कार्य करणे, समाजसेवेच्या माध्यमातून स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा विकास करणे या उद्देशाने ही योजना सुरु झाली. याची प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

१. ज्या समाजात आपण कामे करतो त्या समाजाला समजून घेणे.
२. स्वतःला संबंधित समाजाला समजून घेण्यासाठी पात्र बनविणे.
३. समाजाच्या गरजांची माहिती बनवून घेणे व त्या दूर करणे की, ज्यामुळे तो समाज सक्रिय बनेल.
४. आपल्यामध्ये सामाजिक बांधिलकीची जाणीव करुन तिचा विकास करणे.
५. आपल्या शिक्षणाचा उपयोग व्यक्तिगत आणि सामाजिक अडचणी दूर करुन त्यावर व्यावहारिक उपाय शोधण्यासाठी करणे.
६. समाजात मिसळण्यासाठी ज्या गुणांची गरज आहे, त्या गुणांचा आपल्यामध्ये विकास करणे.
७. नेतृत्व गुण धारण करुन लोकशाही प्रवृत्तीचा विकास करणे.
८. साक्षर व निरक्षर यांच्यातील दरी कमी करणे.
९. राष्ट्रीय एकात्मतेचा प्रसार व विकास करणे.
१०. सामाजिक गरीब वर्गाची सेवा करण्याची इच्छा मनात जागृत करणे.



**राष्ट्रीय सेवा योजना दिवस :**

राष्ट्रीय सेवा योजना दिवस म्ळणून प्रत्येक वर्षी २४ सप्टेंबर मानावा असे ठरविण्यात आले आहे. त्या दिवशी विद्यापीठ पातळीवरील किंवा महाविद्यालयीन विविध कार्यक्रम आयोजित करावे. (रक्तदान, नेत्रदान, आरोग्य शिबीर, गलिच्छ वस्ती निर्मूलन, वृक्षारोपण इ.) विशेष करुन राष्ट्रीय सेवा योजना दिवस साजरा करतांना स्थानिक गरजा लक्षात घेऊन त्यानुसार कार्यक्रमाचे आयोजन करावे.

**सामाजिक स्तरावरील फायदे :**

१. जनजागृती २. शासनाच्या योजनांची माहिती लोकांपर्यंत पोहचविणे ३. मानवी हक्क व लोकाधिकारांची माहिती समाजापर्यंत पोहचविणे ४. वैयक्तिक व सामाजिक समस्या सोडविण्यात स्वयंसेवकाचा मोठ्या प्रमाणावर हातभार ५. स्वयंसेवकाद्वारे समाजात रचनात्मक कार्य केली जाते. ६. आरोग्य विषयक सक्ती

**रासेयो वैयक्तिक फायदे :**

१. स्वयंसेवकाचा सर्वांगीण व्यक्तिगत विकास होतो.
२. स्वयंसेवकाला समाजाची जाणीव होते व त्यांचे निराकरण करण्याचे कौशल्य प्राप्त होते.
३. विविध सामाजिक संस्थांशी परिचय होतो.
४. स्वयंसेवकाच्या स्वयंरोजगाराची दिशा मिळते.
५. विद्यार्थ्यांना अतिरिक्त गुण व प्रमाणपत्र मिळते.

**शासकीय स्तरावरील फायदे :**

शासनाचे धोरण लोकांपर्यंत पोहचविणे.
मनुष्य बळाची उपलब्धता, शासनाने दिलेल्या अनुदानाच्या अधिक संख्यात्मक व गुणात्मक फायदा शासनाला करुन देणे.

पंकज तिडके
बी.ए. द्वितीय

# 'निर्धार' वार्षिकांक
# इंग्रजी विभाग २०१७ - १८

## विद्यार्थी संपादक



**कु. पुनम गोंडीमेश्राम**

## मार्गदर्शक

**डॉ. विनिता विरगंधम**

## HAPPINESS



Life is a beautiful ride
A very thoughtful one indeed
Got to know it is a timeless one too
How wonderful is life !
When it is speechless
Silence makes it full
Live as it comes says so
Moments of pleasure & fun
Sadness & grief
All in the end is
What is well lived
All in the end is what is
remembered about you.

Ms. Tanvi Lohkare

B.A. I


## SMILE



A smile is a sign of love
A smile is a sign of care
A smile tells how much to others
you are important and also dear.
A smile is a sign of cheer
A smile is a sign of trust
A smile shows how you can
Be happy even in hard crust
A smile is a sign of joy
A smile is a sign of hope
A smile teaches you how you can
Remove the clouds of mops
For nothing but only smile
Takes away your pain and trial
And pick your trouble's pile
And let you smile, smile and smile

Ms. Rachana Nandeshwar

B.A. II



## NATURE

Nature is mighty
Nature is strong
Nature is usually always right
Nature is rarely ever wrong
Nature is beauty
Nature is moody
Nature is smart
Nature always has the greater part.
Nature is blue
Nature is green
Nature is every color possibly seen
Nature is true
Nature is beaming
Nature is dreaming
Nature is in every place
Nature is always with grace
Nature is true
Nature is you
Nature is me
Nature will forever be free.


Ms. Rachana Nandeshwar

B.A. II

## SPECIALITIES OF NAGPUR

1. Best Chemical Engineering College in Asia LIT (Laxminarayan Institute of Technology)
2. Only city in India having maximum number of statues at squares.
3. Biggest Cargo Hub in India.
4. Only city in Asia having biggest Fire Engineering College.
5. Only city in Asia having Diamond Crossing.
6. Only station in India where 400 trains are passing everyday.
7. Second biggest Dikshabhoomi stupa in Asia after China.
8. Only city which won award thrice by Times of India as best city to live in India.
9. Best RBI in India constructed by the British.
10. All of RBI's Gold in India is stored in Nagpur.
11. After Delhi now the second capital of India, politically is Nagpur since RSS head quarters situated in Nagpur.
12. Only region in India which has three ordanance factories. (Ambazari, Bhandara, Chandrapur) Biggest ordanance storing facility of Army (Pulgaon)
13. Vidarbha has coal deposits that can sustain till 2040.
14. Haldiram is the largest Namkeen marketing chain in India.
15. Greenest, cleanest, safest city in India.
16. After completion of Mihan, Nagpur will be the biggest Cargo hub in Asia.
17. After 2017 World's 35% Thermal Power plants will be in Vidarbha region.
18. Zero mile is in Nagpur ..... Approx ....... center of India.
19. CICR ...... is only one National Research Institute in country for cotton.
20. NEERI the only one Research Institute for National Environment.
21. Largest No. of Cooler factories.
22. Two International Cricket ground & Indoor Stadium.

Nikita Warkar
B.Sc. III



## WHAT IS EDUCATION

1. Education is an ornament, prosperity and an refuge in adversity.

2. Education is the ability to listen to almost anything without losing the temper of your self confidence.

3. Education makes people easy to lend, but difficult to drive : easy to govern, but impossible to enclave.

4. The aim of education is not only to be the specialist but the man of vision who can humanize our life integrating emotional demands with our new knowledge.

5. Education is transmission of civilization.

6. Education is the development of personality.

7. Education commences at the mother's knee and every word spoken within the hearsay of little children tends towards the formation of character.


8. Education is Chief defense of a nation.

9. Education is to teach children live, respect, tenderness, gentleness, and patience and they will also treat others like wise.

10. Too much and too little of education hinders the mind.

11. The primary purpose of education is not to teach you to earn your bread but to make every mouthful sweeter.

Nikita Warkar
B.Sc. III



## BEST LINES SAID

My Love for my Family
Is like a Circle
It has no sides to be broken
No Ends to be Ended
And no Angles
To be Measured.

Ms. Shilpa Shegaonkar
B.A. II

## EASY AND DIFFICULT

Easy is to Judge the mistakes of others,
Difficult is to recognize our own mistakes.

Easy is to hurt someone who loves you,
Difficult is to heal the wound.

Easy is to set rules,
Difficult is to follow them.

Easy is to dream ivory night,
Difficult is to fight for a dream.

Easy is to say we love,
Difficult is to show it every day.


Easy is to make mistakes,
Difficult is to learn from them.

Muneshwar Gondimeshram
B.A. II


## INFORMATION ABOUT SYNTHETIC DRUGS

Aspirin (Acetysalicylic Acid)

Structure : Aspirin Acetysalicylic acid or Ocetoxybenzoic acid



Preparation : An excess of acetic anhydride ($C_4H_6O_3$) is added to a measured mass of salicylic acid.($C_7H_6O_3$) in the presence of sulphuric acid. The mixture is heated to form the acetylsalicylic acid ($C_9H_8O_4$) and acetic acid ($C_2H_4O_2$). After the completion of reaction, water is added to destroy the excess of acetic antrydride and cause the product to crystalize. The aspirin is then collected, pacified by recrystallization, and its melting point measured to check its purity.




Properties and uses :

1. It relieves pain, used for the relief of heaches and aches pains. 2. It is used for the treatment of inflammatory condition such as arthiritis. 3. It reduces fever. 4. In lower doses, aspirin can prevent dangerous blood clot from forming. So it is used preventatively to lessen the chance of a heart attack or stroke.

2. Ethnobotany :

Ethnobotony is the study of how people of a particular culture and region make the use of indigenous plant. Ethnobotanists explore how plants are used,for such things as food, shelter, medicine, clothing, hunting and religious ceremonies.

Ethnic societies of India :

The ethnic societies of India is divided into different categories these are Andamanese people, ethnic groups in Delhi, ethnic groups of Andhra Pradesh, ethnic groups in Kerala, ethnic groups in Tharkhand, ethnic groups in Manipur, ethnic groups in Northest India, ethnic groups in Odisha, tribes of Arunachal Pradesh and ethnic group in Tripura.



1. Abscisic acid

Abscisic acid was first identified by addicott in 1963, who were studying compounds responsible for abscission of cotton fruits. ABA is 15- carbon sequiterperiod compound. The synthesis of ABA seems to take place predominantly in mature leaves. Abscisic acid was originally discovered from the leaves of Acer poeudoplatanus and fruits of cotton plant. Now it is known to exist universally in all the higher plants.

2. Thermal Pollution :

A large quantity of waste heat energy by way of hot liquid streams or hot gases released by industries, automobiles etc. dissipates in atmosphere and water enhances the temperature. Heat or thermal pollution is common to both nuclear and conventional source of energy production. Waste heat not only causes wide spread climatological changes also it causes damage to aquatic and terrestrial life.


The thermal discharges are usually unfavorable to bacteria and pathogens Rapid temperature changes produce thermal shocks and results in immediate death of fishes. As the temperature of water increases its viscocity decreases, the vapour pressure increases and solubility of gases in water decreases. These changes have important effect on aquatic life.

3. The Biological diversity Act, 2002

The ministry of Environment and forests has enacted the Biological Diversity Act, 2002 under the united Nation convention on Biological Diversity signed at Rio de Janeirao on the 5th day of June 1992 of which India is also a party. This is to provide for the conservation of biological diversity, sustainable use of its components and fair and equitable sharing of the benefits arising out of used of biological resource, knowledge and for matter connected there with. As per the provision of act certain areas, which are rich in biodiversity and encompasses unique and representative ecosystems are identified and designed as biosphere reserve to facilitate its conservation. All restrictions applicable to protected areas like National Park & santuaries are also applicable to these reserves. SJVNL abides by the provision of act wherever applicable and try avoiding these biosphere reserves while finalising the project infrastructure locations.

Ms. Nitu Wagh

B.Sc. III





## THE STATUS OF WOMEN IN INDIA FROM 1950 TO TILL DATE ........

"It is impossible to think about the welfare of the world unless the condition of women is improved. It is impossible for a bird to fly on only one wing."

**Swami Vivekananda**

Women are not born, but made. What better than India to exemplify this statement by Simone de Beauvoir. With the whole world celebrating International Womens Day with great pomp and show, it would be only apt to analyse the position and space. Indian women occupy today, and comparing it to the time 71 years ago when the country had just gained independence. With women participating in nationalist movements, to being pushed into the domestic household space, to their resurgence as Super-women today, women in our country have seen it all.

There have been innumerable debates about gender in India over the years. Much of it includes womens position in society, their education, health, economic position, gender equality etc. What one can conclude from such discussions is that women have always held a certain paradoxical position in our developing country.

While on one hand, India has seen an increased percentage of literacy among women, and women are now entering professional fields, the practices of females infanticide, poor health conditions and lack of education still persist. Even the patriarchal ideology of the home being a woman's real domain' and marriage being her ultimate destiny hasn't changed much. The matrimonial advertisements, demanding girls of the same caste, with fair skin and slim figure, or the much criticised fair and lovely advertisements, are indicators of the slow changing social mores.

If one looks at the status of women then and now, one has to look at two sides of the coin ; one side which is promising and one side which is black. When our country got its independence the participation of women nationalists was widely acknowledged. When the Indian Constitution was formulated, it granted equal rights to women, considering them legal citizens of the country and as an equal to men in terms of freedom and opportunity. The sex ratio of women at that time was slightly better than what it is today, standing at 945 per 1000 males. Yet the condition of women screamed a different reality.

They were relegated to the household and made to submit to the male - dominated patriarchal society as has always been prevalent in our country. Indian women who fought as equals with men in the nationalist struggle, were not given that free public space anymore. They became home makers and were mainly meant to build a strong home to support their men who were to build the newly independent country.

Women were reduced to being second class citizens. The national female literacy rate was an alarmingly low 8.690. The Gross Enrollment Ratio (GER) for girls was 24.8% at primary level (in the 11-14 years age group). There existed insoluble social and cultural barriers to education of women and access to organised schooling.

A very few were allowed into the public space, which she was expected to manage on her own, while maintaining her domestic role as a homemaker. In spite of the Sharda Act which was passed in the 1950s to raise the marital age limit for girls, child marriage particularly in North India was quite prevalent through the average age of marriage for females was increased to 18. Sprawling inequalities persisted in their access to education, health care, physical and financial resources and apportunities in political, social and cultural spheres. It was almost unthinkable for women to have a choice or a say in matters of marriage, career or life rather she had no voice at all.

The practice of dowry was as common as ever. Ans since men were better educated than girls, the demands were even more. The Dowry Prohibition Act was finally passed in 1961 to protect women and promising severe punishment, but the conviction rate of crime against women was, and still is very low in India. Because of such inhuman practices which were normalised by our society, the birth of the girl child was either killed before birth or after it. Even till date, the practice continues. The United Nations Children's Fund, estimated that up to 50 mollion girls and women were 'missing' from India's population because of termination of the female foetus or high mortality of the girls child due to lack of proper care.

Though a number of constitutional amendments were made for womens' social, economic and political benefits, yet they were never effective to bring a radical change in the situation. Women had only the role of a 'good wife' to play and if a women ventured out to work, she was seen as a bad woman, going against social norms. Women were expected to cook food and eat only after the men, with whatever major amount of food was left. This led to rampant malnutrition among women, and an extremely poor health status. Around 500 women were reported to die every day to pregnancy related problems due to malnutrition and getting married before 18. It was only by the 1960s, that a few educated women began to see themselves increasingly change from a mere guardian of home to a legitimate participant in the discourse of life. The country saw the first undercurrent of female discontent with the system.

With times, a lot has changed since those dark ages of the 1950s for the women. Though at some levels dowry crimes like rape, sexual harassment at office or public places, and molestation, eve-teasing are rampant even after over sixty years of independence. Yet one can't dent that the situation has improved since the earlier times. Women, who now represent 48.2% of the population, are getting access to education, and then employment. From 5.4

million girls enrolled at the primary level in 1950-51 to 61.1 million girls in 2004-05. At the upper primary level, the enrollment increased from 0.5 million girls to 22.7 million girls.

Dropout rates for girls have fallen by 16.5% between the year 2000 and 2005. Programs like 'Sarva Shiksha Abhiyan' and 'Saakshar Bharat Mission for Female Literacy' has helped to increase the literacy rates from less than 10 percent to more than 50% today. The result of this is that India has world's largest number of professionally qualified women. In fact India has the largest population of working women in the world and has more number of doctors, surgeons, scientists, professors than the United States.

Women is Symbol of Power :

God's finest & Beautiful creation without whom no creation is possible. One who gives Birth and nurtures.

Women in India slowly started recognising their true potential. She has started questioning the rules laid down for her by the society. As a result, she has started breaking barriers to earn a respectable position in the world. Today Indian women have excelled in each and every field from social work to visiting space station. There is no arena which remains unconquered by Indian women, whether it is politics, sports, entertainment, literature, technology. Everywhere it is women power all along.

Today, names like Arundhati Roy, Anita Desai, Kiran Desai, Shobhaa De, Jhumpa Lahiri can put any other writer to shame. In the field of cinema, women like Rekha, Smita Patil, Shabana Aazmi and Vidya Balan and Konkona Sen are such names who don't play feminist roles, but have asserted themselves over this male-dominated realm. In the field of politics, from Indira Gandhi to Sheela Dixit, Uma Bharti, Jaylalithaa, Vasundhara Raje and Mamta Banarjee today, women are making their presence felt.

A successful women is one who can build a firm foundation with the bricks others have thrown at her.

This point of view hasn't changed much. There is still a large section of women who is uneducated and married off before the age of 18. Families are required to supply a chaste daughter to the family of her future husband. Also very few women are actually employed in good paying jobs and hence parents don't see the point of spending money on girl's education. Statistics say that close to 245 million Indian women lack the basic capabillity to read and write, which is large in number. Only 13.990 women are employed in the urban sector, and 29% in the domestic and agriculture sector where too a majority of women are exploited by men. The sex ratio of India shows that the Indian society is still prejudiced against female, and a lot is yet to be achieved in the context.


You can break down a women temporarily but a Real Women will always pick up the pieces rebuild herself and come back stronger than ever.

The path towards total gender empowerment is full of pathos over the year. Women have made great strides in many areas with notable progress in reducing some gender gaps. Yet realities such as 11,332

women and girls are getting trafficked every year, and sexual harassment hits hard against all the development that has taken place. Thus, if on one hand women are climbing the ladder of success, on the other hand she is mutely suffering the violence affected on her by her own family members. As comapred to the past, women in modern times have achieved a lot but in reality they have to still travel a long way. Women many have left the secured domain of their home but a harsh cruel exploitative world awaits them, where women have to prove their talent against the world who see women as merely vassals of producing children. The Indian women have to make her way through all the socialised prejudices against her and the men have to allow and accept the women to be equal participants in the country's way forward.

Aishwarya Sant

B.Sc. - I




## परीक्षा समिती

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे प्रत्येक महाविद्यालयाचे ध्येय असते. भविष्यातील भावी जीवन प्रामुख्याने शैक्षणिक प्रगतीवरच अवलंबून असते. आजच्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे मुल्यांकन परीक्षेच्या माध्यमातून केले जाते. ह्याच प्रयत्नाचा एक भाग म्हणून महाविद्यालयात वेगवेगळ्या परीक्षेचे आयोजन केले जाते. त्याचा उद्देश पुढीलप्रमाणे.

१. सत्रात समितीतर्फे चार घटक चाचण्या (२० गुण) घेतल्या जातात.
२. विषयाचे प्राध्यापक प्रत्येक पाठावर वेगळी चाचणी घेतात.
३. विद्यापीठ स्तरावर विद्यापीठ परीक्षेअगोदर सत्र पद्धतीनुसार ८० व ६० गुणांची सराव परीक्षा घेतली जाते. तीन तासात अचूक उत्तरे लिहिण्याचा सराव करुन घेणे.
४. घटक चाचणीच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना अभ्यासाला लावणे.
५. विद्यापीठ परीक्षेत विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांबाबत वर्गात ओळख करुन देणे.
६. वर्गतासात झालेल्या भागावर लहान लहान प्रश्न तयार करुन विद्यार्थ्यांकडून उत्तरे सांगण्यास प्रवृत्त करणे.
७. वर्गतासात अकस्मात परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांना अभ्यासात सतत प्रेरीत ठेवणे.
८. परीक्षेचे पेपर तपासणे, गुणपत्रिका देणे, विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका तपासणी अंती विद्यार्थी कुठे चुका करतात हे लक्षात आणून कवकुवत विद्यार्थ्यांना वेगळे मार्गदर्शन करणे.
९. अधिक चांगली उत्तरे कशी लिहावीत ह्याबाबत परीक्षेपश्चात विषयांच्या प्राध्यापकांकडून मार्गदर्शन करणे.
१०. विद्यार्थ्यांना स्वयं अध्ययनास प्रेरीत करुन इतर स्पर्धात्मक परीक्षेची माहिती देऊन विविध स्पर्धात्मक परीक्षेत विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची ओळख विद्यार्थ्यांना करुन देणे.
११. विद्यापीठ सत्र पद्धती परीक्षेनुसार ८० गुणांची सराव परीक्षा घेतली जाते.

डॉ. मधुकर नंदनवार

परीक्षा समिती सचिव

# भिवापूर महाविद्यालय, भिवापूर जि. नागपूर

## स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सत्र २०१७-२०१८

## अहवाल

भिवापूर महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन समिती व लोकमतच्या संयुक्त विद्यमाने 'घडवा तुमचे युनिक भविष्य' या लेख-मालेचे वाचकार्पण मंगळवार दि. २९-'८-२०१७ ला करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. सुनिल शिंदे होते. प्रमुख वक्ते म्हणून भिवापूरचे ठाणेदार हर्षल ऐकरे, नायब तहसिलदार चैताली दराडे, अ. भा. अंनिसचे राज्य सचिव प्रशांत सपाटे, लोकमतचे अभय लांजेवार, आयएएस अॅकेडमीचे संचालक अतुल परशुरामकर अंनिसचे राजेश वानखेडे, स्पर्धा परीक्षा केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. मोतीराज चव्हाण उपस्थित होते. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते 'स्पर्धेच्या जगात' या लेखमालेचे वाचकार्पण करण्यात आले.

करिअर घडविण्यासाठी स्पर्धा परीक्षा अतिशय उत्तम मार्ग आहे. सामान्य कुटूंबात जन्माला आल्यानंतरही केवळ कठोर परिश्रम आणि जिद्दीच्या बळावर मी पोलीस सेवेत दाखल झालो. फक्त हुशार विद्यार्थीच स्पर्धा परीक्षेत यशस्वी होतात, असे नाही, दहावी, बारावीमध्ये नापास झाल्यानंतर देखील जिद व सातत्यपूर्ण अभ्यासाच्या बळावर अनेकांनी स्पर्धा परीक्षेत यश मिळविले आहे. असे विचार ठाणेदार हर्षल ऐकरे यांनी मांडले.

स्पर्धा परीक्षेला कुणीही सामोरा जाऊ शकतो. त्यासाठी सर्वप्रथम ध्येय निश्चित करणे आवश्यक आहे. एका प्रयत्नात यश मिळेलच असेही नाही, मात्र खचून न जाता जिद्द,चिकाटीने पुन्हा प्रयत्न करा. निश्चित यशस्वी व्हाल. लोकमतलचा हा उपक्रम अतिशय स्तुत्य आहे. प्रत्येकाने लेखमाला नियमित वाचावी. मी स्वत: स्पर्धा परीक्षेतून प्रशासकीय सेवेत दाखल झाले, त्यामुळे या कामात मी तुमच्या पाठीशी आहे, मनात भीती न बाळगता कामाला लागा. यश हमखास मिळेल, असे मत नायब तहसिलदार चैताली दराडे यांनी व्यक्त केले.

स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी मनातील संकोच दूर सारून सकारात्मक दृष्टीकोन बाळगावा. नियोजनबद्ध अभ्यास केला तर निश्तिच यश मिळेल. यासाठी विद्यार्थ्यांनी वर्तमानपत्रातील अधिकाधिक मजकूर वाचला पाहिजे. स्पर्धा परीक्षा फार कठीण नाही. मात्र अनुभवी व्यक्तीचे मार्गदर्शन आणि चांगला सहवास महत्वाचा असल्याचे मार्मिक विचार अ.भा. अंनिसचे प्रशांत सपाटे यांनी व्यक्त केले.

एक वर्षाचे बाळ आणि चार वर्षीय चिमुकलीसह संपूर्ण कुटूंबाची जबाबदारी सांभाळणारी उमरेडमधील महिला जर न्यायाधीश होऊ शकते तर आम्ही मागे का, असा सवाल उपस्थित करीत लोकमतचे अभय लांजेवार यांनी तरूणांना स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून संधी शोधा असे आवाहन केले लोकमतमधील 'स्पर्धेच्या जगात' ही लेखमाला प्रत्येक विद्यार्थ्यांनी वाचावी. या सदरात अनुभवी आणि तज्ज्ञ मान्यवरांचा सहभाग असल्याचेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. सुनिल शिंदे यांनी सुध्दा विद्यार्थ्यांना संबोधित केलें.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक लोकमतचे तालुका प्रतिनिधी शरद मिरे यांनी केले. संचालन प्रा. डॉ. विनिता विरगंधम यांनी तर आभार स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. मोतीराज चव्हाण यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी प्रयत्न केले.

डॉ. मोतीराज चव्हाण<br>
समन्वयक<br>
स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र

# भिवापूर महाविद्यालय भिवापूर
## वार्षिक अहवाल सत्र २०१७–१८
## शारीरिक शिक्षण आणि क्रीडा विभाग

भिवापूर महाविद्यालय भिवापूर हे ग्रामीण भागात आहे. परीसरात शेतकरी आणि मजूर वर्गाची संख्या मोठया प्रमाणात आहे. तसेच महाविद्यालयातील येणारे मोठया संख्येतील विद्यार्थी हे आजूबाजूच्या खेड्यामधून शिक्षणाकरीता येत असतात. त्यामुळे परीसरात मोजक्या खेळाकडेच कल आहे.त्यावर विद्यार्थ्यांची आवड आणि उपलब्ध सुविधा ह्या बाबी लक्षात घेवून रा.तु.म. नागपूर विद्यापीठाच्या क्रीडा विभागातर्फे आयोजीत आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेतील कबड्डी, खो खो,ऐथलेटिक्स ट्रॅक आणि फिल्ड व्हॉलीबॉल कुश्ती हया खेळात रितसर प्रवेश नोंदविण्यात आला.त्यानुसार वेळापत्रकानुसार सरावाच्या खेळाची आखणी करून महाविद्यालयाच्या मैदानावर सराव संध्याकाळच्या सत्रात ४.०० ला घेण्यात येत होता. रा.तु.म. नागपूर विद्यापीठाच्या मैदानावर झालेल्या खो–खो स्पर्धेमध्ये मुलांच्या संघाला उपांत्य सामन्यामध्ये सोशल वर्क कॉलेज नागपूर कडून पराभव पत्कारावा लागला. तसेच राणी इंदीराबाई भोसले महाविद्यालय, कुही येथील आंतर महाविद्यालयीन व्हॉलीबॉल स्पर्धेत सेंट व्हिसेंट पलोटी इंजीअरींग महाविद्यालय, नागपूर कडून गटवार उपांत्य सामन्यात पराभूत होवून स्पर्धेबाहेर झाला.

हया वर्षी भिवापूर महाविद्यालयातील बी. एस. सी द्वितीय वर्षाची विद्यार्थीनी कु. प्रियंका श्रावण करेमोरे हिची बॅंकाक थायलंड येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय सॉफ्ट–बेसबॉल स्पर्धेकरीता भारतीय संघात निवड झाली. ह्या स्पर्धेमध्ये भारतीय संघाने सुवर्णपदक प्राप्त केले.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यामध्ये स्पर्धात्मक वृत्ती सोबतच खेळाडूपणाची भावना जोपासली जावी या हेतूने वार्षिकोत्सवाच्या प्रसंगी या वर्षी विद्यार्थ्याकरीता कबड्डी, क्रिकेट, व्हॉलीबॉल बॅडमिंटन ऐथलॅटिक्स या सोबतच पोता दौड, तीन पायांची दौड, चॉकलेट स्पर्धांचे सुदधा आयोजन करण्यात आले होते. सर्व विजयी स्पर्धकांना प्रमाणपत्र आणि पदक देऊन गौरव करण्यात आले.

२०१७–१८ या वर्षी बी. ए. भाग २ चा विद्यार्थी सुधिर शेंडे याची मि. भिवापूर महाविद्यालय म्हणून निवड करण्यात आली.

आमच्या क्रीडा विभागाला बॅकवर्ड क्लास युथ रिलीफ कमिटीचे आदरणीय सचीव श्री. राजेन्द्रजी मुळक साहेब, मा. अध्यक्षा श्रीमती सुमनमाला मुळक मॅडम तसेच सन्मानणीय कोषाध्यक्ष श्री. यशराजदादा मुळक सर ह्यांचे वेळोवेळी मार्गदर्शन आणि सहकार्य मिळत राहते. या सर्वांच्या प्रेरणेमुळेच विद्यार्थ्यांना विविध सुविधा मिळत आहेत. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जार्ज सर सर्व विद्यार्थ्यांना प्रोत्साहीत करीत जातीने लक्ष देत असतात. तसेच महाविद्यालयामधील माझे सर्व सहकारी प्राध्यापक वृंद आणि कर्मचारी यांनीसुदधा क्रीडा विभागाला वेळोवेळी सहकार्य केले.

प्रतीकुल परिस्थीतीत विद्यार्थ्यांनी रा.तु.म. नागपूर विद्यापीठाच्या स्पर्धेत भाग घेतला त्यावद्दल खेळाडूंचे जितके करावे तितके कौतुक कमीच आहे.

आदित्य सारवे
शारीरिक शिक्षण आणि क्रीडा विभाग

## भिवापूर महाविद्यालय, भिवापूर जि. नागपूर
## राष्ट्रीय सेवा योजना
## वार्षिक अहवाल २०१७-२०१८

दिनांक ०२ ऑक्टोबर १९६९ साली राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जन्म शताब्दी वर्षात राष्ट्रीय सेवा योजनेची सुरूवात झाली. तेव्हापासूनच महाविद्यालयात ही योजना सुरू झाली. ४७ वर्षाची समृध्द परंपरा असलेल्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या नियमित उपक्रमांना दर मंगळवार व बुधवारच्या तासांना ०१ ऑगस्ट पासून स्वयंसेवकांची आचारसंहिता, सेवाभाववृत्ती निर्माण करून युवक-युवतीना यात सहभागी करून घेण्यात येते. नियमित उपक्रमाअंतर्गत श्रमसंस्कार, आरोग्यसेवा, रक्तदान शिबीर, पर्यावरण जनजागृती, बौध्दिक, सांस्कृतिक व व्यक्तिमत्व विकासाचे कार्यक्रम आयोजित केले जातात. दर मंगळवारी व बुधवारी दुपारी १. ०० ते २.३० या वेळात तास घेतले जातात.

**रासेयो नोंदणी व प्रशिक्षण कार्यशाळा :**

सत्रारंभी नव्याने सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांकरीता नोंदणी व प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत राष्ट्रीय सेवा योजनेच्या उपक्रमाविषयी माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. या कार्यशाळेत नवीन विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण तर माजी विद्यार्थ्यांचे उद्‌बोधन असा दुहेरी हेतू साधला जातो. राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्व, स्वयंसेवकांचे कर्तव्य व आचारसंहिता इत्यादीविषयीचे मार्गदर्शन मा. प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांनी केले. प्रशिक्षणात माजी विद्यार्थ्यांची अनुभव सांगून नवीन विद्यार्थ्यांमध्ये उत्साह निर्माण करण्याचे काम केले जातात. कार्यक्रम अधिकारी डॉ. विजय दिघोरे व सहकार्यक्रम अधिकारी डॉ अनिता महावादीवार यांनी व तसेच डॉ. मोतीराज चव्हाण यांनी राष्ट्रीय सेवा योजनेची आचारसंहिता व त्यांचे महत्व विषद करून सांगितले व आतापर्यंत रासेयोची यशस्वी वाटचाल कशी झाली या संदर्भात सर्व इतिहास विद्यार्थ्यांसमोर ठेवला.

**ध्वजारोहण :**

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज याच्या हस्ते ध्वजारोहण केले . यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी मानवंदना दिली. यावेळी मा. प्राचार्याच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय एकात्मता व व्यसनमुक्तीची शपथ देण्यात आली.

**वृक्ष लागवड कार्यक्रम :**

महाराष्ट्र राज्य यांच्या ३ कोटी वृक्ष लागवड या शासकीय कार्यक्रमाअंतर्गत १जुलै २०१७ मोखेबर्डी येथे जावून भिवापूर ते पुल्लर या रस्त्याच्या आजुबाजुला १५०० च्या जवळपास झाडे लावण्यात आले हा कार्यक्रम वन विभागाचे क्षेत्रसहाय्यक श्री. आर. डी. वैलथरे, श्री. वनरक्षक एम जी राउत यांच्या मार्गदर्शनात डॉ. विजय दिघोरे कार्यक्रम अधिकारी व डॉ. राजेश बहुरूपी आणि रासेयो च्या विद्यार्थ्यांनी झाडे लावून शासकीय कार्यक्रम साजरा करण्यात आला.

**आंतरराष्ट्रीय युवा दिन :**

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने १२ ऑगस्ट २०१७ ला आंतरराष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यात आला या दिनानिमित्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना एड्स विषयी जागृती निर्माण व्हावी या उद्देशाने ग्रामीण रूग्णालय भिवापूर यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. हिवरकर, डॉ. शिषीर गोस्वामी, डॉ. अश्विनी काळे, श्री ओमप्रकाश पोटभरे, आरती झलके, प्रतिभा मरकाडे, श्री साने, तसेच महाविद्यालयाचे रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. विजय दिघोरे, एड्स या रोगाविषयीच्या आजाराविषयी प्राथमिक माहिती व रोगापासुन संरक्षण करता येईल या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

**स्वच्छता पंधरवाडा (१६ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट)**

राष्ट्रीय सेवा योजनद्वारा स्वच्छता पकवाड्याअंतर्गत श्रमदानाचे कार्य करण्यात आले. या निमित्त दि. ३० ऑगस्ट, २०१७ ला महाविद्यालयातील रा. से.यो. च्या स्वयंसेवकाना सर्वप्रथम स्वच्छतेविषयी शपथ

देण्यात आली. त्यानंतर महाविद्यालयीन परिसरात प्रशासकीय इमारतीपासून तर वर्गखोल्यांपर्यंत स्वच्छता करण्यात आली. दि. ३१ ऑगस्ट, २०१७ ला भिवापूर येथील गावामधे ग्रामीण रूग्णालय तसेच गावातील मह वर्दळी ठिकाण असलेले बसस्टॉप येथे स्वयंसेवकांनी स्वच्छता करून गावातील जनतेत स्वच्छतेविषयीची जाणीव व जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

**रासेयोव्दारा आउटरीच प्रोगाम :**

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने डब्लु सी एल व एन सी सी यांच्या सयुक्त विद्यमाने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज , डॉ. विजय दिघोरे कार्यक्रम अधिकारी, डब्लु सी एल चे सुरेश व एन सी सी चे डॉ. विरगंधम यांच्या मार्गदर्शनात राष्ट्रीय सेवा योजना चे विद्यार्थी सालेशहरी (पुणर्वसन) या गावात जाऊन संपुर्ण गाव स्वच्छ करण्यात आले व गावामध्ये प्लॅस्टीकचे निमुर्लन करण्यात आले व तसेच गावातील जनतेत स्वच्छतेविषयीची जाणीव व जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

**'स्वच्छता हीच सेवा' पंधरवाडा :**

'स्वच्छता हीच सेवा' हा शासकीय उपक्रम राष्ट्रीय सेवा योजने द्वारा दिनांक १५ सप्टेंबर ते ०२ आक्टो. २०१७ या कालावधीत महाविद्यालयाच्या आजुबाजुचा परीसर व महाविद्यालय ते पोलीस स्टेशन, तालुका आरोग्य प्राथमीक केंद्र, टेलीफोन ऑफीस, नगर पंचायत व मंदिर इत्यादी ठिकाणचे गाजरगवत व कचरा साफ करून पंधरवाडा साजरा करण्यात आला.

**रासेयो वर्धापन दिन व युवावेध सप्ताह :**

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजनेचा ४७ वा वर्धापन युवकांच्या अपार उत्साहात संपन्न झाला. त्याचबरोबर सत्र २०१७-२०१८ मध्ये भिवापूर महाविद्यालय, भिवापूर येथे युवावेध सप्ताह २०१७ चे आयोजन करण्यात आले होते. या सप्ताहा निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन केले गेले.

दिनांक २४/०९/२०१७ ला युवावेध सप्ताह २०१७ चा **उद्घाटन सोहळा** उत्साहात संपन्न झाला. या युवावेध सप्ताहाचे उद्घाटन मा. श्री. लहुजी जनबंधु, नगरपंचायत अध्यक्ष, नगर पंचायत, भिवापूर यांच्या हस्ते पार पडले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज होते. विशेष अतिथी म्हणून मा. श्री. दिलीपजी गुप्ता सामाजिक कार्यकर्ता, भिवापूर उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. सुनिल शिंदे, डॉ. मोतीराज चव्हाण यांचीही प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमा प्रसंगी राष्ट्रपिता महात्मा गांधी तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून दिप प्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रम अधिकारी डॉ. विजय दिघोरे यांनी प्रास्ताविकातून युवावेध सप्ताहाच्या कार्यक्रमाविषयीची रूपरेषा सांगितली.

मा. श्री. लहुजी जनबंधु यांनी आपल्या भाषणात युवकांनी समाजाविषयीची बांधिलकी ठेवून आपले कर्तव्य पूर्ण करण्यासाठी समाजातील लोकांचे प्रश्न त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी कसे प्रयत्न करायला पाहिजे विषयीचे योग्य उद्बोधन केले. उद्बोधना बरोबरच भिवापूर गावातील काही समस्यांचेही चिंतन केले. तर मा. श्री दिलीपजी गुप्ता .यांनी आपल्या भाषणातून युवकांना त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास साधण्यासाठी सांस्कृतिक विकासाची गरज असल्याचा सल्ला दिला. प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात युवकां मध्ये जिद्द, चिकाटी असेल तर ते जीवनात ठरविलेले लक्ष्य निश्चितच गाठू शकतील ते समजून सांगण्यासाठी विविध विषयाचा आधार घेवून समजावून सांगितले. रासेयो चे नॅशनल व राज्यस्तरीय शिबीर रामटेक परीसरात व आजुबाजुच्या गावामध्ये घेण्याविषयीचा मानस बोलुन दाखविला यासोबतच महाविद्यालयामध्ये ओपन लायब्ररी, महाविद्यालयाला I.S.O. दर्जा, आणि महाविद्यालयामध्ये M.Sc., M.Com. मध्ये P.G. अभ्यासक्रम आणण्याचा मानस आहे. नॅककरीता २०-२० मिशन राबवून महाविद्यालयाच्या वर्तमान विकासाचाही आढावा घेतला.

या उद्घाटन सोहळ्याचे संचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अनिता महावादीवार यांनी केले तर राष्ट्रीय सेवा योजनेचे सदस्य डॉ. राजेश बहुरूपी यांनी आभार मानले.

दिनांक २४/०९/२०१७ ला युवावेध सप्ताह २०१७ चा उद्घाटन सोहळा उत्साहात संपन्न झाला. या युवा वेध सप्ताहाचे उद्घाटन मा. श्री. लहुजी जनबंधू, अध्यक्ष, नगरपंचायत, भिवापूर यांच्या हस्ते पार पडले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज होते. तर डॉ. सुनिल शिंदे, प्रा. डॉ. मोतीराज चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाप्रसंगी राष्ट्रपिता महात्मा गांधी तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून दिप प्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रम अधिकारी डॉ. विजय दिघोरे यांनी प्रास्ताविकातून युवावेध सप्ताहाच्या कार्यक्रमा विषयीची रूपरेषा सांगितली.

मा. श्री. लहुजी जनबंधू यांनी आपल्या भाषणात युवकांनी समाजाविषयीची बांधिलकी ठेवून आपले कर्तव्य कसे पूर्ण करायचे तसेच आहे त्या परिस्थितीला सामोरे जाण्याविषयीचे योग्य उद्बोधन केले. याप्रसंगी डॉ. सुनिल शिंदे तसेच प्रा. डॉ. मोतीराज चव्हाण यांनी आपल्या भाषणातून युवकांच्या व्यक्तिमत्वावर भर देवून शासकीय योजना ग्रामीण जनतेपर्यंत पोहचविण्याचा सल्ला रा.से.यो. च्या स्वंयसेवकांना दिला. प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात युवकांमध्ये जिद्द, चिकाटी असेल तर ते जिवनात ठरविलेले लक्ष्य निश्चितच गाठू शकतील ते समजून सांगण्यासाठी विविध विषयाचा आध ार घेवून समजावून सांगितले.

या उद्घाटन सोहळ्याचे संचालन राष्ट्रीय सेवा योजनेच्या सहा. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अनिता महावादीवार यांनी केले तर प्रा. डॉ. मधुकर नंदनवार यांनी आभार मानले.

दिनांक २५/०९/२०१७ ला सकाळी ११.०० ते १.०० या वेळात **'स्वच्छता अभियान'** राबविण्यात आले. महाविद्यालय परिसर तसेच परिसराबाहेरही स्वच्छता करण्यात आली. तसेच महाविद्यालय व आसपासच्या परिसराची स्वच्छता करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज तसेच प्राध्यापक वृंद, रासेयोचे सर्व विद्यार्थी या स्वच्छता अभियान कार्यक्रमात सहभागी झाले होते.

दिनांक २६/०९/२०१७ ला सकाळी ११.०० ते १२.०० या कालावधीत **'मोफत आरोग्य तपासणी शिबीर'** पार पडले. या शिबीरात डॉ. दुधाट, वैद्यकीय अधिकारी, सोमनाळा, श्री. जे. एस. राऊत, आरोग्य साहाय्यक, सोमनाळा, के. एम. पजई, आरोग्य साहाय्यक, सोमनाळा, एस. बी मोहोड, आरोग्य सेविका, सोमनाळा, वाय. एम. गणवीर, आरोग्य सेवक, सोमनाळा इ. चमूनी तपासणीच्या कार्यात योगदान देऊन एकूण ११३ विद्यार्थ्यांची तपासणी केली. आरोग्य तपासणी शिबीरानंतर दुपारी १२.०० ते १.०० या कालावधीत **'पंचायत समिती स्तरावरील योजना व अभियान'** या विषयावर मा. श्री. भुजंग गजबे, खंडविकास अधिकारी, पंचायत समिती, भिवापूर, यांच्या मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या मार्गदर्शन कार्यक्रम प्रसंगी त्यांनी स्थानिक पातळीवर विद्यार्थ्यांना लाभ घेता येऊ शकणाऱ्या अनेक शासनाच्या योजनांची माहिती दिली. जेणे करून विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षण घेतल्यानंतर स्वयंरोजगारासारखे मार्ग निवडून स्वावलंबी होतो येईल.

दिनांक २७/०९/२०१७ ला **'राष्ट्रीय एकात्मता'** या विषयावर मा. श्री. गोविंदसिंगजी चव्हाण, मु. पो. येवती, ता. नांदगाव, जिल्हा. अमरावती यांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यप्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना देशातील सद्यस्थितीची आठवण काढून दिली. दिवसेंदिवस जाती - जाती व धर्मा-धर्मामध्ये होणाऱ्या संघर्षाचे एकमेव कारण कोणते असेल तर ते राष्ट्रीय एकात्मतेचा अभाव होय. यावेळी त्यांनी चीन, जपान अमेरिका यासारख्या प्रगत देशांची उदाहरणे देऊन देशाच्या विकासाचे मार्गही समजावून सांगितले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रा. से. यो. चे कार्यक्रम अधिकारी डॉ. विजय दिघोरे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून वर्तमानातील युवकांच्या स्थितीवर प्रकाश टाकला. तसेच वर्तमानात होणाऱ्या संघर्षाचे विविध स्वरूप सांगून विद्यार्थ्यांना राष्ट्रीय एकात्मतेची जाणीव निर्माण करून दिली. यानंतर दुपारी १२.०० ते १.०० या कालावधीत **'स्त्रियांचा पोषण आहार'** या विषयावर डॉ. अश्विनी काळे, वैद्यकीय अधिकारी, ग्रामीण

कार्यालय, भिवापूर यांच्या मार्गदर्शनाचा कार्यक्रम पार पडला.त्यांनी आपल्या भाषणात आहाराविषयीचे आवश्यकतेनुसार पथ्ये सांगून व्हिटॅमिन्स, कार्बोहायड्रेस्ची अत्यंत गरज असते. त्यासाठी आहार, विहार योग्य असणे गरजेचे आहे. आहार विहार योग्य असेल तर मनात नेहमीच सकारात्मक विचार पुढे येतात. यासाठी विद्यार्थ्यांनी दैनंदिन जीवनात पोषक आहार घ्यावा जेणेकरून विद्यार्थ्यांना आपले आरोग्य सुदृढ ठेवण्यास मदत होईल.

दिनांक २८/०९/२०१७ ला सकाळी ११.०० वाजता **'स्पर्धा परीक्षा काळाची गरज'** तसेच **'स्वच्छता हीच सेवा'** या विषयावर मा. सौ. सूचिता पानसरे, मुख्याधिकारी, नगरपंचायत भिवापूर यांच्या मार्गदर्शन कार्यक्रम पार पडला. या प्रसंगी त्यांनी सध्याच्या स्पर्धात्मक युगात स्पर्धा परीक्षेचे महत्त्व पटवून देऊन खेड्या गावातील विद्यार्थ्यांनी योग्य मार्गाचा अवलंब करून या परीक्षेचे महत्व समजून घेतले पाहिजे. असे कळकळीचे आव्हान केले. यासोबतच स्वच्छतेचेही महत्त्व समजावून सांगितले.

दिनांक २९.०९.२०१७ ला 'व्यसन मुक्ती मार्गदर्शन कार्यक्रम' पार पडला. या कार्यक्रम प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून मा. श्री. इंद्रपाल गजघाटे, प्रोजेक्ट डायरेक्टर, अनिकेत व्यसनमुक्ती उपचार व पूनर्वसन केंद्र, उमरेड तसेच त्यांची संपूर्ण चमू उपस्थित होती. सदर मार्गदर्शन कार्यक्रमात त्यांनी विद्यार्थ्यांना त्यांना आलेले वेगवेगळे अनुभव सांगून व्यसन नाशास कसे कारणीभूत ठरते हे समजावून सांगितले.

दिनांक ३०.०९.२०१७ ला 'स्वच्छता हीच सेवा' या विषयावर **'पोस्टर स्पर्धा'** घेण्यात आली. या स्पर्धेत एकूण २५ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. या स्पर्धेत प्रथम क्रमांक श्री. जावेद युसुफ पठान याने मिळविला तर द्वितीय क्रमांक कु. निकीता बंडुजी तराेर हिने मिळविला.

दिनांक ०१/१०/२०१७ ला महाविद्यालयात 'स्वच्छता अभियान' राबविण्यात आले. या अभियाना प्रसंगी महाविद्यालयातील प्रशासकीय इमारतीपासून तर वर्ग खोल्यांपर्यंतच्या संपूर्ण परिसराची स्वच्छता करण्यात आली. या अभियानात रा. से. यो. चे १५० स्वयंसेवक, महाविद्यालयातील विद्यार्थी, कार्यक्रम अधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी सहभागी झाले होते.

दिनांक ०२/१०/२०१७ ला स्थानिक भिवापूर महाविद्यालयात **'जागतिक अहिंसा दिनानिमित्त' रॅलीचे** आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून दिंडीला हिरवी झेंडी दाखवून रॅलीची सुरूवात केली. भिवापूर महाविद्यालयाच्या वतीने काढण्यात आलेल्या जागतिक अहिंसा दिन दिंडीत महाविद्यालयाच्या कनिष्ठ व वरीष्ठ विभागातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते. या दिंडीत रासेयोच्या विद्यार्थ्यांनी गावातील चौका-चौकात निरक्षरतेवर तसेच स्वच्छतेवर आधारित पथनाट्य सादर केलीत. तसेच 'झाडे लावा झाडे जगवा',' आम्ही नारी सहन करणार नाही लाचारी'. 'व्यसनाची नशा जिवनाची दुर्दशा' अशा विविध घोषवाक्यांनी गावात जनजागरण करण्यात आले. दिंडीचा समारोप महाविद्यालयाच्या प्रांगणात करण्यात आला. युवावेध सप्ताह यशस्वी करण्यासाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच रा से यो च्या स्वंयसेवकानी अथक परीश्रम घेतले.

**रक्तदान शिबीर :**

दिनांक ०८ डिसेंबर २०१७ ला **मा. राजेंद्र मुळक यांच्या जयंती निमित्य भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन** करण्यात आले होते. मा. राजेंद्र मुळक यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याला उजाळा मिळावा म्हणून जीवन ज्योती ब्लड ॲन्ड कंपोनेन्ट्स, नागपूर यांच्या सौजन्याने भिवापूर महाविद्यालय भिवापूर येथे राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत दि. ०८/१२/२०१७ ला रक्तदान व रक्तगट तपासणी शिबीर घेण्यात आला. या रक्तदान शिबिरात ७५ रक्तदात्यांनी रक्तदान केले तर १३३ विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी करण्यात आली. या शिबिरासाठी जीवन ज्योती ब्लड ॲन्ड कंपोनेन्ट्स, नागपूरचे मिस. रचेल मॅथ्यु, मिस. शिजा अनिश, मिस. प्रेरणा नाईक, मि. स्पनील वर्धने, मि. लोकेश देशमुख, निलेश मेश्राम, आसीफ कुरैशी, दिनेश रामटेके, राजेश चौधरी, अरून मोरांडे, मिस. सुलिता येन्डे, किशोर खोब्रागडे,

संजय नागपूरे यांनी रक्तसंकलनाचे कार्य केले. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांनी रक्तदान करून केले. याप्रसंगी प्रा. डॉ. विजय दिघोरे, प्रा. डॉ. सुनिल शिंदे, प्रा. डॉ. मोतीराज चव्हाण, प्रा. डॉ. राजेश बहुरूपी प्रा. अनिता महावादीवार प्रामुख्याने उपस्थित होते.

रक्तदान शिबिराच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. विजय दिघोरे, डॉ. मोतीराज चव्हाण, डॉ. सुनिल शिंदे, डॉ. अनिता महावादीवार तसेच रा.से.यो. मधील विद्यार्थी इत्यादिं नी अथक परिश्रम घेतले.

**सिकलसेल तपासणी शिबीर :**

शिवापूर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनाच्या माध्यमातुन महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरीता सिकलसेल तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले. हे शिबीर प्राथमिक आरोग्य केंद्र, सोमनाळा यांच्या माध्यमातुन दिनांक १३ व १४ जानेवारी २०१७ ला श्री. अजय साने प्रोजेक्ट मॅनेजर, सिकलसेल, डॉ. सोनाली दुधाट, आरोग्य अधिकारी यांनी सिकलसेल आजाराविषयी मार्गदर्शन केले. त्यानंतर वरील मंडळी व त्यांचे सहकारी आरोग्य सेवक श्री आर. व्हि मांदळे, वाय. एस. मेश्राम, व्हि. एन. जांभळे, सौ. योगीता पांडे व औषधी निर्माता कु. मृणाली नागदेवे यांच्या नेतृत्वात महाविद्यालयातील एकुन २६१ विद्यार्थ्यांची सिकलसेल तपासनी करण्यात आली. त्यामध्ये एकुन ११ संशयीत रूग्ण आढळून आले.

**विद्यापीठस्तरीय शिबीरामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सहभाग :**

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनाचे स्वयंसेवक १) श्री अनिकेत गोपाल भिसीकर, बि. कॉम. भाग २ २) श्री अंकेश फुलचंद रेहपाडे, बि. कॉम भाग २ ३) श्री. खांबाडकर, बी. कॉम भाग २ ४) कु. किरण दामोध र तरारे, बी. कॉम भाग २ ५) कु. स्वाती पुरूषोत्तम खोंडे, बी. ए. भाग १ ६) कु. करीश्मा मोतीराम निशाणे बी. ए. भाग १ ७) कु. अश्विनी बंडुजी वाघमारे असे एकुण ७ विद्यार्थी संत गाडगे महाराज महाविद्यालय, हिंगना., जि. नागपुर यांनी कान्होलीबाग ता. नागपूर जि. नागपूर येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजना राज्यस्तरीय शिबीर 'ग्रामोन्नतीकरीता युवाशक्ती' दिनांक ०९ जानेवारी ते १५ जानेवारी २०१८ या कालावधीत संपन्न झालेल्या राष्ट्रीय सेवा योजना राज्यस्तरीय शिबीरात उत्स्फुर्त सहभाग घेतला.

**'स्वच्छ - स्वस्थ भारताकरिता युवाशक्ती' विशेष वार्षिक शिबीर**
**दत्तक ग्राम - अड्याळ (पुनर्वसन)**

'स्वच्छ भारत- स्वस्थ भारत' या घोषवाक्यावर आधारित महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे महाविद्यालयीन स्तरीय सत्र २०१७-२०१८ चे विशेष वार्षिक शिबीर दिनांक २४/०१/२०१८ ते ३०/०१/२०१८ या कालावधीत अड्याळ (पुनर्वसन) या दत्तक ग्रामी संपन्न झाले. या सात दिवसीय विशेष वार्षिक शिबिराची पूर्वतयारी दिनांक २३/०१/२०१८ पासून करण्यात आली. याच दिवशी महाविद्यालयाचे रा.से.यो. चे स्वंयसेवक हे शिबीरस्थळी उपस्थित झाले. शिबिरात एकूण ७५ स्वयंसेवक सहभागी झाले होते. शिबिराच्या पहिल्या दिवशी शिबिरातील विद्यार्थ्यांचे ग्रुप तयार करण्यात आले. व शिबिराच्या पुढील कार्यक्रमाचेही नियोजन करण्यात आले. शिबिर प्रमुख प्रा. डॉ. विजय दिघोरे व प्रा. डॉ. अनिता महावादीवार यांच्या नेतृत्वात व सहकारी प्राध्यापक यांच्या सहकार्याने शिबीर कालावधीत अनेक समाजाभिमुक मार्गदर्शन कार्यक्रम व प्रकल्प राबविण्यात आले.

दिनांक २४.०१.२०१८ ला अड्याळ (पुनर्वसन) या दत्तक ग्रामी पोचल्यानंतर स्वयंसेवकांनी आवश्यक तेवढे शिबीर स्थळी श्रमदान केले. सायंकाळी प्रार्थनेनंतर स्वयंसेवकांचे एकूण पाच गट तयार करण्यात आले. गट पाडण्यात आल्यानंतर प्रत्येक गटांना वेगवेगळी पुढील दिवसांची जबाबदारी सोपविण्यात आली. तसेच शिबीराच्या यशस्वीतेबाबतच्या अनेक महत्वाच्या सूचना देण्यात आल्या.

दिनांक २५.०१.२०१८ ला सकाळी ६.०० वाजता

प्रार्थना, योगा व प्राणायाम आटोपून सकाळी [illegible] वाजता जनजागरण दिंडी काढण्यात आली. या दिंडीच्या माध्यमातून अड्याळ येथील जनतेला **'पर्यावरण', 'व्यसनमुक्ती', 'बेटी बचावो बेटी पढावो'** तसेच **स्वच्छ व स्वस्थ भारताविषयीच्या** विविध घोषणा देवून गावामध्ये जनजागृती करण्यात आली. जनजागरण दिंडीनंतर दिनांक २५.०१.२०१८ ला महाविद्यालयीन विशेष शिबिराचा उद्घाटन सोहळा असल्याने विद्यार्थ्यांनी श्रमदानाच्या माध्यमातून जि. प. उच्च प्रा. शाळा, अड्याळ येथील परिसर स्वच्छ केला. नियोजित वेळेनुसार रा.से.यो. चे स्वयंसेवक उद्घाटन सोहळयाच्या कामाला लागले. शिबिराचे उद्घाटन मा. डॉ विनयकुमार उपाध्याय (संस्कृत विभाग प्रमुख, नुतन आदर्श महाविद्यालय, उमरेड) यांच्या हस्ते पार पडले. त्यांनी आपल्या उद्घाटकीय भाषणात व्यक्तिमत्व विकासाचे महत्वाचे माध्यम म्हणजे एन. एस. एस. असे सांगून हे जीवन शिक्षणाचे महत्वाचे साधन आहे यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भिवापूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज व विशेष अतिथी म्हणून मा. श्रीमती मंगला विजय तावे (सरपंच, ग्रामपंचायत, अड्याळ), प्रमुख अतिथी म्हणून मा. श्री. दिलीपजी गुप्ता (सामाजिक कार्यकर्ता, भिवापूर), मा. श्री. रंगराव र. भोयर (अध्यक्ष, शाळा समिती अड्याळ), मा. श्री. वसंतजी गायकवाड (उपसरपंच, ग्रामपंचायत, अड्याळ), मा. श्री. आर. डी. शेटे (मुख्याध्यापक, जि. प. उच्च प्रा. शाळा, अड्याळ), मा. विलासजी कुडेगावे, मा. श्री. परमेश्वरजी पेंद तसेच महाविद्यालयाचे ज्येष्ठ प्राध्यापक प्रा. सुनिल शिंदे प्रामुख्याने उपस्थित होते. सर्वप्रथम पाहुण्याच्या हस्ते राष्ट्रीय सेवा योजना ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दिप प्रज्वलन करण्यात आले. या उद्घाटनप्रसंगी व्यासपीठावरील उपस्थित मान्यवरांनी आपआपले स्थान ग्रहण केल्यानंतर विद्यापीठ गीत सादर करण्यात आले. विद्यापीठ गीतानंतर अतिथीचे स्वागत, स्वागत गीताने करण्यात आले. यानंतर महाविद्यालयाच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन समारंभपूर्वक स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा.से.यो. चे कार्यक्रम अधिकारी डॉ. विजय दिघोरे यांनी केले. संचालन सह. कार्यक्रम अधिकारी डॉ. अनिता महावादीवार यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रा. डॉ. राजेश बहुरूपी यांनी मानले.

या दिवशी रात्री रा.से.यो. च्या स्वयंसेवकांनी गावकऱ्यांना सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवानी दिली. तसेच दुसऱ्या दिवसाच्या कार्यक्रमाचे नियोजनही करण्यात आले.

दिनांक २६.०१.२०१८ ला नेहमीप्रमाणेच स्वयंसेवकांनी प्रात:विधी आटोपून सकाळी ६.०० वाजता प्रार्थना केली. ६.३० वाजता स्वयंसेवकांनी प्राणायाम व योगासने केल्यानंतर जिल्हा परिषद उच्च प्रा. शाळा, अड्याळ येथील पटांगणावर होणाऱ्या ध्वजारोहण कार्यक्रमात आपली उपस्थिती दर्शविली. शाळेतील ध्वजारोहण कार्यक्रमानंतर तेथील सांस्कृतिक कार्यक्रमातही विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन विविध नृत्य व नाटिकांचे सादरीकरण केले.

याचदिवशी दुपारच्याच सत्रात ३.०० वाजता 'कायदेविषयक मार्गदर्शन' कार्यक्रम पार पडला. या मार्गद्रर्शन कार्यक्रमात विविध वक्त्यांनी विविध कायद्यांचा आधार घेऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सर्वप्रथम ॲड. कन्नाके यांनी **'रॅगिंगचे युवाशक्तीतील वाढते प्रमाण'** या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सदर मार्गदर्शनात कायद्यातील विविध तरतुदींची माहिती देण्यात आली. ॲड. डांबरे यांनी **'दिवाणी व फौजदारी कायदा'** यातील फरक व तुलनांचे मार्गदर्शन केले. ॲड. नागोसे यांनी **'हुंडा प्रतिबंधक कायदा तसेच घरगुती अत्याचार अधिनियम २००५'** याविषयी माहिती दिली. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात विविध घडलेल्या गुन्हयांची माहिती देऊन कायदे समजावून सांगितले. मा. श्री. नरहरी पेंदाम, सामाजिक कार्यकर्ते यांनी 'भारतीय मतदारांची जागृतता' या विषयावर भर देवून देशातील प्रत्येक नागरीकाने मतदान करून आपला हक्क बजावला पाहिजे या विषयीची कळकळीची विनंती केली. मतदार दिवसाचे औचित्य साधून ८ व्या राष्ट्रीय मतदार दिवसा' च्या निमित्ताने स्वयंसेवक तसेच गावातील उपस्थित नागरिकांना मजबूत

लोकशाहीच्या पायासाठी मतदानाचे महत्व पटवून दिले या कार्यक्रमप्रसंगी मा. श्री. लिखार साहेब (पंचायत समिती, भिवापूर) मा. श्री. बरडे, मा. श्री. शेटे इ. मान्यवर उपस्थित होते. मार्गदर्शन कार्यक्रमानंतर संध्याकाळी प्रार्थनेनंतर स्वयंसेवकांसाठी विविध बौध्दिक खेळांचे आयोजन करण्यात आले. नंबर गेम स्पर्धेत श्री. अंकेश फुलचंद रेहपाडे या विद्यार्थ्याने प्रथम क्रमांक मिळविला.

दिनांक **२७.०१.२०१८** ला सकाळी ६.०० वाजता प्रार्थना आटोपून ६.३० वाजता रा.से.यो. च्या स्वयंसेवकांनी प्राणायाम व योगा केले. त्यानंतर अल्पोपहार आटोपून श्रमदानाचे काम हाती घेतले. श्रमदानासाठी विविध ग्रुप तयार करून प्रत्येक ग्रुपला विविध परिसर श्रमदानासाठी देण्यात आला. त्यात नालीचे खोदकाम, नालीसफाई, कचरा निर्मूलन, गाजरगवत निर्मूलन इत्यादी कामे रासेयोच्या स्वयंसेवकानी केली.

दुपारच्या सत्रात २.०० वाजता ' मोफत आरोग्य तपासणी शिबीर' पार पडले. सदर शिबिराच्या प्रारंभी ग्रामीण आरोग्य केंद्र, भिवापूर येथील समुपदेशक ओमप्रकाश पोटभरे यांनी एच. आय. व्ही तसेच एड्स विषयी माहिती दिली. तसेच पर्यवेक्षक जागेश्वरजी वांढरे यांनी सिकलसेल या रोगाला कसे नाव पडले तसेच हा रोग झाल्यास घ्यावयाची काळजी कोणती याविषयीची माहिती सविस्तरपणे सांगितली. त्यानंतर प्राथमिक आरोग्य केंद्र, सोमनाळा यांच्या चमूसह एच. आय. व्ही तसेच सिकलसेल या रोगाची तपासणी करण्यात आली. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी ग्रामीण रूग्णालय, भिवापूर तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र, सोमनाळा येथील संपूर्ण चमू तसेच राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. विजय दिघोरे, सहकार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अनिता महावादीवार तसेच प्रा. सोमेश्वर वासेकर यांनी मोलाचे योगदान दिले.

याच दिवशी दुपारच्याच सत्रात ४.०० वाजता 'सॅनिटरी नॅपकीन्स व स्त्रियांचे आरोग्य' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमात श्री. मारोती तु. मेश्राम तसेच श्रीमती सारिका मा. मेश्राम (प्राथमिक आरोग्य केंद्र, सोमनाळा) यांनी आपल्या मार्गदर्शन कार्यक्रमात सद्य:स्थितीत बाजारात येणाऱ्या सॅनिटरी नॅपकीन्सची माहिती देऊन त्याविषयची काळजी घेण्याच्या महत्वपूर्ण टिप्स देऊन प्रात्यक्षिकही करून दाखविले. सायंकाळी प्रार्थनेनंतर विद्यार्थ्यांनी गावकऱ्यांना सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवानी दिली.

दिनांक २८.०१.२०१८ ला स्वयंसेवकांनी प्रात:विधी आटोपून सकाळी ६.०० वाजता प्रार्थना केली. ६.३० वाजता स्वयंसेवकांनी प्राणायाम व योगासने केल्यानंतर चहा व नास्ता झाल्यानंतर प्रत्येक ग्रुपच्या स्वयंसेवकांनी गावातील विशेषत: ग्रामपंचायत परिसरातील श्रमदानाचे अपूर्ण काम पूर्ण केले. जेवण व विश्रांतीनंतर दुपारी २.०० वाजता 'व्यसनमुक्ती ही काळाजी गरज' या विषयावर प्रा. नरेंद्र एल. गाडगे (श्रीमती राजकमल बापुराव तिडके महाविद्यालय, मौदा) यांनी विद्यार्थ्यांना तंबाखू, गुटखा, तसेच मोबाईल यांच्या वापरावर संयम असावा याविषयी मार्गदर्शन केले. त्यानंतर त्यांनी व्यसनामुळे होणाऱ्या दुष्परिणामांची माहिती देऊन व्यसनापासून दूर राहण्याचा सल्ला दिला.

दु. ३.०० वाजता 'महिला संरक्षण कारणे व उपाय' या विषयावर श्रीमती भुमेश्वरी खोंड (मुख्याध्यापिका, जि. प. प्रा. शाळा, मालेवाडा, जिल्हा. नागपूर) यांनी सद्य:स्थितीत महिलांमध्ये वाढत्या असुरक्षिततेची भिती व्यक्त करून वाढत्या बलात्काराची चिंताही व्यक्त केली. यासाठी महिलांनी न घाबरता स्वत:चे संरक्षण कसे करावयाचे व त्यासाठी कोणती काळजी घ्यावयाची याविषयी विस्तृत सांगितली. सोबतच शासनाने महिला संरक्षणासाठी केलेल्या विविध उपाययोजनांवरही त्यांनी भर दिला.

कार्यक्रमानंतर ५.०० ते ६.०० या वेळात विद्यार्थ्यांची सामान्य ज्ञानावर आधरित '**लेखी परीक्षा**' घेण्यात आली. या परीक्षेत श्री. निखील एम. बल्की या विद्यार्थ्याने प्रथम क्रमांक मिळविला तर द्वितीय क्रमांक कु. प्रणाली ए. झलके हिने मिळविला. यशस्वी स्वयंसेवकांना समारोपीय कार्यक्रमात पारितोषिक देण्यात आले.

दि. २९.०१.२०१८ ला स्वयंसेवकांनी प्रात:विधी आटोपून सकाळी ६.०० वाजता प्रार्थना केली. ६.३० वाजता स्वयंसेवकांनी प्राणायाम व योगासने

केल्यानंतर चहा व नास्ता झाल्यानंतर प्रत्येक ग्रुपच्या स्वयंसेवकांनी गावातील उर्वरित श्रमदानाचे काम पूर्ण केले त्यानंतर स्वयंसेवक समारोपीय कार्यक्रमाच्या तयारीला लागले.

दुपारी २.०० वाजता समारोपीय कार्यक्रमाची सुरुवात झाली. शिबिराच्या समारोपीय कार्यक्रमा प्रसंगी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज उपस्थित होते. तर विशेष अतिथी म्हणून दत्तक ग्राम अडयाळ येथील मा. श्रीमती मंगला विजय तांबे (सरपंच, ग्रामपंचायत, अडयाळ), मा. श्री. रंगराव र. भोयर (अध्यक्ष, शाळा समिती अडयाळ), मा. गणेशजी खानकुरे, मा. परमेश्वर पेंदे इ. गावातील मान्यवर मंडळी उपस्थित होती. कार्यक्रमाप्रसंगी **'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कप'** ला प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांच्या हस्ते पारितोषिक वितरित करण्यात आले. शिबिरा दरम्यान उत्तम कामगिरी केल्याबद्दल श्री. सुरज कामडी यांना **उत्कृष्ट स्वयंसेवक** म्हणून तसेच कु. पुनम गोंडीमेश्राम हिला **उत्कृष्ट स्वयंसेविका** म्हणून घोषित करण्यात येऊन त्यांना भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. उत्तेजनार्थ बक्षीस श्री. अनिकेत भिसीकर याला देण्यात आले. शिबीर कालावधीत पार पडलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात उत्कृष्ट अभिनयासाठी कु. रुक्मिणी शिवणकर, श्री. सतीश मोहोड, कु. काजल बोरकर व श्री. शेखर शिंगनाथ या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते भेटवस्तु देवून गौरविण्यात आले. बौध्दिक स्पर्धेत **'नंबर गेम स्पर्धा'** घेण्यात आली. या स्पर्धेत श्री. अंकेश फुलचंद रेहपाडे या विद्यार्थ्याला आलेल्या मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देवून गौरविण्यात आले. याप्रसंगी श्री. अंकेश फुलचंद रेहपाडे, श्री. राहूल पुरी यांनी आपली मनोगते व्यक्त केलीत. समारोपीय कार्यक्रमाचे संचालन सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. अनिता महावादीवार यांनी केले तर अहवाल वाचन प्रा. अमित काळबांधे यांनी केले. सरते शेवटी उपस्थित मान्यरांचे आभार राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. विजय दिघोरे यांनी मानले.

शिबिराच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच रासेयोच्या सर्व विद्यार्थ्यांनी अथक प्रयत्न केले

**राज्यस्तरीय शिबीरामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सहभाग :**

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनाचे स्वयंसेवक १) श्री. पंकज रामभाऊ तिडके , बी. ए. भाग २ २) कु. पुनम मुनिश्वर गोंडीमेश्राम, बी. ए. भाग २ ३) कु. रचना भोजराज नंदेश्वर , बी. ए. भाग २ ४) कु. पुजा विजय सुखदेवे बि. कॉम. भाग २ ५) कु. राजश्री सोमेश्वर ठाकुर बि. कॉम. भाग २ असे एकुण ६ विद्यार्थी शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालय, अर्जुनी / मोर., जि. गोंदिया यांनी मौजा केशोरी ता. अर्जुनी / मोर., जि. गोंदिया येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजना राज्यस्तरीय शिबीर 'ग्रामोन्नतीकरीता युवाशक्ती' दिनांक ०१ फरवरी ते ०८ फरवरी २०१८ या कालावधीत संपन्न झालेल्या राष्ट्रीय सेवा योजना राज्यस्तरीय शिबीरात उत्स्फुर्त सहभाग घेतला.

भिवापूर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या पथकाची वाढती यशस्वीता ही उल्लेखनीय बाब समजावी लागेल. याचे सर्व श्रेय संस्थेचे माजी अध यक्षा स्व. भाऊसाहेब मुळक , संस्थेचे नवनियुक्त अध यक्षा श्रीमती सुमनमाला मुळक, संस्थेचे सचिव मा. माजी नामदार राजेंद्रजी मुळक (राज्यमंत्री) ,प्रशासकीय अधि ाकारी मा. डि. के. महाडिक संस्थेच्या मॅनेजींग डायरेक्टर श्रीमती प्रेरणाताई मुळक , व्यवस्थापन मंडळाचे सर्व पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज, प्राध्यापक वृंद तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी व रा.से.यो. च्या सर्व लोकांना जाते. या सर्वांनी ज्या आत्मियतेने सहकार्य केले त्यांचा मी सदैव ऋणी राहीन. त्याचबरोबर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी जी धडपड दाखविली आणि कार्यक्रम यशस्वी केले त्याबद्दल मी सर्वांचा मन:पूर्वक आभारी आहे.

**कार्यक्रम अधिकारी**
**प्रा. डॉ. विजय दिघोरे**

## वाणिज्य विभाग अहवाल : २०१७–१८

शैक्षणिक सत्र २०१७–२०१८ मध्ये वाणिज्य विभागात विविध कार्यक्रमासोबतच विद्यार्थ्यांसाठी चर्चासत्र व कौशल्य विकासा अंतर्गत अभ्यासक्रम राबविण्यात आले त्याचा अहवाल पुढीलप्रमाणे–

वाणिज्य विभागात चालू शैक्षणिक सत्राकरिता अभ्यास मंडळ कार्यकारिणीचे गठन दि.२६/८/२०१७ ला करण्यात आले. यावेळी विभाग प्रमुख व मार्गदर्शक डॉ. अनिता महावादिवार तर प्रमुख उपस्थिती डॉ. राजेश बहुरुपी यांची होती. यावेळी मार्गदर्शकांनी वाणिज्य विषयाचे महत्व विद्यार्थ्यांना सांगून वाणिज्य विषयाची विविध क्षेत्रातील रोजगाराच्या संधी विषयी माहिती दिली.

वाणिज्य विभागातील विद्यार्थ्यांसाठी दि. ५.१०.२०१७ ला वाणिज्य विषयाशी संबंधित विषयावर 'सामान्य ज्ञान' परीक्षा घेण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी सामान्य ज्ञान स्पर्धेत बहुसंख्येने भाग घेतला.


वाणिज्य विभागातर्फे दि. ११.१२.२०१७ ला 'शाश्वत उत्पादन व शाश्वत उपभोग काळाची गरज' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. हे चर्चासत्र विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे ठरले. विभागप्रमुख डॉ. महावादीवार यांनी या चर्चासत्रात आपले विचार व्यक्त करुन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.


वाणिज्य विभागाअंतर्गत ऑगष्ट २०१७ ते फेब्रुवारी २०१८ या कालावधीत कौशल्य विकास कार्यक्रमा अंतर्गत 'फॅशन डिझायनिंग' या अभ्यासक्रमाचे ६ महिण्याचे प्रशिक्षण महाविद्यालयातील ४० विद्यार्थीनींनी घेतले.

दि.२६.१२.२०१७ ला 'टॅली कॉमर्स ॲप्टीटयूड टेस्टसाठी ' वाणिज्य, कला तसेच विज्ञान शाखेतील एकून १३६ विद्यार्थ्यांना ऑनलाईन परीक्षा देण्यास मार्गदर्शन करण्यात आले. मार्गदर्शक व विभागतील प्राध्यापकांनी यात सहकार्य केले.

दि.१४.२.२०१८ ला ॲडमिशन प्रमोशन निमित्य. इयत्ता ११वी व १२वी च्या विद्यार्थ्यांना 'वाणिज्य शाखेचे महत्व व भविष्यातील संधी' या विषयावर मार्गदर्शनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील कनिष्ठ विभागतील विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन मार्गदर्शनाचा लाभ घेतला.

डॉ. अनिता महावादिवार
विभाग प्रमुख





## अर्थशास्त्र विभाग अहवाल २०१७–१८

अर्थशास्त्र विभागाच्या वतीने शैक्षणिक सत्र २०१७–१८ या वर्षात घेण्यात आलेल्या कार्यक्रमाचा अहवाल खालीलप्रमाणे–

अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे गठन दि.२८/८/२०१७ ला महाविद्यालयात करण्यात आले. यावेळी मार्गदर्शक व विभाग प्रमुख डॉ. सुनिल शिंदे तर प्रमुख उपस्थिती डॉ. मोतीराज चव्हाण यांची होती. यावेळी विद्यार्थी कार्यकारिणीचे गठन करण्यात येऊन अर्थशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शकांनी अभ्यास मंडळाचे महत्व तसेच सत्रात होणाऱ्या विविध कार्यक्रमांचा व तज्ञांच्या व्याख्यानाचा लाभ घेण्याचे सांगीतले.

### रक्तदान, रक्तगट व हिबोग्लोबिन तपासणी शिबीर

दि. ८ डिसेंबर २०१८ ला मा. राजेंद्रजी मुळक यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून रक्तदान, रक्तगट व हिमाग्लोबिन तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबीरात एकूण ५५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. तसेच १२५ रूग्णांची रक्तगट तपासणी करण्यात आली. यावेळी अर्थशास्त्र अभ्यास मंडळाच्या कार्यकारिणीतील विद्यार्थ्यांनी रक्तदान व रक्तगट तपासणी केली.


### गेस्टलेक्चर व तज्ञांचे मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन

दिनांक १७ जानेवारी २०१८ ला भिवापूर महाविद्यालय, भिवापूर येथे अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन आणि 'वस्तू व सेवाकर प्रणाली' या विषयावर अण्णासाहेब गुंडेवार महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. मंजुषा ठाकरे आणि 'नोटबंदीचे परिणाम' या विषयावर अशोक मोहरकर महाविद्यालय, अड्याळ येथील प्रा. श्रीकृष्ण भुरे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आलेले होते.

व्याख्यान कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज होते. डॉ. मंजुषा ठाकरे यांनी 'एक देश एक कर' ह्या दृष्टीने वस्तू व सेवाकर प्रणाली आवश्यक असली तरी वस्तू व सेवाकर प्रणालीची अंमलबजावणी करतांना आणि उत्पादक, व्यापारी आणि व्यावसायीकांना कर विवरणपत्रे भरतांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागेल असे मत व्यक्त केले. प्रा. श्रीकृष्ण भूरे यांनी काळा पैसा, भ्रष्टाचार, काळाबाजार रोखण्यासाठी आणि आंतकवाद्यां कडून नकली नोटांचा चलनात होत असलेला पुरवठा बंद करण्यासाठी नोटबंदी केली असली तरी नोटबंदीची झळ ही गरीबांनाही बसली असून नोटबंदीमुळे आर्थिक विकासाचा दर कमी झाला आहे. अर्थव्यवस्थेमध्ये बेकारीमध्ये वाढ झाली आहे असे विचार मांडले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांनी वस्तू व सेवाकर प्रणाली आणि नोटबंदी या दोन्ही आर्थिक निर्णयाची अंमलबजावणी योग्य पद्धतीने केल्यास अर्थव्यवस्थेच्या विकासाला हातभार लागेल असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून प्रा. जगदीश वाटमोडे, डॉ. मंगेश कडू, डॉ. मोतीराज चव्हाण उपस्थित होते. व्याख्यान कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुनिल शिंदे यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन कु. रचना नंदेश्वर हिने तर आभार प्रदर्शन कु. पूनम गोंडीमेश्राम हिने मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक आणि अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे विद्यार्थी उपस्थित होते.

डॉ. सुनिल शिंदे
विभाग प्रमुख



## इतिहास विभाग अहवाल (२०१७–१८)

इतिहास विभागाच्या वतीने शैक्षणिक सत्र २०१७–१८ या वर्षात घेण्यात आलेल्या कार्यक्रमाचा अहवाल खालीलप्रमाणे–

**वृक्षारोपण कार्यक्रम :–**

दि. ५ सप्टेंबर २०१७ ला शिक्षकदिनाचे औचित्य साधून इतिहास अभ्यास मंडळाच्या वतीने भिवापूर महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. या वृक्षारोपण कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज, इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. मोतीराज चव्हाण व इतिहास अभ्यास मंडळाचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

**इतिहास अभ्यास मंडळ उद्‌घाटन कार्यक्रम :–**

दि. २६ सप्टेंबर २०१७ ला इतिहास विभागाच्या माध्यमातून इतिहास अभ्यास मंडळाचे उद्‌घाटन मा. डॉ. भालचंद्र रामचंद्र अंधारे, इतिहास संशोधक नागपूर यांच्या हस्ते संपन्न झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज, विशेष अतिथी म्हणून डॉ. श्रीकांत सोनटक्के संताजी महाविद्यालय, नागपूर तसेच विशेष उपस्थितीत डॉ. सुनिल शिंदे प्रामुख्याने उपस्थित होते. प्रारंभी दिप प्रज्वलन व माता सरस्वतीच्या प्रतिमेचे पूनन तसेच माल्यार्पण करण्यात आले. इतिहासाच्या विद्यार्थ्यांनी पाहुण्याचे स्वागत स्वागत गीतानी केले. याप्रसंगी पाहुण्याचा शाल, श्रीफळ व सन्मान चिन्ह देवून सत्कार करण्यात आला.

भिवापूर महाविद्यालयात शिकत असलेल्या बी.ए. भाग १,२ व ३ च्या विद्यार्थ्यांनी इतिहास विभागाच्या माध्यमातून बनविलेल्या ऐतिहासिक चित्राच्या प्रदर्शनीचे उद्घाटन डॉ. भा.रा. अंधारे यांच्या हस्ते संपन्न झाले. या प्रदर्शनीमध्ये प्राचिन,मध्ययुगीन व आधुनिक भारताचा इतिहास जिंवत करण्याचे काम इतिहासाच्या विद्यार्थ्याच्या माध्यमातून करण्यात आले आहे असे उद्‌गार डॉ. भा. रा. अंधारे सरांनी आपल्या अभिप्रायामधून व्यक्त केले.

डॉ. भा. रा. अंधारे यांनी स्थानिक इतिहासावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला. भिवापूर व उमरेड या जुळया बहिणी आहेत या दोन्हीगावातून हेउद्योग मोठया प्रमाणात चालत अस. भिवापूर व उमरेडच्या कापडाची मागणी बाहेर मोठया प्रमाणात होती. नागपूरच्या भोसले, पेशवेना सुध्दा भिवापूर व उमरेडच्या कापडाचे आकर्षण होते. भिवापूर हे गांव गवळयांनी वसविले परंतु कालांतराने भिवापूरमध्ये गोडांची सत्ता प्रस्थापित झाली. कारण १७०२ मध्ये बख्तबुलंदशहा यांनी नागपूर शहर नव्याने वसविले होते. तेंव्हापासून भिवापूरशी गोंडाचा संबंध आला. भिवापूर मध्ये गोंडाचा किल्ला निर्माण करण्यात आला. भिवापूर मध्ये भिमशहानावाचा राजा राहत असल्यामुळे या गावाला भिवापूर हे नाव ठेवण्यात आले. गोंडाची राजधानी देवगड होती. पुढे नागपूरची सत्ता भोसल्यांकडे आली. दुसऱ्या रघुजी भोसलेची मुलगी बनुबाई ही व्यंकटराव गुजरांना दिली. भिवापूर सोबत ५२ गावांची मालगुजारी सुध्दा देण्यात आली. मनुष्याच्या उन्नतीचे दोन मार्ग आहे एक ज्ञानमार्ग तर दुसरे कर्ममार्ग मोक्ष प्राप्त करण्यासाठी दोन्ही मार्गाची आवश्यकता आहे असे प्रतिपादन डॉ. भा. रा. अंधारे यांनी केले.

विद्यार्थ्यांला इतिहासामधून शिकण्यासाठी बरेच काही आहे. महावीरांनी सांगितलेल्या सत्य, अहिंसा, अस्तेय, अपरिग्रह व ब्रम्हचर्यापासून बरेच बोध घेता येते. माणसांनी आवश्यकते पेक्षा संपत्तीचा मोह करू नये. असे उद्‌गार डॉ. श्रीकांत सोनटक्के यांनी काढले. प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले.

**रक्तदान,रक्तगट व हिबोग्लोबिन तपासणी शिबीर**

दि. ८ डिसेंबर २०१८ ला मा. राजेंद्रजी मुळक यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून रक्तदान, रक्तगट व हिमाग्लोबिन तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

या रक्तदान शिबीरात एकूण ५५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. तसेच १२५ रूग्णांची रक्तगट तपासणी करण्यात आली. या शिबीरासाठी जीवनज्योती ब्लड बॅंकेची सेवा लाभली.

**शैक्षणिक सहल**

दि. ३ फेब्रुवारी २०१८ ला इतिहास विभागाच्या वतीने शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले. ही शैक्षणिक सहल रामटेक, खिंडसी, मनसर, नगरधन या ठिकाणी नेण्यात आली. यात एकुण ४२ इतिहासाचे विद्यार्थी सहभागी झाले होते.

**अरबी व फारसी शिलालेख प्रदर्शनी व मार्गदर्शन**

दि. १६ व १७ फेबुवारी २०१८ ला इतिहास विभागाच्या वतीने अरबी व फारसी शिलालेख प्रदर्शनी व मार्गदर्शन शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.


या प्रदर्शनीचे उद्घाटन भारतीय पुरातत्व सर्वेक्षण पुरालेख शाखा, नागपूरचे संचालक डॉ. मोहम्मद आतिबजिया यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज तर प्रमुख अतिथी म्हणून कला वाणिज्य महाविद्यालय भिसीचे प्राचार्य डॉ. राजेंद्र जाने, मोहम्मद तारी करसुल, मो. अली, शेख इर्शाद उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक इतिहास विभागाचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. मोतीराज चव्हाण यांनी केले. संचालन अर्थशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुनिल शिंदे यांनी केले तर आभार प्रा. सोमेश्वर वासेकर यांनी मानले.

पुरालेख शाखेने आतापर्यंत संग्रहित शिला लेखांचा उल्लेख केला. भारतात जागोजागी शिलालेखांचा चौदाव्या शतकांपासून ते सतराव्या शतकांपर्यंत अरबी व फारसी शिलालेखांचा वापर होत होता. परंतु सद्य:स्थितीत अनेक ठिकाणी असलेल्या वास्तू जीर्ण होत असल्याने त्यावर कोरलेले शिलालेख लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. येणाऱ्या काळात अरबी व फारसी शिलालेखांचे संवर्धन करणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन भारतीय पुरातत्व सर्वेक्षण पुरालेख शाखा नागपूरचे संचालक मोहम्मदजिया यांनी केले. ते पुढे म्हणाले मध्ययुगीन भारताचा इतिहास शिलालेखांवर अवलंबून आहे. परंतु अरबी व फारसी लिपीचे ज्ञान अवगत नसल्यामुळे या शिलालेखांकडे दुर्लक्ष होत आहे. अशीच स्थिती राहिली तर मध्ययुगीन कालखंडाचा इतिहास लुप्त होईल. त्यामुळे इतिहास जिवंत ठेवण्यासाठी शिलालेखांबद्दल जाणीव जागृती होणे काळाची गरज आहे. सर्वेक्षणाच्या माध्यमातून प्रयत्न सुरू आहे. परंतु विद्यार्थ्यांनी शिलालेखांचे संवर्धन व जाणीव जागृती करण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. डॉ. जोबी जॉर्ज यांनी शिलालेख, वास्तू व नाण्यांचा अभ्यास करून स्थानिक इतिहासावर प्रकाश टाकला जावा अशी अपेक्षा व्यक्त केली.

समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज तर प्रमुख पाहुणे म्हणून मोहम्मदतारिकरसूल, मो. अली, एस.एफ. शेंडे, प्रा. सुनिल शिंदे, तौफिक पटेल उपस्थित होते. प्रदर्शनाचा लाभ अनेक महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी घेतला. आयोजनासाठी प्रा. डॉ. सुनिल शिंदे, प्रा. सोमेश्वर वासेकर, जफर, गुलाब गेडेकर गोलुप्रसाद जेठामल, अश्विनी लोखंडे, अश्विनी तिवाडे, रचना नंदेश्वर, प्रणीत ठाकरे, सुभाष बडनाग, अलका नांदेकर व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

डॉ. मोतीराज चव्हाण
विभागप्रमुख






## मराठी विभाग अहवाल (२०१७–१८)

मराठी अभ्यास मंडळाच्या वतीने सत्र २०१७–१८ या शैक्षणिक सत्रात विविध स्पर्धा व उपक्रम राबविण्यात आले, त्याचा आढावा खालीलप्रमाणे–

**वृक्ष लागवड कार्यक्रम:–**

दि. ५ सप्टेंबर २०१७ ला शिक्षक दिनाचे औचित्य साधून मराठी अभ्यास मंडळाच्या वतीने भिवापूर महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. या वृक्षारोपण कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज, मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. मधुकर नंदनवार व मराठी अभ्यास मंडळाचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

**मराठी अभ्यास मंडळ कार्यकारीणीचे गठन:–**

दि. ११ सप्टेंबर २०१७ ला मराठी विभागाच्या माध्यमातून मराठी अभ्यास मंडळाच्या कार्यकारीणीचे गठन करण्यात आले. इतिहास विभाग प्रमुख डॉ. मोतीराज चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत मराठी विभाग प्रमुख डॉ. मधुकर नंदनवार यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी अभ्यास मंडळाचे गठन झाले. अभ्यास मंडळ गठन करण्यामागील भूमिका व महत्व तसेच मराठी अभ्यास मंडळातील कार्यकारीणीचे कार्य याची माहिती मराठी विभाग प्रमुख व मंडळाचे मार्गदर्शक डॉ. मधुकर नंदनवार यांनी विषद केले. डॉ. मोतीराज चव्हाण यांनी मराठी विषयाची व्याप्ती व व्याकरणाचे महत्व मराठी भाषेसाठी कसे महत्वाचे आहे हे सांगून विद्यार्थ्यांना विविध स्पर्धात्मक परीक्षेच्या दृष्टिने मराठी विषय कसा महत्वाचा आहे हे समजावून सांगीतले.

**रक्तदान, रक्तगट व हिबोग्लोबिन तपासणी शिबीर:–**

दि. ८ डिसेंबर २०१८ ला संस्थेचे सचिव माजी मंत्री मा. राजेंद्रजी मुळक यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून रक्तदान, रक्तगट व हिमोग्लोबिन तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबीरात एकूण ५५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. तसेच १२५ रूग्णांची रक्तगट तपासणी करण्यात आली. या शिबीरासाठी जीवनज्योती ब्लडबॅंकेची सेवा लाभली. मराठी अभ्यास मंडळाच्या विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन रक्तदान केले.

**मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा :–**

**दिवानी व फौजदारी न्यायालय भिवापूर यांचा मराठी विभागातर्फे कार्यक्रम.**

महाराष्ट्र शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या मराठी भाषा संवर्धन पंधरवाडानिमित्य महाविद्यालयात दि. १२/०१/२०२०१८ ला मराठी भाषेचे संवर्धन या विषयावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन भिवापूर दिवाणी न्यायालयाचे न्यायाधीश मा. विनोद सं. डामरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी सामाजिक कार्यकर्ते मा. नरहरी पेंदाम, अॅडव्होकेट मा. नागोसे, तर अध्यक्ष म्हणून डॉ. सुनिल शिंदे उपस्थित होते. यावेळी मराठी भाषेचे कार्यालयीन पातळीवर जतन व्हावे तेव्हाच ग्रामीण भागातील जनतेला कार्यालयीन मराठी भाषा समजेल असे प्रतिपादन अध्यक्षांनी यावेळी केले. उद्घाटक न्यायाधीश मा. विनोद सं. डामरे यांनी यावेळी मराठी भाषा सर्वस्तरापर्यंत पोहचावी व तीचे संवर्धन व्हावे यासाठी शासनाचे प्रयत्न असून अशा उपक्रमातून तीचे संवर्धन होत असल्याचे सांगीतले. महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाचा लाभ यावेळी विद्यार्थ्यांना मिळाला. मराठी भाषेचे महत्व या विषयावर डॉ. अनिता महावादिवार यांनी मार्गदर्शन केले. मराठी भाषेचे स्वरुप व वाटचाल याविषयी प्रा. ज्योती बांते तर 'मराठी भाषेचे न्यायालयीन उपयोग' यावर प्रा. आरती बावनथडे यांनी मार्गदर्शन केले. मराठी भाषेचे संवर्धन या विषयावर संपन्न झालेल्या या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन सामाजिक कार्यकर्ते मा. नरहरी पेंदाम यांनी तर आभार प्रा. ज्योती बांते यांनी मानले.

**महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छतामित्र 'वक्तृत्व स्पर्धेचे' आयोजन:—**

दि. २३/०२/२०२०१८ महाराष्ट्र शासन तालुकास्तरीय 'पाणी पुरवठा व स्वच्छतामित्र 'वक्तृत्व स्पर्धेचे' आयोजन महाविद्यालयात पंचायत समिती भिवापूरच्या वतीने करण्यात आले. भिवापूर तालुक्यातील बॉईज एज्युकेशन सोसायटी, राष्ट्रीय ज्युनियर कॉलेज, प्रियवंदा कॉलेज सालेशहरी व भिवापूर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी वक्तृत्व स्पर्धेत सहभाग घेतला. या स्पर्धेचे परीक्षणाचे काम जेष्ठ पत्रकार श्री. भिसीकर सर व मराठी विभाग प्रमुख डॉ. मधुकर नंदनवार यांनी केले. स्पर्धेच्या परीक्षणानंतर डॉ. मधुकर नंदनवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**दि.२७/२/२०१८ ला कवी कुसुमाग्रज जन्मदिन 'मराठी भाषादिन' कार्यक्रम :—**

दि. २७/२/२०१८ ला कवी वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनाचा कार्यक्रम 'मराठी भाषादिन' म्हणून महाविद्यालयात वरिष्ठ विभागात घेण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. मधुकर नंदनवार होते तर प्रमुख उपस्थिती प्रा. ज्योती बांते यांची होती. अध्यक्षांनी 'मराठी भाषेची निर्मिती व विकास' यावर सखोल मार्गदर्शन विद्यार्थ्यांना यावेळी केले. तर प्रमुख अतिथींनी विद्यार्थ्यांना मराठी भाषा आपली मायबोली आहे, या मायबोलीचा कुसुमाग्रजाच्या जन्मदिनानिमित्ताने मराठी भाषादिन म्हणून साजरा केला जातो हे महत्वाचे असल्याचे प्रतिपादन यावेळी केले. संचालन कु. पुनम गोंडीमेश्राम तर आभार कु. नेहा सावरकर हिने मानले.

**निबंध स्पर्धेचे आयोजन:—**

दि. ८.३.२०१८ ला महाविद्यालयात वरिष्ठ व कनिष्ठ विभागातील विद्यार्थ्यांची मराठी विभागातर्फे वार्षिकांक निर्धार विद्यार्थी सहसंपादक निवडीसाठी निबंध स्पर्धा घेण्यात आली. मराठी 'पर्यावरण संतूलन व आजचा युवक' व इंग्रजी **Enviromental Balance And Modern Man** या विषयावर घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेत एकूण १४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कु. रचना नंदेश्वर बी.ए. २ व कु. पुनम गोंडीमेश्राम बी.ए. २ यांचे निबंधाला क्रमांक मिळाले व त्यांची मराठी व इंग्रजी सहसंपादक निर्धार पदी निवड करण्यात आली.


**कविता (काव्य) लेखन स्पर्धेचे आयोजन :—**

दि. १४/३/२०१८ ला महाविद्यालयात वरिष्ठ व कनिष्ठ विभागातील विद्यार्थ्यांची मराठी विभागात वार्षिकांक निर्धार करिता कविता लेखन स्पर्धा घेण्यात आली. या काव्य लेखन स्पर्धेत वरिष्ठ विभागातील १९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. काव्य लेख स्पर्धेतील योग्य अशा कवितांना निर्धार वार्षिकांकात स्थान देण्यात आले. काव्य लेखन स्पर्धेतील काव्याचे परीक्षण मराठी विभाग प्रमुख डॉ. मधुकर नंदनवार यांनी केले.

अशा प्रकारे मराठी अभ्यास मंडळाच्या वतीने सत्र २०१७—१८ या शैक्षणिक सत्रात विविध स्पर्धा व उपक्रम राबविण्यात आले.

डॉ. मधुकर नंदनवार
विभाग प्रमुख

॥•॥



## Library Committee Report




During the Academic year 2017-18 more than 1000 Text books and Reference books was procured. Digitization of the library is in progress. There are 7 computers in the UGC Network Resource Centre. All the Computers are working properly and have the internet facility. All the students (Senior, Junior & Post graduate students) got the benefit of the UGC Network Resource Centre. In addition to routine library functions earmarked by the library committee library has organized many other programmes like Library Orientation, book exhibition etc .....

On Monday 15th January, 2018 Challenging questions contest conducted in the College premises. More than 100 interested students participated in the contest. Mr. Jagdish Vaman Janbandhu, B.A. I year student procured First Prize and Mr. Ritik Suresh Nakshine XII student procured Second Prize. Prizes are distributed in the annual day function.

A Book Exhibition organized from18 to 19th January, 2018 with the book contributed by staff / Teachers and the exhibition was a huge success. Students and public from the Bhiwapur area were visited in large number.

On 1st February, 2018 Central Library had conducted Library Orientation Programme for all the students and faculties. The Chief guest of the seminar was Dr. Mrs. Manju N. Dubey, Librarian, R.S. Mundle College of Arts and Commerce, Nagpur. Dr. Jobi George, Principal, Bhiwapur Mahavidyalaya Bhiwapur presided over the function. Dr. Sunil Shinde, Associate Professor, Bhiwapur Mahavidyalaya Bhiwapur, Dr. Mangesh Kadu, Assistant Professor, Bhiwapur Mahavidyalaya Bhiwapur, Dr. Motiraj Chavhan, Assistant Professor, Bhiwapur Mahavidyalaya Bhiwapur and Mrs. Rajashreee O.P., Librarian Library and Infirmation Centre, Bhiwapur Mahavidyalaya Bhiwapur were present on the Dias. Around 1000 students participated in the Orientation Programme.



**Rajshree O. P.**
Librarian

## Cultural & Educational Report

During Navratri season one of the cultural activity was conducted i.e. Garba competition on 29th Oct, 2017.

University level intercollegiate Debate competition in Jyotirao Phule Samajkarya Mahavidyalaya was represented by Ku. Neha Sawarkar.

Garba Competition was organized on behalf of Navratra by Bhiwapur Mahavidyalaya, Bhiwapur by cultural committe and Alumini Association committee on 29th September, 2017. Garba Prizes - Best costume - No. 40 (Female) - Miss Snehal Gabhane No. 23 (Male) - Mr. Bhave, Best group dance - First prize - B.Sc. group, Second prize - 12th Commerce, Best soloin circle Garba - Miss Neha Sandesh (F) and Mr. Aman Bhave (M), Best group Dance First prize - trophy and 1001/-, Second prize - trophy and 701/- and best costume male and female-trophy and 250/- each.

'Vachan Prerna Din' was celebrated on 13th October, 2017 in Bhiwapur Mahavidyalaya, Bhiwapur to pay tribute to our former President Dr. APJ Abdul Kalam.

Participation in Taluka level Swachata Mitra Vakrutwa Karandak Spardha on 2nd January - 2018 and bagged first, second and third prizes in both junior andsenior categories with 5000/-, 3000/- and 2000/- respectively getting total of 20,000/- to the participants of our college. Winners : senior category - Miss Neha Sawarkar (1st), Miss Rachana Nandeshwar (2nd) and Miss Nitu Wagh (3rd). Junior category - Miss Pallavi Wasnik (1st), Mr. Praful (2nd) and Mr. Badal (3rd).

Annual gathering was organized on 19th and 20th January, 2018 in Bhiwapur Mahavidyalaya, Bhiwapur.

Shri Padmakarji Agarwal was the President of the programme while Dr. Purohit, Principal Bhausaheb Mulak College of D. Pharmacy, Umrer, was the chief guest. Following guest of honour showed their presence, Shri Dilipji Gupta.

The Exhibition was inagurated by Dr. Purohit, Principal Bhausaheb Mulak College of D. Pharmacy, Umrer, Shri Padmakarji Agarwal, and Shri Dilipji Gupta and further evaluation of Models was done.

An Exhibition on topics like "Vermiculture" "Sericulture", "Use Solar Energy during transportation", Hydroelectricity, Human Parasites, working model on Human Circulatory system, display of medicinal plants etc. was conducted during the annual gathering by Dr. Sarang Dhote, Head of Chemistry Department with the assistance of Dr. Nitisha Patankar, Head of Zoology Department, Asst. Professor Amit H. Kalbandhe, Chemistry Dept. and Mr. Sagar Yadav,Lecturer, Botany Department.

The subjects of models sponsored by Zoology Departments were as follows :

1. "Vermiculture" - showing the process of vermicomposting of kitchen waste.
2. "Sericulture" - showing production of silk and its applied value.
3. "transportation".
4. "Life cycle of Taniea solium"
5. "Working of Human Heart"
6. "Human genetic traits"

participated in Novonmesh - 2018 at KDK Engineering College, Nagpur on 29th January, 2018 and bagged first prize for "Khel Mandala" group dance.

Participation in Science Conclave "Urja" 2017-18, JSW Foundation & Jindal Vidya Mandir in collaboration with Vigyan Bharti, Raman Science Centre at Kalmeshwar on 30th January, 2018. Students who participated were Miss Nitu Wagh, Mr. Sagar Ninawe, Mr. Sunil Deshmukh and Mr. Nepal Gabhane.

Participation in district level Swachata Mitra Vakrutwa Karandak Spardha on 2nd February 2018. Miss Neha Sawarkar and Mr. Praful represented our college.


participation in solo dance, group dance, Mehendi and Rangoli competition at Yuvarang 2017-18 RTMNU, Nagpur on 21st and 22nd February, 2018.

Participation in solo dance and group dance competition at SEMEP - 2018, Youth Fest held at G.H. Raisoni University, Saunsar, Dist. Chhinwara on 24th February, 2018. Students bagged first prize. In group dance "Khel Mandala" and miss Ruchu Narnaware bagged 3rd prize for solo dance.

Participation in Skit and Short Film competition in NEERI, Nagpur organized on behalf of world water day 2018 on 22nd March, 2018. Mr. Jawed Pathan and Mr. Akshay Wankhede displayed the short film at NEERI and students performed skit on "Save Water" and bagged first prize of Rs. 25,000/- & Certificates.

Farewell programme for final year students of B. A., B. Com. and B.Sc. was organised on 17th March, 2018. Dr. Babasaheb Ambedkar "Birth Anniversary" was celebrated on 16th April 2018. Dr. Jayashritai Ramteke, receiver of "Savitribai Phule Award" was the speaker of the day.

Dr. Nitisha Patankar
Member Secratory





# महिला अध्ययन व सेवा केंद्र वार्षिक अहवाल - २०१७ - १८



आजीवन अध्ययन व विस्तार विभागा अंतर्गत महिला अध्ययन व सेवा केंद्राची स्थापना भिपूर महाविद्यालय भिवापूर येथे २०१७–१८ या सत्रात करण्यात आली. महाविद्यालयात स्थापना करण्यात आलेल्या महिला अध्ययन व सेवा केंद्रात बी.कॉम. भाग १ चे ९२ विद्यार्थी, बी.ए. भाग १ ची १ विद्यार्थिनी, बी.एस.सी. भाग १ चे २४ विद्यार्थी, एम.ए. भाग 1 (अर्थशास्त्र) चे 4 विद्यार्थी, एम.ए. भाग–१ (समाजशास्त्र) चे २ विद्यार्थी असे एकूण १२४ विद्यार्थ्यांची नोंदणी विद्यापीठ स्तरावर करण्यात आली. नोंदणीनंतर महाविद्यालयात महिला अध्ययन व सेवा केंद्रांतर्गत वर्ष २०१७–१८ या सत्रात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

दि. १२–०८–२०१७ ला आंतराष्ट्रीय युवा दिनानिमित्य 'एड्स, सिकलसेल तसेच एच.आय.व्ही.' या विषयावर महाविद्यालयात महिला अध्ययन व सेवा केंद्र तसेच ग्रामीण रुग्णालय, भिवापूर यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन युवकांसाठी मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज होते. विशेष अतिथी म्हणून ग्रामीण रुग्णालय भिवापूर येथील डॉ. प्रशांत हिवरकर तसेच डॉ. अश्विनी काळे उपस्थित होत्या. विशेष अतिथींना आपल्या भाषणात महाविद्यालयीन युवकांना एड्स, सिकलसेल तसेच एच.आय.व्ही. या रोगांविषयी माहिती देऊन त्यासाठी करण्यात येणाऱ्या विविध उपाययोजना समजावून सांगितल्या. डॉ. अश्विनी काळे यांनी आजच्या युवा पिढीने स्पर्धात्मक युगात टिकायचे असेल तर योग्य नियोजन करुन आपले भविष्य घडविणे किती महत्वाचे आहे हे समजावून सांगितले. मार्गदर्शना बरोबरच विद्यार्थ्यांनी प्रात्यक्षिकही करुन दाखविलीत. या कार्यक्रमात २०० विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

दि. ०९–०९–२०१७ ला सकाळी १०.०० वाजता महिला अध्ययन व सेवा केंद्र तसेच जे.सी.आय. भिवापूर यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीमती शीलाबेन पटेल, नागपूर यांचे 'विवाह पूर्ण समुपदेशन' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. सदर व्याख्यानात त्यांनी मुलींना आपल्या सुदृढ आरोग्यासाठी पुढील जीवनात कोणती काळजी घ्यायची याविषयी महत्वाच्या टिप्स दिल्यात. दु. २.०० वाजता "Health & Hygiene" या विषयावर श्रीमती आगाशे, नागपूर यांचा मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला. सदर कार्यक्रमात मार्गदर्शकाने मुलींना आपल्या निरोगी आरोग्यासाठी स्वच्छतेची किती नितांत गरज आहे, हे विविध उदाहरणे देऊन समजावून सांगितले. यासोबतच विद्यार्थिनीं सोबत संवाद साधून त्यांच्या समस्याही जाणून घेतल्या. या कार्यक्रमात महाविद्यालयीन विद्यार्थिनी तसेच भिवापूर येथील मुली व महिला अशी एकूण २५० महिलांची उपस्थिती होती. दि. २९.०९.२०१७ ला 'मोफत आरोग्य तपासणी शिबीराचे' आयोजन करण्यात आले. या शिबीरात एकूण ७३ मुलींची आरोग्य तपासणी करण्यात आली. या शिबीरात प्राथमिक आरोग्य केंद्र, सोमनाळा येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. सोनाली दुधाट तसेच त्यांच्या चमूचे मोलाचे योगदान लाभले.

दि. ०२.१०.२०१७ ला महिला अध्ययन व सेवा केंद्र तसेच एन.एस.एस. यांच्या संयुक्त विद्यमाने 'जागतिक अहिंसा दिना' निमित्य रॅलीचे आयोजन करण्यात आले. सदर रॅलीत 'महिला सक्षमीकरण, बाल कुपोषण, तसेच स्त्री अत्याचार' या विविध संवेदनशील विषयावर पोस्टर्स तयार करुन तसेच घोषणा देऊन भिवापूर ग्रामस्थांमध्ये जनजागृती करण्यात आली. रॅली दरम्यान 'महिलांचे कायदे व अधिकार' याविषयीची ५०० पत्रकेही भिवापूर येथे गावात वाटण्यात आलीत.

महाविद्यालयातून प्रकाशित होणाऱ्या 'निर्धार' या वार्षिकांकासाठी लेख लिहिण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी सत्र २०१७–१८ करिता दि. १०.१२.२०१७ ला 'स्त्री भ्रूणहत्या, राजकारणातील स्त्रियांचे नेतृत्व, स्त्रियांचे आरोग्य, महिला सक्षमीकरण' इ. विषयावर 'उत्कृष्ठ लेख स्पर्धेच्या' आयोजना विषयीची सूचना विद्यार्थ्यांना देण्यात आली. दि. २०.१२.२०१७ पर्यंत आलेल्या लेखांमधून २ लेखांना क्रमांक देण्यात आले. या लेख स्पर्धेत कु. प्रियंका बटघरे हिने प्रथम

क्रमांक मिळविला तर द्वितीय क्रमांक कु. करिश्मा डाहुले हिने मिळविला. प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांचे लेख निर्धार वार्षिकांकाचे मुख्य संपादकांना प्रकाशित करण्यास देण्यात आले. दि. २९.१२.२०१८ ला विद्यार्थ्यांना पूर्वसूचना देऊन 'माझा काय गुन्हा' या विषयावर डिजीटल क्लासरुम येथे ११.०० वाजता सी.डी. शो दाखविण्यात आला. महाविद्यालयातील विद्यार्थिनींना स्व कर्तव्याची जाणीव व्हावी तसेच त्यांना जीवन जगतांना येणाऱ्या सर्वसामान्य संकटांना तोंड देता यावे यासाठी महिला अध्ययन व सेवा केंद्राद्वारे 'गृहशोभिका' हे मासिक विद्यार्थ्यांना वाचनास उपलब्ध करुन देण्यात आले. जेणे करुन जीवन जगतांना सर्वसामान्य ज्ञानाचा उपयोग व्हावा.

दि. १८.०१.२०१८ ते २०.०१.२०१८ या कालावधीत महाविद्यालयात महिला अध्ययन व सेवा केंद्र तसेच वार्षिकोत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने वार्षिकोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे दि. १९.०१.२०१८ ला पोस्टर स्पर्धा, रांगोळी स्पर्धा तसेच पुष्पगुच्छ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विविध सामाजिक विषयांवर 'पोस्टर स्पर्धेचे' आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत बी.कॉम. २ ची कु. पिंकी निखारे हिने प्रथम क्रमांक मिळविला तर १२ वा विज्ञान या शाखेतील श्री. शुभम् संदिप खोब्रागडे या विद्यार्थ्याने द्वितीय क्रमांक मिळविला. रांगोळी स्पर्धेत बी.कॉम. भाग २ ची कु. अस्मिता सुरेश चौधरी हिने प्रथम क्रमांक मिळविला तर कु. मोनाली शामराव कामडी, बी.एस.सी. भाग २ हिने द्वितीय क्रमांक मिळविला.. पुष्पगुच्छ स्पर्धेत १२ वा वाणिज्य शाखेतील श्री. प्रदीप कापगते या विद्यार्थ्याने प्रथम क्रमांक मिळविला तर बी.एस.सी. भाग २ मधील कु. अश्विनी मेश्राम हिने द्वितीय क्रमांक मिळविला. दि. २८.०१.२०१८ ला महिला अध्ययन व सेवा केंद्रांतर्गत दु. २.०० वाजता 'महिला संरक्षण कारणे व उपाय' या विषयावर मार्गदर्शन कार्यक्रम पार पडला. या मार्गदर्शन कार्यक्रमात श्रीमती भूमेश्वरी खोंड, जि.प. प्रा. शाळा, मालेवाडा, जि. नागपूर यांनी विद्यार्थिनींना सर्वप्रथम महिला बलात्कार व अत्याचारा विषयीची सद्य:स्थिती समजावून सांगितली. अशा स्थितीत महिलांना स्वसंरक्षणासाठी कोणती उपाय योजना करावयाची याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले..

दि. ८ मार्च, २०१८ ला शासन परिपत्रकाप्रमाणे 'जागतिक महिला दिनानिमित्य' कार्यक्रमाचे आयोजन केले गेले. या कार्यक्रमाचे अध्यक्षपद डॉ. शिंदे सर यांनी भुषविले. प्रमुख अतिथी डॉ. विनिता वीरगंधम्, सहाय्यक प्राध्यापक, इंग्रजी विभाग या होत्या. त्यांनी आपल्या भाषणात वैदिक काळापासून तर आजपर्यंत महिलांना मिळालेल्या स्थानांविषयीची चर्चा करुन सक्षम होण्याविषयीचा आत्मविश्वास विद्यार्थिनींमध्ये जागृत करुन दिला. दि. १७ मार्च, २०१८ ला दु. १.३० वाजता महिला अध्ययन व सेवा केंद्र, तसेच जे.सी.आय. भिवापूर यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनाच्या निमित्त विविध क्षेत्रातील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांकृतिक व शासकीय सेवेतील योगदानाबद्दल 'महिला सत्कार समारंभ व महिला दिन' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष जेसी प्रशांत हिवरकर होते तर प्रमुख अतिथी मा. सूचिता न. पानसरे, मुख्याधिकारी, नगरपंचायत, भिवापूर उपस्थित होत्या. तर विशेष अतिथी म्हणून जेसी लव्हली सिंग (National Trainnner zone IX) उपस्थित होत्या. या कार्यक्रमात जेसी लव्हली सिंग यांनी विद्यार्थिनी तसेच भिवापूर येथील महिलांना मार्गदर्शन केले. त्यांनी कुटुंबापासून समाजापर्यंत महिलांना वावरतांना येणाऱ्या अडचणी तसेच त्यावर योग्य त्या उपाय योजना सांगून महिलांना सक्षम होण्याविषयीचे मार्गदर्शन केले. या नंतर सत्कार मूर्ती मा. श्रीमती जयश्री स. रामटेके, यशस्वी साहित्यिक, कवयित्री व सामाजिक कार्यकर्त्या यांना शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

सत्राच्या शेवटी विद्यापीठ परिपत्रकाप्रमाणे महिला अध्ययन व सेवा केंद्रांतर्गत एकूण ६६ विद्यार्थ्यांनी 'माहिती संकलन प्रकल्प तसेच राष्ट्रसंत संस्कार प्रकल्पा' चे कार्य पूर्ण केले. अशाप्रकारे विद्यापीठ परिपत्रकानुसार तसेच परिपत्रकाशिवाय इतरही कार्यक्रम राबवून भिवापूर महाविद्यालय, भिवापूर अंतर्गत स्थापन झालेल्या महिला अध्ययन व सेवा केंद्रांतर्गत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रमांचे आयोजन यशस्वीरित्या करण्यात आले.

प्रा. डॉ. अनिता वि. महावादीवार
कार्यक्रम अधिकारी
महिला अध्ययन व सेवा केंद्र
भिवापूर महाविद्यालय, भिवापूर

# क्षणचित्रे




अर्थशास्त्र विभागाअंतर्गत कार्यक्रमात प्रमुख अतिथी डॉ. मंजुषा राऊत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना




इतिहास अभ्यासमंडळाच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करतांना प्रसिद्ध इतिहासतज्ञ डॉ. भा. रा. अंधारे



राज्यशास्त्र अभ्यास मंडळातर्फे आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना डॉ. प्रदिप मेश्राम जे. एम. पटेल कॉलेज, भंडारा




ग्रंथालयातर्फे आयोजित उद्‌बोधन वर्गातील विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप करतांना डॉ. मंजु दूबे, प्राचार्य व प्राध्यापक वृंद



मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा कार्यक्रमात विचार मांडतांना उद्घाटक मा. विनोद स. डामरे न्यायाधीश दिवाणी व फौजदार न्यायालय भिवापूर



बँकाक (थायलंड) येथे झालेल्या आशियाई सॉफ्ट बेसबॉल स्पर्धेतील सुवर्ण पदक विजेत्या संघातील खेळाडू कु. प्रियंका कारमोरे

# क्षणचित्रे















